विकास समर्पित मासिक

# योजना

ISSN-0971-8397

वर्ष ४५ अंक ९ पाने ७६ मार्च २०१८ मूल्य ३०रु.

विशेषांक

## केंद्रीय अर्थसंकल्प २०१८ -१९

केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९चे विश्लेषण
प्राध्यापक जे.डी. अगरवाल

अर्थव्यवस्थेला पुढे घेऊन जाणारा अर्थसंकल्प
हसमुख अधिया

महिला सबलीकरण आणि अर्थसंकल्प
डॉ. शाहीन राझी

(विशेष लेख)
अर्थसंकल्प आणि अन्न सुरक्षा
एम एस स्वामिनाथन

(फोकस)
अर्थसंकल्पाने आरोग्याचे रणशिंग फुंकले
के. श्रीनाथ रेड्डी



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ बी, ७०१ सी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ८ ❖ ❖ मार्च २०१८ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
उप संपादक
**अभिषेक कुमार**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन:प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे

## अनुक्रमणिका


- केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ चे विश्लेषण - प्राध्यापक जे.डी. अगरवाल ५
- अर्थव्यवस्थेला पुढे घेऊन जाणारा अर्थसंकल्प - हसमुख अधिया १४
- जिल्ह्यांचे विकासपरिवर्तन - एक विकासात्मक प्रवास - अमिताभ कांत १७
- एमएसएमईज: भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकीकरणाचे इंजिन - अनिल भारद्वाज ३४
- अर्थसंकल्पाने आरोग्याचे रणशिंग फुंकले (फोकस) -के. श्रीनाथ रेड्डी ३७

  आयुष्मान भारत - रेश्मा घाणेकर ४१
- अर्थसंकल्प आणि अन्न सुरक्षा (विशेष लेख) - एम एस स्वामिनाथन ४५
- केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ रोजीरोटीची निर्मिती - डॉ. रणजीत मेहता ४९
- महिला सबलीकरण आणि अर्थसंकल्प - डॉ. शाहीन राझी ५४
- मेट्रो प्रकल्पांसाठी महाराष्ट्राला स्पष्ट तरतूद -रमेश झवर ५८
- प्रगतीपथावरील भारतीय अर्थव्यवस्था - डी. एस्. मलीक ६४
- वर्तन बदल संज्ञापन आणि स्वच्छ भारत योजना - परमेश्वरन अय्यर ६९


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# जनतेचा अर्थसंकल्प

अर्थसंकल्प हा, तुमचे पैसे कुठे गेले यांच्याविषयी उहापोह करण्यापेक्षा भविष्यात तुमचा पैसा कुठे जावा याचे मार्गदर्शन करणारा असतो. आपल्या सगळ्यांना घराचे अंदाजपत्रक तयार करण्याचा अनुभव आहेच, त्यात आपले नेमके उत्पन्न किती आणि त्यानुसार खर्चाचा ताळेबंद आखणे किती महत्वाचे असते हे आपण सगळे जाणतोच! 'आमदनी अठन्नी खर्चा रुपय्या' ही म्हण आपल्या सर्वांच्या चांगल्याच परिचयाची आहे.ज्या घरात,उत्पन्नाचे भान राखून त्या प्रमाणात खर्चावर नियंत्रण ठेवले जात नाही, तिथे, आर्थिक अनागोंदी निर्माण होते. अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्प म्हणजे तुम्ही खर्चाचे नियोजन करणे आणि त्या नियोजनाबाहेर खर्च होणार नाही, याची काळजी घेणे!

एखाद्या राष्ट्राचा अर्थसंकल्पही तिथल्या जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. देशाचे शहाणे राज्यकर्ते आणि प्रशासक, देशात, विविध स्त्रोतांकडून येणारे समग्र उत्पन्न किती आहे याचे मूल्यमापन करून त्यानुसार खर्चाची आखणी करतात. आपल्या घरगुती अंदाजपत्रकाप्रमाणेच, देशाच्या अर्थसंकल्पातही, शिक्षण, आरोग्य, आकस्मिक खर्च, पायाभूत सुविधांसाठी तरतूद, अशा विविध कामांसाठी पैसे राखून ठेवलेले असतात. २०१९ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी सध्याचा सरकारचा यंदाचा हा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प होता. भारतासारख्या देशात, शेतकऱ्यांचे कल्याण यावर सरकारने मुख्य भर द्यायलाच हवा. २०१८-१९ साठीच्या अर्थसंकल्पात सरकारने कृषी क्षेत्रासाठी भरीव तरतूद करतांना कृषी सुधारणांना प्राधान्य दिल्याचे दिसते. या भूमिकेमुळे, कृषीक्षेत्रासाठीच्या तरतुदीत आमूलाग्र बदल बघायला मिळतो. एकीकडे 'ऑपरेशन ग्रीन्स' अंतर्गत टमाटा, कांदे, बटाटे अशा अत्यावश्यक फळभाज्यांच्या किमती नियंत्रणात ठेवण्याची व्यवस्था तर त्याचवेळी दुसरीकडे, खरीप पिकांसाठीचा हमीभाव दीड पटीने वाढवण्याची घोषणा, २२००० ग्रामीण बाजारांचे ग्रामीण कृषी बाजारात रुपांतर, शेतकऱ्यांसाठी कृषी पतपुरवठा अशा कामांसाठी मोठी तरतूद केलेली दिसते.

शेतकऱ्यांच्या कल्याणाशी निगडीत आणखी एक महत्वाचा विषय म्हणजे ग्रामविकास !त्यालाही या अर्थसंकल्पात महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. यात विशेषत: ग्रामीण पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे यावर भर दिलेला आहे. '२०२२ पर्यत सर्वांसाठी घरे', या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत, २०१९ पर्यत देशाच्या ग्रामीण भागात एक कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे, त्याशिवाय, स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत देशभरात आणखी २ कोटी शौचालये बांधली जाणार आहेत. अन्नप्रक्रिया उद्योगांसाठीच्या निधीत दुपटीने वाढ, मत्स्यव्यवसाय आणि पशुपालनासाठी स्वतंत्र निधीची व्यवस्था, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या सरकारच्या उद्दिष्टपूर्तीअंतर्गत राष्ट्रीय बांबू अभियानाची पुनर्रचना आणि कृषीसंलग्न उद्योगांमध्ये स्वयंउद्योजकतेला संधी देणाऱ्या व्यवस्था निर्माण करणे, या सर्व बाबींवर या अर्थसंकल्पात भर दिलेला दिसतो. या अर्थसंकल्पात आरोग्यक्षेत्रालाही प्राधान्य दिल्याचे दिसते आहे. सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजनेअंतर्गत, देशातल्या ग्रामीण आणि वंचित जनतेला आरोग्य सुविधांसाठी दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यतचे संरक्षण मिळणार आहे. सुमारे १० कोटी जनतेला आरोग्यसेवेचे कवच पुरवणारी ही योजना जगातली सर्वात मोठी 'आरोग्य संरक्षण योजना' ठरली आहे. त्याशिवाय 'आयुष्यमान भारत' योजनेंतर्गत १२०० कोटी रुपयांच्या निधीतून देशभरात दिड लाख आरोग्य केंद्रे उभारली जाणार आहेत.

शिक्षणक्षेत्रासाठीही ठोस निधी देण्यात आला आहे. आदिवासी मुलांना त्यांच्याच पर्यावरणात उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या एकलव्य निवासी शाळा सुरु करण्याची घोषणा अतिशय स्वागतार्ह आहे. ज्येष्ठ नागरिकांना आपले आयुष्य सन्मानाने जगता यावे यासाठी, सरकारने अर्थसंकल्पात अनेक तरतुदी जाहीर केल्या आहेत. त्यापेकी एक म्हणजे बँक किंवा टपाल ठेवींवरच्या व्याजदरातली सवलत वाढवली आहे. आरोग्य विमा योजना आणि वैद्यकीय खर्चासाठीच्या मर्यादितही ३० हजार रुपयांवरून ५० हजार रुपयांपर्यत वाढ करण्यात आली आहे. एम एस एम ई म्हणजेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकासाचे इंजिन असल्याचे सांगत सरकारने या अर्थसंकल्पात हे उद्योग वाढवण्यावर विशेष भर दिला. असून ३,७९४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे


सरकारने आपली 'उद्योग सुलभता' मोहीम अधिक विस्तारत देशातील नागरिकांच्या आयुष्यात सुलभता आणण्याच्या दिशेने आश्वासक पाउल टाकले आहे. समग्रपणे वर्णन करायचे झाल्यास, जनतेच्या आयुष्यासाठी महत्वाच्या घटकांना स्पर्श करणारा हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासाकडे वाटचाल करणारा ठरला आहे.

■■■

सखोल

# केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ चे विश्लेषण

प्राध्यापक जे.डी. अगरवाल




**खरोखरच भारतीय अर्थव्यवस्था जगातल्या उत्तम अर्थव्यवस्थांपैकी एक झाली आहे. मला हे सांगताना अत्यंत आनंद होतो आहे की नोटाबंदी आणि जीएसटी सारख्या संरचनात्मक सुधारणांमुळे आलेल्या अडचणींना अर्थव्यवस्थेने यशस्वीपणे तोंड दिले आणि त्यांचा अर्थव्यवस्थेच्या वाढीवर तसेच दीर्घ अर्थशास्त्रीय मापदंडावर कोणताही वाईट परिणाम दिसून आला नाही.**

भारताच्या सध्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या वर्षीच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण होणे गरजेचे आहे. गेल्या चार वर्षात सरकारने अनेक, मोठ्या संरचनात्मक सुधारणा केल्या आहेत. त्यांचा परिणाम म्हणून २०१७-१८ या वर्षात स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ६.७५ टक्क्यापर्यंत पोहोचू शकले. येत्या वर्षात ते ७.५ टक्के होईल, अशी अपेक्षा आहे. नोव्हेंबर २०१६ मधली नोटाबंदी, परिवर्तनकारी वस्तू आणि सेवा कराची (GST) १ जुलै २०१७ पासून झालेली अंमलबजावणी, नव्या भारतीय दिवाळखोरीविषयक संहितेची सुरुवात आधार कार्ड काढण्यासाठीची अंमलबजावणी, थेट परदेशी गुंतवणुकीच्या नियमांमधे शिथिलता, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांवरचा ताण कमी करण्यासाठी आणि या बँकांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ८८ हजार कोटी रुपयांच्या मोठ्या पुर्नभांडवलीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात तसेच या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या सहामाहीमधे अर्थव्यवस्थेत दिसून आलेली गतिमानता या सगळ्यांमुळे सकल राष्ट्रीय उत्पन्नात ठोस वाढ दिसून आली. अर्थव्यवस्थेतली सुमारे ७.२ टक्के इतकी घसघशीत वाढ, गेल्या सहा वर्षांमधला सगळ्यात कमी आणि स्थिर महागाई दर, आर्थिक मजबूती, दीर्घअर्थशास्त्रीय स्थैर्य, परकीय चलनाची १४.१ टक्के वाढ दाखवणारी ४०९.४ अब्ज डॉलर्सची गंगाजळी, १ लाख कोटी रुपयांच्या निर्गुंतवणुकीद्वारे झालेले परिणामकारक बदल, लाभार्थीच्या खात्यावर थेट अनुदान जमा होताना आधारची मदत घेतल्यामुळे अनुदानाच्या रकमेत झालेली ६५००० कोटी रुपयांची बचत, यासारख्या अनेक नव्या गोष्टींनी भारतीय अर्थव्यवस्था किती लवचिक आहे हेच दाखवून दिले. खरोखरच भारतीय अर्थव्यवस्था जगातल्या उत्तम अर्थव्यवस्थांपैकी एक झाली आहे. मला हे सांगताना अत्यंत आनंद होतो आहे की नोटाबंदी आणि जीएसटी सारख्या संरचनात्मक सुधारणांमुळे आलेल्या अडचणींना

अर्थव्यवस्थेने यशस्वीपणे तोंड दिले आणि त्यांचा अर्थव्यवस्थेच्या वाढीवर तसेच दीर्घअर्थशास्त्रीय मापदंडावर कोणताही वाईट परिणाम दिसून आला नाही. अर्थव्यवस्थेचा समतोल राखण्यात सरकारला यश आले.

जरी २०१६-१७ या वर्षात ३०० दशलक्ष टन फळे आणि भाज्यांचे मोठे उत्पादन झाले आणि अन्न धान्याचे देखिल २७५.७ दशलक्ष टन इतके भरघोस उत्पादन झाले. तरी देखिल अर्थव्यवस्थेला २०१७-१८ या वर्षात २.१ टक्के इतक्या कमी कृषी उत्पादनासारख्या आव्हानांना तोंड द्यावे लागले. कृषी उत्पादकांचे उत्पन्न सुधारण्याबाबत पंतप्रधानांनी व्यक्त केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करणे, कृषी उत्पादनात वाढ करणे, कृषी व्यवस्थेला लवचिक बनविणे, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातल्या सुविधांचा विस्तार करणे, रोजगार निर्माण करणे, गुंतवणूक आणि निर्यातीला चालना देणे तसेच ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, वीज यासारख्या सुविधांचे जाळे पसरवून दारिद्र्यनिर्मूलन आणि महिला सक्षमीकरणाचे उद्दीष्ट साध्य करणे, ही अर्थव्यवस्थेसमोरची मोठी आव्हाने आहेत. राज्य सरकारतर्फे चालवल्या जाणाऱ्या बँकांसाठी मोठ्या प्रमाणावरच्या अनुत्पादित मालमत्ता तसेच भांडवलीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल आवश्यकता ही सुध्दा मोठी आव्हाने आहेत.

अर्थसंकल्पासमारेची आव्हाने लक्षात घेतली तर गेल्या चार वर्षांमधे झालेल्या संरचनात्मक सुधारणा आणि योजनांना मिळालेले यश याच्या पार्श्वभूमीवर या वर्षीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. कृषी क्षेत्र, ग्रामविकास, आरोग्य शिक्षण, रोजगार निर्मिती, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांना बळकटी आणण्याच्या पंतप्रधानांच्या ध्येयातून मार्गदर्शन घेऊनच हा अर्थसंकल्प तयार करण्यात आले आहे.

**भारताची अर्थव्यवस्था अडीच हजार अब्ज इतकी मोठी असल्याचे या वर्षीच्या अर्थसंकल्पाने दाखवून दिले आहे. अर्थमंत्र्यांनी आर्थिक वाढीचे ८ टक्क्यांचे लक्ष्य ठरविले आहे. जे अत्यंत समर्पक आहे. त्याचबरोबरच २०१८-१९ या वर्षात विकासदरात सध्याच्या ७.२ टक्क्यांवरून ७.४ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे, असे त्यांनी म्हटले आहे. सन २०१८-१९ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत समतोल तरीही वेगवान वृद्धी होईल आणि जागतिक अर्थव्यवस्थेकरीता महत्त्वाची सकारात्मक भूमिका बजावेल, असे मत अर्थमंत्र्यांनी व्यक्त केले आहे.**

आर्थिक विकास आणि वित्तीय बळकटीकरण- भारताची अर्थव्यवस्था अडीच हजार अब्ज इतकी मोठी असल्याचे या वर्षीच्या अर्थसंकल्पाने दाखवून दिले आहे. अर्थमंत्र्यांनी आर्थिक वाढीचे ८ टक्क्यांचे लक्ष्य ठरविले आहे. जे अत्यंत समर्पक आहे. त्याचबरोबरच २०१८-१९ या वर्षात विकासदरात सध्याच्या ७.२ टक्क्यांवरून ७.४ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे, असे त्यांनी म्हटले आहे. सन २०१८-१९ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत समतोल तरीही वेगवान वृद्धी होईल आणि जागतिक अर्थव्यवस्थेकरीता महत्त्वाची सकारात्मक भूमिका बजावेल, असे मत अर्थमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. 'मेक इन इंडिया' मोहीम यशस्वी करण्याच्या दृष्टीने, कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात इच्छित वाढ करण्यासाठीच्या अत्यंत योग्य तरतुदी अर्थमंत्र्यांनी यावर्षीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केल्या आहेत.

आपल्या देशाची वित्तीय तूट, स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.२ टक्के असल्याबद्दल अर्थमंत्र्यांनी गहन चिंता व्यक्त केली आहे. २०१० साली ६.४ टक्के असलेली वित्तीय तूट आता आंतरराष्ट्रीय स्तरावर संमत असलेल्या पातळीवर आणण्यात आपण यश मिळविले आहे. वित्तीय तूट आटोक्यात आणण्यासाठी हाती घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गेल्या वर्षी भारताच्या विश्वासदर्शक मूल्यात वाढ झाली. हे वाढलेले मूल्य, व्यवसाय करण्यासाठीच्या नियमांचे सुलभीकरण किरकोळ व्यवसायात १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला परवानगी या आणि इतर संरचनात्मक सुधारणांमुळे

आपण ठरवलेला आर्थिक विकासदर गाठणे सहज शक्य होणार आहे.

या वर्षीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला ग्रामीण भागातल्या रोजगार निर्मितीसाठीचा आणि समाज कल्याण योजनांसाठीच्या १४.३४ लाख कोटी रुपयांचा आकर्षक निधी या कामांना नक्कीच प्रगतीपथावर नेईल. सरकारच्या 'गरीबी हटाव' मोहीम यशस्वी करण्याच्या मार्गावरचे हे मोठे पाऊल आहे. सरकारने केलेल्या काही प्रमुख बदलांचा आणि उत्तम आर्थिक विकासाचा फायदा शेतकरी आणि समाजातल्या गरीब तसेच इतर दुर्बल घटकांना मिळावा आणि समाजाच्या अर्धविकसित घटकांच्या उध्दारासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेले विविध कार्यक्रम कौतुकास्पद आहेत. या अर्थसंकल्पामुळे सरकारच्या योजनांचे फायदे ठळकपणे आणि एकत्रितपणे सगळ्यांसमोर मांडले जातील.

कृषी क्षेत्र आणि ग्रामीण अर्थशास्त्र- भारताची अर्थव्यवस्था अजूनही कृषी क्षेत्रावर आधारलेली आहे. सुमारे ४९ टक्के नागरिक सद्य परिस्थितीत शेती क्षेत्रात प्रत्यक्ष कार्यरत आहेत. त्यामुळे खरा भारत ग्रामीण क्षेत्रातच वसलेला आहे, असे म्हणतात ते काही चूक नाही. आतापर्यंत सत्तेवर आलेल्या सर्वपक्षांच्या सत्ताधाऱ्यांनी कृषी क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रीत करुन देखिल कृषी क्षेत्रात कार्यरत सामान्य जनता आणि ग्रामीण भागातले एकूणच जनसामान्य यांना अजूनही लाचारी तसेच गरीबीचे जिणे जगावे लागत आहे. त्यांना अत्यंत अपुऱ्या सोयीसुविधा मिळत आहेत, तिथे योग्य प्रमाणातल्या शैक्षणिक आणि आरोग्य सुविधांची परिपूर्ण अशा ग्रामीण, सामाजिक पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्याकडे लक्ष द्यावे लागेल. कृषी क्षेत्राचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे

**सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला अनुसरुन अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाकांक्षी लक्ष्य निर्धारीत केली आहेत. शेतकऱ्यांना कमीतकमी खर्चात जास्त उत्पादन घेण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत पुरवणे आणि त्यांच्या कृषीमालाला जास्तीत जास्त भाव मिळवून देणे या दोन्हीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढायला मोठी मदत होणार आहे.**

बळकटीकरण करण्याकडे अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात यथार्थपणे लक्ष केंद्रीत केले आहे. सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला अनुसरुन अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाकांक्षी लक्ष्य निर्धारीत केली आहेत. शेतकऱ्यांना कमीतकमी खर्चात जास्त उत्पादन घेण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत पुरवणे आणि त्यांच्या कृषीमालाला जास्तीत जास्त भाव मिळवून देणे या दोन्हीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढायला मोठी मदत होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळायला हवी. त्याबरोबरच शेतीमाल योग्य पध्दतीने, कमी वेळात बाजारापेठेत पोहोचेल याची दक्षता घ्यायला हवी. सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापासून जवळ अशी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली तर मालाच्या वाहतुकीला लागणारा वेळही वाचेल आणि ग्राहकांना ताजा शेतीमाल उपलब्ध झाल्याने योग्य किंमतीत विक्री होऊ शकेल. या सर्व गोष्टी लक्षात घेता, सर्व २३ प्रकारच्या खरीप पिकांसाठी किमान विक्री मूल्य उत्पादन खर्चाच्या दीडपट असले पाहिजे असा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी मांडला आहे. कृषीविषयक बाजारपेठा आणि पायाभूत सुविधांसाठीचा निधी म्हणून अर्थमंत्र्यांनी २००० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली आहे. त्याबरोबरच कृषी उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु होणार असलेल्या 'ऑपरेशन ग्रीन' या नव्या योजनेसाठी ५०० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. भारतातले बहुतांश शेतकरी गरीब आणि दुर्लक्षित पार्श्वभूमीचे असल्यामुळे कृषी कर्जाच्या उपलब्धतेने त्यांना शेती करणे सुलभ होऊन जाते आणि आर्थिक सहाय्याची विवंचना मिटल्याने उत्पादकता वाढवण्यावर ते लक्ष केंद्रित करु शकतात. कृषी कर्जाच्या वितरणाचे लक्ष्य साडेआठ लाख कोटीहून वाढवून ११ कोटीपर्यंत वाढवल्यामुळे शेतकऱ्यांना विशेषत: छोटे आणि गरीब शेतकऱ्यांना खूपच दिलासा मिळेल. मात्र हे वाढीव

कर्ज योग्य लाभार्थी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. या नव्या प्रस्तावांसोबतच अर्थमंत्र्यांनी किसान कर्जाचा फायदा मत्स्यपालन आणि पशुपालन या क्षेत्रांना सुध्दा मिळेल अशी व्यवस्था केली आहे. या क्षेत्रांमधे काम करणाऱ्या व्यक्तींना ह्या निधीचा फायदा होईल आणि त्यांचेही उत्पन्न वाढायला मदत मिळेल. देशातल्या ८६ टक्के छोट्या आणि दुर्लक्षित शेतकऱ्यांच्या कल्याणाची काळजी घेण्यासाठी देशभरातले २२००० ग्रामीण हाट आणि ग्रामीण कृषी बाजारांचा विकास आणि आधुनिकीकरणाची योजना हाती घ्यायची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. त्याबरोबरच १२९० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीद्वारे ४२ मेगा फूड पार्कची उभारणी करण्याचीही योजना आहे. या दोन्हींमुळे कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढायला मोठी मदत होणार आहे. कापणीच्या हंगामानंतरची करातली सवलत आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना १०० टक्के सूट यामुळेही कृषी उत्पादन वाढवायला मदत होईल. त्याबरोबरच १०० अब्ज डॉलर्स किमतीच्या शेतीमालाच्या निर्यातीचे लक्ष्य गाठण्यासाठीच्या प्रयत्नांमुळे येत्या काळात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढायला मदत होईल. शेतीच्या सिंचनासाठी सौरऊर्जेवर चालणारे पाण्याचे पंप बसवण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात केलेली तरतूद कौतुकास्पद आहे. मत्स्यपालन आणि पशुपालन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना सुध्दा किसान क्रेडीट कार्डची सुविधा उपलब्ध करुन देता आली तर त्यांना त्यांच्या व्यवसायासाठीच्या कर्जाची गरज भागेल आणि आपोआपच त्यांचेही उत्पन्न वाढेल.

ग्रामीण अर्थव्यवस्था -नव्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या विविध योजनांद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेतून गरीबी हद्दपार

---

**'सन २०२२ पर्यंत प्रत्येकासाठी घर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी २०१९ पर्यंत ग्रामीण भागात एक कोटींपेक्षा जास्त घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत याआधीच बांधलेल्या ६ कोटी शौचालयांखेरीज आणखीन २ कोटी स्वच्छतागृहांच्या बांधणीमुळे देखिल ग्रामीण जनतेचे जीवन सुसह्य व्हायला मदत होणार आहे. त्याचप्रमाणे २०१८-१९ या वर्षी राष्ट्रीय रोजगार योजनेसाठी दिलेले ५७५० कोटी आणि सामाजिक सुरक्षा योजनेसाठी दिलेले ९९७५ कोटी रुपये यांचा देखिल खूप उपयोग होणार आहे.**

---

करण्याचा प्रयत्न अर्थमंत्री गंभीरपणे करताना दिसत आहेत. गरीब स्त्रियांसाठीच्या उज्ज्वला योजनेतून सुमारे आठ कोटी मोफत गॅस जोडण्या मंजूर करुन अर्थमंत्र्यांनी गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांची काळजी घेतली आहे. त्याबरोबरच मोफत वीज जोडणीसाठीच्या सौभाग्य योजनेसाठी १६००० कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे ४ कोटी गरीब कुटुंबांना घरात वीज उपलब्ध झाली आहे. या विविध योजनांच्या अंमलबजावणीमुळे इंधन जाळणे आणि जंगलतोडीचे प्रमाण कमी होईल आणि महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण महिलांचे जीवन अधिक सुकर होईल. त्यांच्या समस्या कमी होतील. 'सन २०२२ पर्यंत प्रत्येकासाठी घर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी २०१९ पर्यंत ग्रामीण भागात एक कोटींपेक्षा जास्त घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत याआधीच बांधलेल्या ६ कोटी शौचालयांखेरीज आणखीन २ कोटी स्वच्छतागृहांच्या बांधणीमुळे देखिल ग्रामीण जनतेचे जीवन सुसह्य व्हायला मदत होणार आहे. त्याचप्रमाणे २०१८-१९ या वर्षी राष्ट्रीय रोजगार योजनेसाठी दिलेले ५७५० कोटी आणि सामाजिक सुरक्षा योजनेसाठी दिलेले ९९७५ कोटी रुपये यांचा देखिल खूप उपयोग होणार आहे. या सगळ्या योजनांमुळे भारतीय स्त्रियांचा सन्मान वाढायला मदत होणार आहे. मात्र या सगळ्या योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीच्या अभावामुळे या सर्व प्रशंसनीय योजना पूर्णत्वाला जातील का, याबाबत साशंकता व्यक्त होऊ शकते. प्रत्येक यंत्रणेत तळापासून असलेल्या वाढत्या भ्रष्टाचारामुळे शासकीय योजनांचे

फायदे त्या त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू शकत नाहीत.

'शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा' - कोणत्याही देशातल्या नागरिकाचे शिक्षण आणि आरोग्य उत्तम दर्जाचे असणे हे शाश्वत समतोल समाजाच्या बांधणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. देशाची संपत्ती वाढवण्यासाठी हातभार लागावा म्हणून मानव संसाधनांच्या स्त्रोतांचा उत्तम वापर करुन घेणे तसेच उत्तम दर्जाच्या जीवनमानासाठी शिक्षणाचा उत्तम उपयोग होतो तर उत्तम आरोग्यसेवांमुळे या मानवी संसाधनांच्या स्त्रोतांना योग्य स्थितीत ठेवायला मदत होते. चांगले आरोग्य ही निसर्गाने जगाला दिलेली सर्वात महत्त्वाची भेट आहे. देशातील नागरिकांचे शिक्षण, आरोग्य आणि रोजगार याबद्दल अर्थमंत्र्यांना चिंता आहे हे पाहून मला आनंद होत आहे. इतर ब्रिक्स (BRICKS) देशांच्या तुलनेत आपल्या देशातल्या एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापैकी आरोग्य क्षेत्राला दिलेला वाटा बराच कमी आहे. उदाहरणार्थ चीन हा देश त्यांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.२ टक्के उत्पन्न आरोग्यविषयक प्रश्नांसाठी खर्च करतो, तर भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त १.४ टक्के उत्पन्न आरोग्य क्षेत्रासाठी ठेवले आहे. शिक्षण क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांसाठी अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेली १ लाख कोटी रुपयांची तरतूद नियोजन आणि वास्तु विशारदशास्त्राला वाहिलेल्या दोन नव्या विद्यालयांची उभारणी, दर तीन लोकसभा मतदारसंघांमागे एक नवीन वैद्यकीय महविद्यालय उभारण्याच्या घोषणेसह एकूण २४ नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या निर्मितीचा मानस आणि रुग्णालयांचे आधुनिकीकरण करुन त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात रुपांतरीत करण्याची योजना - या सगळ्यांमुळे भविष्यात देशभरातल्या सर्व नागरिकांच्या हाकेच्या अंतरावर वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर वर्ष २०२० पर्यंत मध्यम आणि निम्न मध्यमवर्गातल्या बुध्दीमान युवकांसाठी ५० लाख रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. यामुळे हे विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासह इत सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणासाठी उत्तम संस्थांमध्ये प्रवेश घेऊ शकतील. हा ही अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. आयुष्यमान भारत कार्यक्रमांतर्गत १२०० कोटी रुपये खर्चून नागरिकांच्या राहण्याच्या ठिकाणांजवळ दीड लाख आरोग्य केंद्रे उभारण्याची अर्थसंकल्पातली व्यवस्था उल्लेखनीय आहे. क्षयरोगग्रस्तांना पोषक आहार पुरवण्यासाठी अर्थव्यवस्थेत मोठ्या निधीची तरतूद करण्याचा अर्थमंत्र्यांचा विचार स्वागतार्ह आहे. या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी सर्वसामान्यांसाठी जाहीर केलेली जगातली सर्वात मोठी सरकारी आरोग्य सुविधा (राष्ट्रीय आरोग्य सुरक्षा योजना) देशातल्या १० कोटी गरीब आणि कमकुवत कुटुंबांमधल्या जवळजवळ ५० कोटी लाभार्थ्यांसाठी वरदान ठरणार आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला रुग्णालयातल्या (दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकारच्या) उपचारांसाठी ५ लाख रुपयांची मदत मिळणार असल्यामुळे ही योजना जाहीर करुन अर्थमंत्र्यांनी मोठी मजल मारली आहे. या प्रकारच्या योजनेच्या अंमलबजावणीमुळे विमा व्यवसायालादेखील चांगले दिवस येतील आणि देशात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सुमारे दीड लाख आरोग्य सुविधा केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालये आणि सरकारी खर्चातून सुरु असलेले आरोग्यविषयक कार्यक्रम, या सगळ्यांमुळे रोजगार निर्मितीला चालना मिळेलच, त्याचबरोबर

**इतर ब्रिक्स (BRICKS) देशांच्या तुलनेत आपल्या देशातल्या एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापैकी आरोग्य क्षेत्राला दिलेला वाटा बराच कमी आहे. उदाहरणार्थ चीन हा देश त्यांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.२ टक्के उत्पन्न आरोग्यविषयक प्रश्नांसाठी खर्च करतो, तर भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त १.४ टक्के उत्पन्न आरोग्य क्षेत्रासाठी ठेवले आहे.**

देशातल्या जनतेच्या आरोग्याची पूर्वीपेक्षा जास्त चांगली काळजी घेतली जाईल. ह्या सगळ्या नव्या व्यवस्थेमुळे विविध प्रदेशातल्या नागरिकांना त्यांच्या परिसरातच उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील आणि वैद्यकीय उपचारांसाठी मोठ्या शहरांमधे जाणे आणि तिथे राहण्या-खाण्यापासून सगळ्या अडचणींना सामोरे जाण्यापासून त्यांची सुटका होईल.

प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत सुरु केलेल्या १६ कोटी बँक खात्यांच्या खातेधारकांना सूक्ष्म वित्त पुरवठा आणि निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत आणण्याची नवी योजना खूप विचारपूर्वक आखलेली आहे. सामाजिक अंतर्भाव योजनेच्या अंतर्गत ५२ हजार ७१९ रुपयांची तरतूद मागासवर्गीय जातींच्या कल्याणासाठी, तर ३९ हजार १३९ कोटी रुपये मागासवर्गीय जमातींच्या कल्याणासाठी वेगळे ठेवण्याच्या निर्णयामुळे मागासवर्गीय जाती आणि जमातींमधल्या लोकांना मोठीच मदत मिळाणार आहे. नवोदय विद्यालयांप्रमाणेच ५० टक्क्यांपेक्षा जास्त मागासवर्गीय जमातींच्या लोकांची संख्या असलेल्या प्रत्येक गटासाठी एकलव्य शाळेची उभारणी करण्याचा देखिल प्रस्ताव आहे. नव्याने नोकरीला लागलेल्यांसाठी सर्व क्षेत्रांमधे उत्पन्नाच्या १२ टक्के इतकी रक्कम पहिली तीन वर्षे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करायची तरतूद अर्थसंकल्पात आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी भविष्य निर्वाह निधीत जमा करायची रक्कम पहिल्या तीन वर्षांसाठी कमी करुन ८ टक्के करण्यात आली आहे.

'पायाभूत सुविधा आणि औद्योगिक क्षेत्र' - पायाभूत सुविधांचा विकास ही अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना देणारी गुरुकिल्ली आहे हे लक्षात घेऊन अर्थमंत्र्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासाकडे इतर क्षेत्रांच्या बरोबरीने लक्ष दिले आहे. देशभरात सर्वत्र रस्ते, विमानतळ, रेल्वे, बंदरे तसेच देशांतर्गत जलवाहतूक यांचे जाळे पसरविण्यासाठी अर्थमंत्र्यांनी २०१८-१९ या वर्षाकरता ५.९७ लाख कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली आहे. पर्यटनाला अजून जोरदार चालना देण्यासाठी धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या दहा मुख्य पर्यटन स्थळांचा विकास करुन तिथे धार्मिक पर्यटन स्थळांची उभारणी करण्यासाठी पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकास, योग्य तंत्रज्ञान, विकसित करणे, खाजगी गुंतवणुकदारांना या कामी गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करणे, ब्रँडींग आणि वितरण व्यवस्था मजबूत करणे, या आणि इतर स्वागतार्ह घोषणा अर्थमंत्र्यांनी केल्या आहेत. ही कामे झाल्यानंतर किंवा होताना रोजगार निर्मिती देखिल होईल आणि परिणामत: देशाचा आर्थिक विकास साधला जाईल. रेल्वे विभाग, हवाई विभाग यांचे आधुनिकीकरण आणि अर्थव्यवस्थेच्या डिजिटलीकरणासाठी मोठी रक्कम ठेवण्यात आली आहे. मानवरहित रेल्वे क्रॉसिंग असलेली फाटक काढून टाकणे रेल्वे स्थानकांमधे सरकते जिने तसेच वाय-फाय सुविधा आणि सीसीटीव्ही इत्यादी सोयी करण्यासाठी रेल्वे विभागाला निधी मंजूर करण्यात आला आहे. मुंबईचे रेल्वेचे जाळे विस्तारण्यासाठी तसेच देखभालीसाठी ११ हजार कोटी रुपये तर बेंगलुरु मेट्रोच्या कामासाठी १७००० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात प्रस्तावित केला आहे. जेणेकरुन या महानगरांच्या गरजा व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकतील. गावांमधे ब्रॉडबँड सेवेचा विस्तार वाढविण्यासाठी तसेच ग्रामीण नागरिकांना इंटरनेटची जोडणी देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सरकारच्या डिजिटल इंडिया या कार्यक्रमाला

---

**५२ हजार ७१९ रुपयांची तरतूद मागासवर्गीय जातींच्या कल्याणासाठी, तर ३९ हजार १३९ कोटी रुपये मागासवर्गीय जमातींच्या कल्याणासाठी वेगळे ठेवण्याच्या निर्णयामुळे मागासवर्गीय जाती आणि जमातींमधल्या लोकांना मोठीच मदत मिळाणार आहे. नवोदय विद्यालयांप्रमाणेच ५० टक्क्यांपेक्षा जास्त मागासवर्गीय जमातींच्या लोकांची संख्या असलेल्या प्रत्येक गटासाठी एकलव्य शाळेची उभारणी करण्याचा देखिल प्रस्ताव आहे.**

---

प्रोत्साहन देण्यासाठी दूरसंचार सेवांची पायाभूत उभारणी आणि दूरसंचार सेवेचा सर्वदूर प्रसार या कामांसाठी २०१८-१९ या वर्षात १०००० कोटींची मदत देण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडला आहे.

देशातल्या कंपन्यांपैकी ९९ टक्के भाग असणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांबाबत अर्थमंत्र्यांनी सतर्कता दाखवली आहे. या उद्योगांना कर्ज पुरवठा, व्यवसायासाठी निधी आणि कर्जावरच्या व्याजात अनुदान तसेच व्यवसायात नवनवीन प्रयोगांद्वारे विकासाच्या नव्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहन देता यावे म्हणून अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात ३७९४ कोटी रुपयांचा निधी या उद्योगांसाठी राखून ठेवला आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठीच्या शर्तींमधे काही प्रमाणात बदल केल्यामुळे, उदाहरणार्थ कारखाने, यंत्रसामुग्री तसेच आवश्यक उपकरणांसाठीच्या गुंतवणुकीची मर्यादा, वार्षिक ५० कोटी रुपयांवरुन वार्षिक २५० कोटी रुपयांपर्यंत वाढवणे आणि या उद्योगांवरच्या कराचा बोजा २५ टक्क्यांपर्यंत कमी करणे, यांसारख्या उपाययोजनांमुळे त्यांना व्यवसाय करणे अधिक सुलभ होईल, त्यांच्या विकास आणि वाढीला चालना मिळेल. तसेच नव्या वस्तू आणि सेवा कराच्या नव्या कर पध्दतीमध्ये स्वत:ला सामावणे या उद्योजकांना सोपे जाईल. 'मुद्रा' कर्जयोजनेच्या माध्यमातून या उद्योगांना जास्त कर्ज वितरीत करता यावे, यासाठी अर्थमंत्र्यांनी ३ लाख कोटी रुपये सुध्दा मंजूर केले आहेत. वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी सन २०१८-१९ या वर्षी ७१४८ कोटी रुपये खर्चाच्या विविध योजना राबवण्याचा विचार अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या क्षेत्रातल्या रोजगार संधींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल आणि विकासाला चालना मिळेल.

---

**देशातल्या कंपन्यांपैकी ९९ टक्के भाग असणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांबाबत अर्थमंत्र्यांनी सतर्कता दाखवली आहे. या उद्योगांना कर्ज पुरवठा, व्यवसायासाठी निधी आणि कर्जावरच्या व्याजात अनुदान तसेच व्यवसायात नवनवीन प्रयोगांद्वारे विकासाच्या नव्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहन देता यावे म्हणून अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात ३७९४ कोटी रुपयांचा निधी या उद्योगांसाठी राखून ठेवला आहे.**

---

'रोजगाराच्या संधी' - सध्या देशातल्या सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण लक्षणीय आहे. बेरोजगारीमुळे तरुणांमध्ये निराशाजनक वातावरण तयार होते आणि ते गैरमार्गाला लागण्याचा धोका वाढतो म्हणून या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या मुद्याचा विचार करुन यावर्षीच्या अर्थसंकल्पात अधिकाधिक रोजगारनिर्मिती करण्यावर योग्य भर दिला आहे. रोजगारनिर्मितीसाठी अर्थसंकल्पात ७० लाख रोजगार संधी उपलब्ध करुन देण्याची योजना प्रस्तावित आहे. कार्यालयांमधल्या औपचारिक नोकऱ्यांबरोबरच पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, विमानतळ आणि हेलिपॅड्स, ग्रामीण भागातल्या सुविधा, ग्रामीण आणि शहरी भागांना एकमेकांशी जोडण्याच्या दृष्टीने उभारलेली कामे या सगळ्यातून रोजगारांच्या संधी निर्माण करायला प्रोत्साहन देणे आणि लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे या दोन्ही गोष्टी साध्य करता येतील. रोजगार निर्मितीसाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात सरकारने जाहीर केलेल्या योजना कौतुकास्पद आहेतच. देशातल्या बेकारी आणि बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फायनान्स' या संस्थेने केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष 'फायनान्स इंडिया' या त्रैमासिकात प्रसिध्द झाले आहेत. यात सुचवल्यानुसार देशातल्या उपलब्ध रोजगार संधींचे योग्य व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीने 'नॅशनल लेबर एक्स्चेंज' ची स्थापना करण्याबाबत सरकार विचार करु शकेल. कृषी क्षेत्र, शिक्षण, आरोग्य तसेच पायाभूत सुविधा यातल्या समाज कल्याण योजनांसाठी मोठा निधी देऊन आणि निर्गुंतवणुकीसाठी ८०००० कोटी रुपयांचे मोठे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून अर्थमंत्र्यांनी वित्तीय तूट ३.३

टक्के राखण्यात आणि कोणत्याही अतिरिक्त कराचा बोजा न ठेवता विकास दराचे लक्ष्य स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७.२ ते ७.४ टक्के ठेवण्यात यश मिळवले आहे ही खरोखरीच कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे.

'करांचे प्रस्ताव' - देशाच्या अर्थव्यवस्थेत स्थिरता राखण्यासाठी कर धोरणात कमीत कमी बदल करणे इष्ट असते. या मुद्याला अनुसरुन अर्थमंत्र्यांनी व्यक्तिगत आणि व्यावसायिक अशा दोन्ही पातळ्यांवरच्या करांच्या दरात काहीही बदल केले नाहीत. नोकरीपेशा वर्गाला दिलासा देण्याच्या दृष्टीने त्यांनी ४०००० रुपयांची प्रमाणित करवजावट लागू केली आहे. मात्र प्रवासभत्ता सवलत काढून घेतली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक स्थितीबाबत अर्थमंत्र्यांनी अत्यंत संवेदनशील दृष्टीकोन ठेवला आहे. बँका किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जेष्ठ नागरिकांनी गुंतवलेल्या पैशाच्या कलम १९४ ए अंतर्गत करमुक्त व्याजाची मर्यादा १०००० वरुन ५०००० पर्यंत वाढवण्यात आली आहे. आरोग्यविम्याचा हप्ता तसेच वैद्यकीय खर्चाची करमुक्त मर्यादा कलम ८० डी खाली ३०००० वरुन वाढवून ५०००० करण्यात आली आहे. याचा मध्यम वर्गाला मोठा लाभ होणार आहे. दीर्घ मुदतीच्या इक्विटी म्युचअल फंडातून मोठ्या वर्गाला ३.६ लाख कोटींचे उत्पन्न होते. या उत्पन्नावर कर बसवण्यासाठी सध्या कोणताही कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे अर्थमंत्र्यांनी म्युच्युअल फंडातून मिळणाऱ्या उत्पन्नावर १० टक्के कर बसवला हे योग्यच आहे. ऑक्टोबर २००४ पूर्वीच्या दीर्घ मुदतीच्या म्युच्युअल फंडाच्या योजनांवर २० टक्के कर बसवायला हवा. इक्विटी म्युच्युअल फंडाच्या प्रत्येक लाभांशावर १० टक्के कर भरण्याचा निर्बंध नव्या अर्थसंकल्पात घालण्यात आला आहे. अर्थात यामूळे म्युच्युअल फंड कंपन्यांकडून गुंतवणुकीदारांना दिल्या जाणाऱ्या भरघोस लाभांशाच्या रकमेत काटछाट होणार आहे. म्युच्युअल फंड विक्रेत्यांकडून या कराविरोधात तीव्र प्रतिक्रिया येणे स्वाभाविक आहे. या करासोबतच मोठ्या प्रमाणावर सामाजिक सुरक्षा योजना राबवण्यासाठी लागणारा महसूल मिळवण्याचा मार्ग म्हणून १ टक्के शिक्षण अधिभार (करावर कर) लावण्याचा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी दिला आहे. करातून सूट मिळण्याची किमान उत्पन्न मर्यादा ३ लाख केल्यानंतर मिळणारे १५००० कोटी रुपयांचे उत्पन्न आता मिळणार नसले तरी अर्थसंकल्पातील इतर अनेक प्रस्तावांमुळे ही हानी भरुन काढता येईल. दीर्घ मुदतीच्या म्युच्युअल फंडांची यादी करुन त्यांच्या परताव्यावर २० टक्के कर लावल्यामुळे देखिल हानी भरुन काढायला मदत मिळेल.

**कृषी क्षेत्र, शिक्षण, आरोग्य तसेच पायाभूत सुविधा यातल्या समाज कल्याण योजनांसाठी मोठा निधी देऊन आणि निर्गुंतवणुकीसाठी ८०००० कोटी रुपयांचे मोठे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून अर्थमंत्र्यांनी वित्तीय तूट ३.३ टक्के राखण्यात आणि कोणत्याही अतिरिक्त कराचा बोजा न ठेवता विकास दराचे लक्ष्य स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७.२ ते ७.४ टक्के ठेवण्यात यश मिळवले आहे ही खरोखरीच कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे.**

औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा आणि त्यात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी अडीचशे कोटी रुपयांपर्यंतचा वार्षिक व्यवसाय करणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवरचा व्यावसायिक कर कमी करुन तो २५ टक्के करण्यात आला आहे. ही करकपात आणि व्यक्तिगत कररचनेतली सूट यामुळे ५९९५ कोटी रुपयांची महसूली तूट येणार आहे. तरीही महसूली तूट भरुन काढण्याबरोबरच 'मेक इन इंडिया' मोहिमेला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी काही वस्तुंवर २.५ टक्के ते १० टक्के वाढीव सीमाशुल्क बसवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. सुगंधी द्रव्ये आणि सौंदर्यप्रसाधनांवर १० टक्के, वाहने आणि वाहनांच्या सुट्या भागांवर ५ टक्के, पादत्राणांवर १० टक्के, नकली दागिन्यांवर ५

टक्के, इलेक्ट्रॉनिक आणि संगणकांचे सुटे भाग यावर ५ टक्के, फर्निचरवर १० टक्के, भिंतीवरची, मनगटावरची तसेच इतर घड्याळे यांच्यावर १० टक्के, लहान मुलांची खेळणी आणि खेळाच्या सामग्रीवर १० टक्के, कपड्यांवर १० टक्के, वनस्पतीजन्य खाद्य तेलावर १५ ते १७.५ टक्के, इत्यादींवर वाढीव सीमाशुल्क लावले असले तरी काही भांडवली वस्तू आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरचे सीमाशुल्क ५ टक्क्यांनी, वैद्यकीय उपचारांसाठी लागणाऱ्या उपकरण आणि यंत्रांवरचे सीमाशुल्क २.५ टक्क्यांनी तर इतर काही पदार्थांचे सीमाशुल्क २.५ टक्क्यांनी कमी देखिल केले आहे. याचा परिणाम म्हणून ज्यांचे सीमा शुल्क वाढवण्यात आले आहे. त्या वस्तू आता महाग होतील तर इतर काही वस्तू पूर्वीपेक्षा स्वस्त दराने उपलब्ध होतील.

**निष्कर्ष :**

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अत्यंत विचारपूर्वक आणि परिश्रमपूर्वक, सर्वसमावेशक असा अर्थसंकल्प सादर केला आहे. देशातल्या ८० टक्क्यापेक्षा जास्त जनतेच्या गरजा, अपेक्षा आणि आकांक्षांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प म्हणजे सरकारने बाजारावर आधारीत अर्थव्यवस्थेकडून सर्वसामान्यांच्या कल्याणाचा विचार करण्याकडे उचललेले विचारी पाऊल म्हणावे लागेल.

सन २०१८-१९ चा म्हणजे यंदाचा अर्थसंकल्प हा सामान्य लोकांचा विचार करणारा प्रगतीशील, समतोल आणि नेहमीच्या सरधोपट मार्गापेक्षा वेगळी वाट धरणारा आहे. या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्र, ग्रामीण विकास, शिक्षण रोजगार निर्मिती आणि गुंतवणुकीवर भर दिलेला असल्यामुळे हा विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प ठरेल. परवडण्याजोगी घरे उपलब्ध होण्यासाठी, बांधकाम क्षेत्राला उर्जितावस्था देण्यासाठी, विकासाला चालना देणे, अर्थव्यवस्थेच्या डिजिटलीकरणाला प्रोत्साहन देणे आणि व्यवसाय करताना येणाऱ्या समस्या दूर करुन व्यवसाय करणे सोपे करण्यासाठीचे सर्व उपाय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात बारकाईने मांडले आहेत. कृषी आणि उद्योग क्षेत्रावर सरकार करत असलेल्या मोठ्या खर्चाने या क्षेत्रांमधली मरगळ दूर होईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हायला हवा. त्याचबरोबर या क्षेत्रात काही संरचनात्मक सुधारणा करण्याची गरज आहे. पण हे सर्व बदल एकट्या अर्थसंकल्पातल्या तरतुदींमुळे होणारे नाहीत. त्याचप्रमाणे सर्व पातळ्यांवरची शिक्षणपध्दती, कायदा आणि न्यायदानाची पध्दत यामधे देखिल मुळापासूनच काही सुधारणा होणे आवश्यक आहे. सध्याची देशाची यंत्रणा अर्थव्यवस्था आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करु शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे. रुळलेल्या ठराविक पध्दतीने विचार न करता थोडा वेगळ्या वाटेने यासाठी काही परिणामकारक विचार करुन नीती आयोगाने काम करायला हवे. आताच्या यंत्रणेत राहूनच सर्व कामे करणे आणि अगदी थोडया प्रमाणात बदल करणे यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी फार काही करता येणे शक्य नाही. थोडक्यात २०१८-१९ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा ''गरीबी हटाव, किसान बचाओ'' अर्थसंकल्प आहे.

■■■

*लेखक अर्थशास्त्राचे नामांकित प्राध्यापक असून प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.*

*email : jda@iif.edu*


**आगामी अंक**

**इशान्य भारत**

**एप्रिल २०१८**

# अर्थव्यवस्थेला पुढे घेऊन जाणारा अर्थसंकल्प

हसमुख अधिया




**अर्थसंकल्पात ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी स्वयंसहायता बचत गट, महिला बचत गट यांना या निधितून तसेच बँकेद्वारे होणाऱ्या पतपुरवठ्यातून लाभ मिळणार आहेत. त्याशिवाय अन्नप्रक्रिया उद्योग आणि पशुपालन क्षेत्रासाठीही भरीव निधी देण्यात आला आहे. यामुळे कृषिसंलग्न उद्योगांना चालना मिळेल. तसेच मूळ कृषी उत्पादनाशिवाय सहउत्पादन तयार करण्यास वाव मिळू शकेल.**

केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ या अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. केंद्र सरकारने गेल्या दोन वर्षात केलेल्या महत्वाच्या वित्तीय सुधारणा- विमुद्रीकरण आणि वस्तू आणि सेवाकराच्या अंमलबजावणीमुळे अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झाले आहेत. सध्या अर्थव्यवस्थेची परिस्थिती आशादायक असताना, सर्वच निदर्शक अर्थव्यवस्था सुधारण्याचे संकेत देत असतांना, त्या आधारावर हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. आगामी काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ८ टक्क्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी वातावरण तयार व्हावे यादृष्टीने हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे.

हा अर्थसंकल्प इतर अर्थसंकल्पांपेक्षा अनेक दृष्टीने वेगळा आहे. या अर्थसंकल्पाचा मुख्य भर कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढवता येईल, तसेच वस्तू आणि सेवांची मागणी वाढवल्यास खाजगी गुंतवणूकीतही वाढ होईल. अर्थसंकल्पात ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी स्वयंसहायता बचत गट, महिला बचत गट यांना या निधितून तसेच बँकेद्वारे होणाऱ्या पतपुरवठ्यातून लाभ मिळणार आहेत. त्याशिवाय अन्नप्रक्रिया उद्योग आणि पशुपालन क्षेत्रासाठीही भरीव निधी देण्यात आला आहे. यामुळे कृषिसंलग्न उद्योगांना चालना मिळेल. तसेच मूळ कृषी उत्पादनाशिवाय सहउत्पादन तयार करण्यास वाव मिळू शकेल. टमाटो, कांदा आणि बटाटा या तीन भाज्यांच्या किमतींमध्ये सातत्याने होणारे चढउतार लक्षात घेऊन या किमती स्थिर ठेवण्यासाठी सरकारने 'ऑपरेशन ग्रीन या नव्या योजनेची घोषणा केली आहे. दुग्धक्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या ऑपरेशन फ्लड या योजनेच्या धर्तीवर ऑपरेशन ग्रीन्स ही योजना कार्य करेल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीला ५०० कोटी रुपयांची

तरतूद करण्यात आली आहे. यातून उत्पादन आणि खरेदी केंद्रे एकमेकांशी जोडली जाणार असून त्यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच या भाज्यांच्या वाहतुकीचीही सोय करण्यात आली आहे. गरज असेल त्यावेळी, शेतकरी उत्पादक संघटनेच्या मदतीने या भाज्यांच्या साठवणुकीसाठी गोदामे आणि प्रक्रिया उपकरणेही तयार केली जातील.

याच अर्थसंकल्पात आणखी एक महत्वाची घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेनुसार, १०० कोटींपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या शेतमाल उत्पादक संघटनांना करातून सवलत दिली जाईल. या सवलतीमुळे अन्नप्रक्रिया क्षेत्रात व्यावसायिकता वाढण्यास मदत होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणांमुळे ३२१ कोटी व्यक्तींसाठी रोजगार निर्माण होईल. तसेच, ग्रामीण भागात ५१ लाख नवी घरे, १.८८ कोटी शौचालये, ३. १७ लाख किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले जातील. यामुळे १. ७५ कोटी घरांमध्ये वीजपुरवठा केला जाईल. तसेच कृषी उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल.

या केंद्रीय अर्थसंकल्पातील दुसरी अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे यात आरोग्य, शिक्षण आणि इतर सामाजिक सुरक्षा योजनांवर देण्यात आलेला भर ! शिक्षणक्षेत्रात, शिक्षणाची,शिक्षकांची गुणवत्ता वाढवणे आणि पूरक शिक्षणासाठी डिजिटल साधनांचा वापर, यावर

**१०० कोटींपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या शेतमाल उत्पादक संघटनांना करातून सवलत दिली जाईल. या सवलतीमुळे अन्नप्रक्रिया क्षेत्रात व्यावसायिकता वाढण्यास मदत होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणांमुळे ३२१ कोटी व्यक्तींसाठी रोजगार निर्माण होईल. तसेच, ग्रामीण भागात ५१ लाख नवी घरे, १.८८ कोटी शौचालये, ३. १७ लाख किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले जातील. यामुळे १. ७५ कोटी घरांमध्ये वीजपुरवठा केला जाईल.**

भर देण्यात आला आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात, येत्या चार वर्षात, देशभरात, एम्स सारख्या महत्वाच्या उच्चशिक्षण संस्था स्थापन करणे, यासाठी अर्थसंकल्पाबाहेर निधीची तरतूद केली जाणार असून एक लाख कोटी खर्च अपेक्षित आहे.

आरोग्य क्षेत्रात, सरकारने जाहीर केलेल्या आरोग्य भारत योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य सुविधा आणि आरोग्य संरक्षण योजनेसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. यानुसार, दारिद्र्यरेषेखाली असलेल्या प्रत्येक कुटुंबासाठी मध्यम स्वरूपाचे आजार आणि प्रादेशिक स्तरावरील आजारापासून संरक्षण मिळवण्यासाठी ५ लाख रुपयांचे आरोग्यकवच देण्यात आले आहे. या महत्वाकांक्षी कार्यक्रमात १० कोटी कुटुंबाना (५० कोटी व्यक्तींना) आरोग्य संरक्षण दिले जाईल. या कुटुंबाना वार्षिक ५ लाख रुपयांचे संरक्षण मिळणार असून कोणत्याही आजारावरील ५ लाख रुपयांपर्यंतची शस्त्रक्रिया करण्यासाठी या योजनेत अंतर्भूत असलेल्या खाजगी किंवा इतर रुग्णालयात एकही पैसा लागणार नाही. गरीब कुटुंबात कोणालाही कर्करोग, हृदयविकार अथवा मूत्रपिंडाचा गंभीर आजार झाल्यास, या योजनेनंतर्गत त्याची काळजी सरकार घेईल.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये लघु आणि मध्यम उद्योगांना सहाय्य करण्यासाठी योजना घोषित करण्यात आली आहे, या क्षेत्रातून मोठी रोजगार निर्मिती करण्यावर सरकारचा विशेष भर आहे. या क्षेत्रातल्या नव्या रोजगारांमध्ये, रोजगाराच्या १२ टक्के वाटा, जो कंपनीकडून दिला जातो, त्याची जबाबदारी सरकार उचलेल. वस्त्रोद्योग आणि

चर्मोद्योग क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने काही उपाययोजना जाहीर केल्या आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासात सरकारने, सध्या काम सुरु असलेले तसेच नवीन रस्ते, रेल्वेप्रकल्प आणि नागरी पायाभूत प्रकल्पांना निधी पुरवठा करण्याची घोषणा केली आहे. या प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित निधीशिवाय इतर तरतूद तसेच, कर्ज देण्याची सोय केली जाईल. पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढच्या वर्षी ५.९७ लाख कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. २०१७-१८ या वर्षात ४.९४ लाख कोटी रुपये खर्च अंदाजित आहे .

वस्तू आणि सेवाकर लागू झाल्यानंतर अर्थव्यवस्थेत होणारे बदल आणि अप्रत्यक्ष करसंकलनातील अनिश्चितता असतानाही , या अर्थसंकल्पात, वित्तीय तूट मर्यादित राखण्याबद्दल एक आराखडा तयार करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी सकळ राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत वित्तिय तुटीचे लक्ष्य सुधारून ३. २ टक्क्यांवरुन ३ टक्के करण्यात आले आहे. पुढच्या वर्षी हे उद्दिष्ट ३. ३ टक्के ठेवण्यात आले आहे. या दोन वर्षात( शक्य असल्यास एकाच वर्षात) वित्तीय तूट ३ टक्यांपर्यंत कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न असेल. २०१८-१९ या आर्थिक वर्षात विमुद्रिकरण आणि वस्तू आणि सेवाकराची अंमलबजावणी यामुळे अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या सकारात्मक परिणामांमुळे, महसूलात वाढ होईल अशी अपेक्षा आहे. तसे झाल्यास, सरकारच्या योजना राबवण्यासाठी अधिक निधी उपलब्ध होऊ शकेल.

सर्वसमावेशक दृष्टीने बघितल्यास, हा अर्थसंकल्प विकासाचा अर्थसंकल्प आहे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी देणारा, रोजगारनिर्मिती करणारा हा अर्थसंकल्प आहे.

■■■



*लेखक केंद्रीय वित्तसचिव असून सरकारमधील अनेक महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले आहे.*





विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

## सुवर्णसंधी!


योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

विश्लेषण

# जिल्ह्यांचे विकासपरिवर्तन - एक विकासात्मक प्रवास

**अमिताभ कांत**



**आर्थिक पातळीवर सकारात्मक विकास आहे, मात्र आपल्या सामाजिक क्षेत्रासमोर विविध आव्हाने आहेत. १८८ देशांच्या मानव विकास निर्देशांकात भारताचे स्थान १३१ आहे आणि युएनडीपीने जाहीर केलेल्या जागतिक भूक निर्देशांकात ११९ देशांमध्ये भारताचे स्थान १०० वे आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानूसार (एनएफएचएस) प्रत्येकी दोन महिलांमागे एक महिला ॲनेमिक आहे, प्रत्येकी तीन बालकांपैकी एक वाढ खुंटलेले आहे.**

भारताची विकासाकडे वेगाने घोडदौड सुरु आहे. जागतिक बँक, मूडीज गुंतवणूक संस्था सारख्या संस्थांनी भाकित केले आहे की, भारताची अर्थव्यवस्था २०१८ मध्ये सुद्धा वेगाने विकास करणारी अर्थव्यवस्था असेल. जागतिक बँकेने नुकताच प्रकाशित केलेल्या अहवालात व्यवसायसुलभता यामध्ये भारताने ४२ व्या स्थानी झेप घेतल्याचे नमूद केले आहे.

आर्थिक पातळीवर सकारात्मक विकास आहे, मात्र आपल्या सामाजिक क्षेत्रासमोर विविध आव्हाने आहेत. १८८ देशांच्या मानव विकास निर्देशांकात भारताचे स्थान १३१ आहे आणि युएनडीपीने जाहीर केलेल्या जागतिक भूक निर्देशांकात ११९ देशांमध्ये भारताचे स्थान १०० वे आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानूसार (एनएफएचएस) प्रत्येकी दोन महिलांमागे एक महिला ॲनेमिक आहे, प्रत्येकी तीन बालकांपैकी एक वाढ खुंटलेले आहे, तर प्रत्येकी चार बालकांपैकी एक अल्पपोषीत आणि प्रत्येकी पाच बालकांपैकी एक निरुपयोगी आहे. विविध सर्वेक्षणांमधूनही हे दु:खद चित्र समोर दिसून आले आहे. मात्र, आकडेवारीचा तपशील पाहिला असता असे दिसून येते की ज्याप्रमाणात चित्र रंगवले जाते तेवढे भयंकर नाही. उदाहरणार्थ, अल्पपोषीत बालकांचे प्रमाण- केरळ (१९.७), बिहार (४८.३), कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण- मिझोरम (११.९) आणि झारखंड (४७.८), दर हजारी जन्मामागे बाल मृत्यू दर- अंदमान आणि निकोबार बेटे (१०) उत्तर प्रदेश (६४), प्रत्येकी एक लाख जन्मामागे माता मृत्यू दर –केरळ (६१) आसाम (३००), गणित इयत्ता पाचवी एनएएस स्कोर – तामिळनाडू (५६ टक्के) आणि छत्तीसगड (३२ टक्के), तसेच वाचन आकलनामध्ये-तामिळनाडू (५४ टक्के) आणि बिहार (२९ टक्के) घरांचे प्रमाण- पाच राज्यांनी शंभर टक्के ध्येय साध्य केले आहे तर झारखंड (४० टक्के) आहे. एकंदरीत देशातील २०० जिल्ह्यांची सरासरी राष्ट्रीय सरासरीच्या विपरीत आहे.

विविध शासकीय योजनांची निश्चित ध्येयाने मिशन मोडवर अंमलबजावणी करुन आणि जिल्हा पातळीवर रिअल-टाईम निरीक्षण करुन अशाप्रकारच्या जिल्ह्यांचा आगामी तीन ते पाच वर्षाच्या काळात कायापालट केला जाऊ शकतो.

प्रत्येक विभागातील विकास निर्देशांकात असमानता आहे, दोन्ही आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात. त्यामुळे अगदी १९६० च्या दशकापासून धोरणकर्त्यांचे या बाबीकडे लक्ष आहे. मागास जिल्हे म्हणून अविभाजीत बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थान हा भाग होता. प्रत्येक समितीच्या शिफारशींमध्ये विभागवार योजना-कार्यक्रमांची शिफारस होती. केंद्रीय निरीक्षण पद्धत (सेंट्रलाईज्ड मॉनिटरींग सिस्टीम) त्यावेळी नव्हती. त्यामुळे विविध अहवालांमध्ये दिसून येते की, या जिल्ह्यापर्यंत वितरीत केलेली पूर्ण रक्कम पोहचत नव्हती. विश्वसनीय आणि रिअल टाईम आकडेवारीचे मोठे आव्हान होते. धोरण ठरवतानाचा आणखी एक मुद्दा म्हणजे सर्वांना एकाच दृष्टीकोनातून पाहणे (वन साईझ फिटस ऑल). एवढी भिन्न संस्कृती, भूगोल असताना समस्येचे निदान प्रत्येक पातळीवर वेगळे करावे लागते. तसेच काही यशस्वी मोहिमा जसे पोलिओ निर्मूलन, यातून दिसून आले की जनसहभागाशिवाय काही पर्याय नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे जनचळवळीच्या माध्यमातूनच परिवर्तन शक्य आहे.

विकासात्मक प्रवासातून शिकलेल्या बाबी लक्षात घेऊन, भारत सरकारने नुकताच ट्रान्सफॉर्मेशन ऑफ एस्पीरेशनल डिस्ट्रीक्टस कार्यक्रमाची सुरुवात केली. ९ ऑगस्ट २०१७ रोजी छोडो भारत चळवळीच्या ७५ व्या वर्षाचे निमित्त साधून माननीय पंतप्रधानांनी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान म्हणाले की जेंव्हा १०० अतिमागास जिल्ह्यांचा विकास होईल, तेंव्हा देशाच्या सर्वसमावेशक विकासाला चालना मिळेल. या कार्यक्रमाची व्यापक रुपरेषा- केंद्र आणि राज्य सरकारांच्या योजनांचे संमीलीनीकरण, केंद्र, राज्य पातळीवरील प्रभारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांचे समन्वयन, रिअल-टाईम डेटा, जिल्ह्यांमध्ये जनचळवळीच्या माध्यमातून स्पर्धा घडवून आणणे.

**धोरण ठरवतानाचा आणखी एक मुद्दा म्हणजे सर्वांना एकाच दृष्टीकोनातून पाहणे (वन साईझ फिटस ऑल). एवढी भिन्न संस्कृती, भूगोल असताना समस्येचे निदान प्रत्येक पातळीवर वेगळे करावे लागते. तसेच काही यशस्वी मोहिमा जसे पोलिओ निर्मूलन, यातून दिसून आले की जनसहभागाशिवाय काही पर्याय नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे जनचळवळीच्या माध्यमातूनच परिवर्तन शक्य आहे.**

यासाठी २८ राज्यांमधील ११५ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे, यापैकी ३० जिल्हे नीती आयोगाने तर ५० जिल्ह्यांची निवड विविध आकडेवारीवर आधारीत केंद्रीय मंत्र्यांनी केली आहे. उर्वरीत ३५ जिल्ह्यांची निवड केंद्रीय गृह मंत्रालयाने नक्षलवादी प्रभावित भागातून केली आहे. नीती आयोग या कार्यक्रमाचे संचलन करणार आहे. कार्यक्रम राज्य सरकारांकडून राबवला जात असल्यामुळे राज्यांची क्षमता लक्षात घेऊन जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. २०२२ पर्यंत कामगिरीत सुधारणा करण्यासाठी भारत सरकारकडून एकत्रित प्रयत्न केले जाणार आहेत. नीती आयोग या जिल्ह्यांतील कामगिरीचे मूल्यमापन करणार आहे.

या जिल्ह्यांच्या परिवर्तनासाठीच्या रणनितीचा भाग म्हणजे प्रमुख कामगिरी निर्देशांक (की परफॉर्मन्स इंडिकेटर्स), या निर्देशांकाच्या माध्यमातून प्रगती पाहून वार्षिक रँकींग दिली जाणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे सामाजिक निर्देशांक आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून जीवनमान सुधारणे आहे. यासाठी पाच क्षेत्रांची निवड करण्यात आली आहे- आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषी आणि जल स्रोत, पायाभूत

सुविधा, आर्थिक समावेशन आणि कौशल्य विकास. जिल्ह्याच्या विकासात येणाऱ्या अडचणी आणि विविध संधी, यावर प्रमुख कामगिरी

**११५ जिल्ह्यांपैकी नीती आयोग ३० जिल्ह्यांचे संचलन करणार आहे, ३५ जिल्ह्यांचे संचलन केंद्रीय गृह मंत्रालयाकडे आहे आणि उर्वरीत ५५ जिल्ह्यांचे संचलन आरोग्य आणि कुटुंब कल्याण, महिला व बाल विकास, पंचायत राज, कृषी आणि कृषक कल्याण, मनुष्यबळ विकास, ग्रामविकास, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता मंत्रालय, गृहनिर्माण आणि नागरी विभाग, जलस्त्रोत, ऊर्जा, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास मंत्रालयाकडे आहे.**

निर्देशांक ठरवला जाणार आहे. या पाच क्षेत्रातील माहिती जिल्हावार संकलित केली जाणार आहे. प्रमुख कामगिरी निर्देशांकासाठी आरोग्य आणि पोषण, लसीकरण, पायाभूत सुविधा आणि आरोग्यसेवांसाठी मनुष्यबळ लक्षात घेतले जाणार आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रमुख कामगिरी निर्देशांकासाठी ठळक शालेय प्रवेश प्रमाण, पायाभूत सुविधा, शैक्षणिक परिणाम, साक्षरता दर आणि शिक्षणाचा हक्क याची सांगड, कृषी क्षेत्रातील प्रमुख कामगिरी निर्देशांकासाठी जल सकारात्मक गुंतवणूक आणि रोजगार, प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पीक विमा, महत्वाच्या माहितीचा वापर आणि पुरवठा. पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, पाणी, शौचालय, गृहनिर्माण, वीज आणि इंटरनेट जोडणी. याव्यतिरिक्त, टाटा ट्रस्टस, बिल आणि मेलिंडा गेटस फाऊंडेशन घरोघरी जाऊन तिमाही सर्वेक्षण करणार आहेत.

यातील एक महत्वाची बाब म्हणजे केंद्र आणि राज्य सरकारच्या अतिरिक्त/संयुक्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती 'प्रभारी' आणि नोडल अधिकारी म्हणून केली जाणार आहे. या अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा लाभ जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनासाठी होईल तसेच जिल्हा, राज्य आणि केंद्र सरकारमध्ये संवाद साधण्यासाठी त्यांची चांगली मदत होईल. जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी मुख्य व्यक्ती असणार आहे. सचिवांची अधिकारीत समिती (Empowered Committee of Secretaries) कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि आलेल्या अनुभवांच्या आधारे नियोजनात बदल करेल. तसेच राज्य सरकारे मुख्य सचिवांच्या आणि नियोजन/अर्थ सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन अंमलबजावणी आणि आलेल्या अनुभवांच्या आधारे नियोजनात बदल करेल.

जिल्हा पातळीवरील टीम सर्व निर्देशांकाच्या आधारे २०२२ चे ध्येय समोर ठेवून वार्षिक अहवाल तयार करेल. केंद्र सरकारचा प्रतिनिधी किमान दोन महिन्यांतून एक वेळा भेट देऊन नीती आयोगासाठी अहवाल तयार करेल. तसेच अहवालाचा अभ्यास करुन सचिवांच्या अधिकारीत समितीकडे पाठवेल. ११५ जिल्ह्यांपैकी नीती आयोग ३० जिल्ह्यांचे संचलन करणार आहे, ३५ जिल्ह्यांचे संचलन केंद्रीय गृह मंत्रालयाकडे आहे आणि उर्वरीत ५५ जिल्ह्यांचे संचलन आरोग्य आणि कुटुंब कल्याण, महिला व बाल विकास, पंचायत राज, कृषी आणि कृषक कल्याण, मनुष्यबळ विकास, ग्रामविकास, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता मंत्रालय, गृहनिर्माण आणि नागरी विभाग, जलस्त्रोत, ऊर्जा, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास मंत्रालयाकडे आहे.

प्राथमिक माहितीचे संकलन आणि रिअल टाईम निरीक्षण १ एप्रिल २०१८ पासून सुरु होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यांमधील स्पर्धाही याचवेळी सुरु होईल. मागास जिल्ह्यांचा विकास करणे ही नवीन कल्पना नाही. मात्र, याची वेगळ्या पद्धतीने अंमलबजावणी होत आहे. एक लोकप्रिय म्हण आहे- विजेते काही वेगळे करत नाहीत, तर ते वेगळ्या पद्धतीने करतात याची प्रचिती या जिल्ह्यांना येईल.

**११५ जिल्ह्यांची यादी पान क्रमांक २० ते ३२ वर आहे.**

११५ जिल्ह्यांची यादी

| राज्य | नीती आयोगाची ३० जिल्हे | विविध मंत्रालयांची ५० जिल्हे | केंद्रीय गृहमंत्रालयाची ३५ जिल्हे | एकूण |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | | १. विझेनग्राम | १. विशाखापट्टणम | ३ |
| आंध्र प्रदेश | | २. कडप्पा | | |
| अरुणाचल प्रदेश | | १. नामसी | | १ |
| आसाम | १. दरंग | १. उडलगिरी | | ७ |
| आसाम | २.धुबरी | २. हेलकंडी | | |
| आसाम | ३. बारपेटा | | | |
| आसाम | ४. गोलपाडा | | | |
| आसाम | ५. बक्सा | | | |
| बिहार | १. कटीहार | १. खागरीया | १.औरंगाबाद | १३ |
| बिहार | २. बेगुसराय | २.पूर्णिया | २.बांका | |
| बिहार | ३. शेखपूरा | | ३. गया | |
| बिहार | ४. अरारिया | | ४.जमुई | |
| बिहार | ५. सीतामढी | | ५. मुझफ्फरपूर | |
| बिहार | | | ६. नावदा | |
| छत्तीसगड | | १.कोरबा | १.बस्तर | १० |
| छत्तीसगड | | २. महासामूंद | २. बिजापूर | |
| छत्तीसगड | | | ३. दंतेवाडा | |
| छत्तीसगड | | | ४. कंकर | |
| छत्तीसगड | | | ५. कोंडागाव | |
| छत्तीसगड | | | ६. नारायणपूर | |
| छत्तीसगड | | | ७.राजनांदगाव | |
| छत्तीसगड | | | ८.सुकमा | |

| राज्य | नीती आयोगाची ३० जिल्हे | विविध मंत्रालयांची ५० जिल्हे | केंद्रीय गृहमंत्रालयाची ३५ जिल्हे | एकूण |
|---|---|---|---|---|
| गुजरात | | १.नर्मदा | | २ |
| गुजरात | | २. दाहोड | | |
| हरियाणा | | १. मेवात | | १ |
| हिमाचल प्रदेश | | १. चंबा | | १ |
| जम्मू आणि काश्मीर | | १. कुपवाडा | | २ |
| जम्मू आणि काश्मीर | | २. बारामुला | | |
| झारखंड | १. साहेबगंज | १. गोड्डा | १. लातेहार | १९ |
| झारखंड | २. पकाऊर | | २.लोहर्दगा | |
| झारखंड | | | ३.पलमू | |
| झारखंड | | | ४.पूरबी सिंघभूम | |
| झारखंड | | | ५.रामगड | |
| झारखंड | | | ६.आंची | |
| झारखंड | | | ७.सीमदेगा | |
| झारखंड | | | ८.पश्चिम सिंघभूम | |
| झारखंड | | | ९.बोकारो | |
| झारखंड | | | १०.छत्र | |
| झारखंड | | | ११.दुमका | |
| झारखंड | | | १२.गडवा | |
| झारखंड | | | १३. गिरदीह | |
| झारखंड | | | १४.गुमला | |
| झारखंड | | | १५.हजारीबाग | |
| झारखंड | | | १६. खुंटी | |
| कर्नाटक | | १. यादगीर | | २ |
| कर्नाटक | | २. रायचूर | | |

| राज्य | नीती आयोगाची ३० जिल्हे | विविध मंत्रालयांची ५० जिल्हे | केंद्रीय गृहमंत्रालयाची ३५ जिल्हे | एकूण |
|---|---|---|---|---|
| केरळ | | १. वायनाड | | १ |
| मध्य प्रदेश | १. दामोह | १. छत्तरपूर | | ८ |
| मध्य प्रदेश | २. सिंगरोली | २. राजगड | | |
| मध्य प्रदेश | ३. बारवानी | ३. गुणा | | |
| मध्य प्रदेश | ४. विदीशा | | | |
| मध्य प्रदेश | ५. खांडवा | | | |
| महाराष्ट्र | १. नंदूरबार | १. वाशिम | १. गडचिरोली | ४ |
| महाराष्ट्र | | २. उस्मानाबाद | | |
| मणिपूर | | १. चांदेला | | १ |
| मेघालय | | १. रिबहोई | | १ |
| मिझोरम | | १.मामीत | | १ |
| नागालँड | | १.कीपहिरे | | १ |
| ओडिशा | १. रायगदा | १. कंधमाळ | १. कोरापूत | ८ |
| ओडिशा | २. कलाहंदी | २. गजपती | २. मलकनगिरी | |
| ओडिशा | | ३.धेन्काल | | |
| ओडिशा | | ४. बलनगीर | | |
| पंजाब | | १. फिरोजपूर | | २ |
| पंजाब | | २. मोगा | | |
| राजस्थान | १. बारन | १. धोलपूर | | ५ |
| राजस्थान | २. जैसलमेर | २. करौली | | |
| राजस्थान | | ३. सिरोही | | |
| सिक्कीम | | १. पश्चिम सिक्कीम | | १ |
| तामिळनाडू | | १. रामनाथपूरम | | २ |

| राज्य | नीती आयोगाची ३० जिल्हे | विविध मंत्रालयांची ५० जिल्हे | केंद्रीय गृहमंत्रालयाची ३५ जिल्हे | एकूण |
|---|---|---|---|---|
| तामिळनाडू | | २.विरुधूनगर | | |
| तेलंगणा | | १. भूलपापल्ली | १. खम्मम | ३ |
| तेलंगणा | | २.आसिफाबाद | | |
| त्रिपूरा | | १.दहलाई | | १ |
| उत्तर प्रदेश | १. चित्रकूड | १.चंदोली | | ८ |
| उत्तर प्रदेश | २. बलरामपूर | २. सिद्धार्थनगर | | |
| उत्तर प्रदेश | ३. बहारीच | ३.फतेहपूर | | |
| उत्तर प्रदेश | ४. सोनभद्र | | | |
| उत्तर प्रदेश | ५. शरावस्ती | | | |
| उत्तराखंड | | १. हरीद्वार | | २ |
| उत्तराखंड | | २. उधम सिंग नगर | | |
| पश्चिम बंगाल | १. मुर्शिदाबाद | १. नादीया | | ५ |
| पश्चिम बंगाल | २. मालदा | २. दक्षिण दिनापूर | | |
| पश्चिम बंगाल | ३. बीरभूम | | | |
| एकूण | ३० | ५० | ३५ | ११५ |

विकासप्रवासातील जिल्ह्यांसाठीचे निर्देशांक

एकात्मिक निर्देशांकासाठीचे वेटेज

| संकल्पना क्षेत्र | वेटेज |
|---|---|
| आरोग्य आणि पोषण | ३०% |
| शिक्षण | ३०% |
| कृषी आणि जल स्रोत | २०% |
| आर्थिक समावेशन आणि कौशल्य | १०% |
| पायाभूत सुविधा | १०% |
| एकात्मिक निर्देशांक | १००% |

## निर्देशांकांची संकल्पित क्षेत्रावर यादी
## आरोग्य आणि पोषण

| अ.क्र | निर्देशांक | वजनाचे आरोग्य आणि पोषणाशी प्रमाण | एकूण निर्देशांकाशी वजनाचे प्रमाण | स्त्रोत /कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणाच्या माध्यमातून निश्चित करण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| १ | गर्भवती महिला ज्यांनी चार किंवा अधिक वेळा प्रसूतीपूर्व चाचणी केली आहे. | ८ | २.४ | आरोग्य व्यवस्थापन माहिती, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय २०१६-१७ / मासिक |
| २ | आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत नियमित पूरक आहार घेणाऱ्या गर्भवती महिलांचे प्रमाण | ३ | ०.९ | जिल्हाधिकारी / मासिक |
| ३ | गर्भवती महिलांमध्ये ऍनिमियाचे प्रमाण (Haemoglobin<7g/dl) प्रसूतीपूर्व नोंदणी झालेल्या महिलांची संख्येशी प्रमाण | ९ | २.७ | एचएमआयएस / मासिक |
| ४ | एकूण प्रसूतींपैकी संस्थात्मक प्रसूतींची टक्केवारी | ७ | २.१ | एचएमआयएस / मासिक |
| ५ | घरांमध्ये प्रशिक्षित दायीमार्फत झालेल्या प्रसूतींचे प्रमाण | ३ | ०.९ | एचएमआयएस / मासिक |
| ६ | प्रसूतीनंतर एक तासाच्या आत बाळाला पाजण्याचे प्रमाण | १० | ३.० | एचएमआयएस / मासिक |
| ७ | ५ वर्षांखालील कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण | ७ | २.१ | सर्वेक्षण |
| ८ | ५ वर्षांखालील अल्पविकसित बालकांचे प्रमाण | ८ | २.४ | सर्वेक्षण |
| ९ | तीव्र कुपोषण | ५ | १.५ | सर्वेक्षण |
| १० | ६-२३ महिन्यांपर्यंतच्या नवजात बालकाला मिळणारे पुरेशा दुधाचे प्रमाण (आईचे दूध +पूरक आहार) | ५ | १.५ | सर्वेक्षण |

| अ.क्र | निर्देशांक | वजनाचे आरोग्य आणि पोषणाशी प्रमाण | एकूण निर्देशांकाशी वजनाचे प्रमाण | स्रोत /कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणाच्या माध्यमातून निश्चित करण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| ११ | पूर्ण लसीकरण झालेल्या बालकांचे प्रमाण (९-११ महिने) (BCG+ DPT3 + OPV3 + Measles1) | १० | ३.० | एचएमआएस /मासिक |
| १२ | प्रत्येकी १००,००० लोकसंख्येमागे टीबीचे प्रमाण | ५ | १.५ | डीसी/आरएनटीसीपी एमआयएस / मासिक |
| १३ | आरोग्य सुविधा निर्देशांक | २० | ६.० | |
| १३a | उप केंद्रांचे प्रमाण/ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वेलनेस सेंटरमध्ये रुपांतर | ६ | १.८ | जिल्हाधिकारी |
| १३b | भारतीय आरोग्य मानकांशी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रमाण | ५ | १.५ | एचएमआयएस / मासिक |
| १३c | १ per ५००,००० लोकसंख्येमागे प्रथम संदर्भ केंद्र | ३ | ०.९ | एचएमआयएस / मासिक |
| १३d | IPHS अंतर्गत जिल्हा रुग्णालयांमध्ये उपलब्ध विशेष सेवा | २ | ०.६ | एचएमआयएस / मासिक |
| १३e | अंगणवाडी केंद्रांचे प्रमाण/किमान एक ग्रामीण आरोग्य स्वच्छता आणि पोषण दिवस /नागरी आरोग्य स्वच्छता आणि पोषण दिन/ गेल्या एक महिन्यातील जनसंपर्क | २ | ०.६ | एचएमआयएस / मासिक |
| १३f | स्वत:च्या इमारतींमध्ये असणाऱ्या अंगणवाडयांचे प्रमाण | २ | ०.६ | संबंधित अधिकारी - जिल्हाधिकारी / मासिक |
| | एकूण | १००% | ३०% | |

★राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २०१५-१६

# आरोग्य व्यवस्थापन माहिती पद्धती, MoHFW २०१६-१७

| शिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | निर्देशांक | शिक्षणाशी संबंधित निर्देशांक | एकूण संयुक्तिक निर्देशांक | स्त्रोत /कालावधी (सर्वे निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| १ | एनईआर (a) प्राथमिक पातळी | १४ | ४.२ | केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय (MHRD) - यूडीआयएसई / वार्षिक |
| | (b) द्वितीय स्तर | ६ | १.८ | केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय (MHRD) - यूडीआयएसई / वार्षिक |
| २ | मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्थेसह शाळांमधील शौचालयांचे प्रमाण | ५ | १.५ | सर्वेक्षण /मासिक |
| ३ | शैक्षणिक परिणाम (सर्व, मुले, मुली, एससी, एसटी, अल्पसंख्यांक)<br><br>(a) इयत्ता तिसरीतील गणिताची प्रगती<br>(b) इयत्ता तिसरीतील भाषा विषयातील प्रगती<br>(c) इयत्ता पाचवीतील गणितातील प्रगती<br>(d) इयत्ता पाचवीतील भाषा विषयातील प्रगती<br>(e ) इयत्ता आठवीतीलगणित विषयातील प्रगती<br>(f) इयत्ता आठवीतील भाषा विषयातील प्रगती | ५० | १५ | दर महिन्याला एका त्रयस्थ संस्थेमार्फत केलेल्या सर्वेक्षणावर आधारित |
| ४ | महिला साक्षरता दर (१५+ पुढील वयोगट) | ८ | २.४ | सर्वेक्षण /तिमाही |

| शिक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | निर्देशांक | शिक्षणाशी संबंधित निर्देशांक | एकूण संयुक्तिक निर्देशांक | स्रोत /कालावधी (सर्वे निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| ५ | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असलेल्या शाळांचे प्रमाण | ४ | १.२ | संबंधित अधिकारी- जिल्हाधिकारी/ मासिक + सर्वेक्षण / तिमाही |
| ६ | माध्यमिक शिक्षण असलेल्या शाळांमधील विद्युतीकरणाचे प्रमाण | १ | ०.३ | संबंधित अधिकारी- जिल्हाधिकारी/ मासिक + सर्वेक्षण / तिमाही |
| ७ | शिक्षणाचा हक्क अंतर्गत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी-शिक्षक नोंदणी प्रमाण | ८ | २.४ | संबंधित अधिकारी- जिल्हाधिकारी / मासिक- केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून वैध |
| ८ | शालेय अभ्यासक्रमाची सुरुवात झाल्यानंतर विद्यार्थ्यांना तीन महिन्यांच्या आत शालेय पुस्तके पुरवणाऱ्या शाळांचे प्रमाण | ४ | १.२ | एमएचआरडी /वार्षिक |
| | एकूण | १००% | ३०% | |

| कृषी आणि जल स्रोत | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र | निर्देशांक | कृषी निर्देशांकाचे मूल्य | एकूण संयुक्त निर्देशांकाचे मूल्य | स्रोत /कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणातून वैध) |
| १ | जल सकारात्मक गुंतवणूक आणि रोजगार | ३० | ६ | |
| १(a) | १ (a) सूक्ष्म-जलसिंचनांतर्गत प्रमाण | १७.५ | ३.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी आणि सर्वेक्षण / मासिक |
| १(b) | १ (b) मनरेगाच्या कामामुळे वाढलेले जलसिंचनाचे प्रमाण | १२.५ | २.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी आणि सर्वेक्षण / अर्ध वार्षिक |

| कृषी आणि जल स्रोत | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र | निर्देशांक | कृषी निर्देशांकाचे मूल्य | एकूण संयुक्त निर्देशांकाचे मूल्य | स्रोत /कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणातून वैध) |
| २ | पीक विमा- एकूण पिकाखालील क्षेत्र जे प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत आहे. | १५ | ३ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी / अर्ध वार्षिक |
| ३ | माहितीचा वापर आणि पुरवठा यातील वाढ | १७.५ | ३.५ | |
| ३(a) | ३(a) कृषी पत वाढ | ७.५ | १.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी आणि सर्वेक्षण / मासिक |
| ३(b) | ३(b) प्रमाणित दर्जात्मक बियाणांचे वितरण | ७.५ | १.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी आणि सर्वेक्षण / अर्ध वार्षिक |
| ३(c) | ३(c) खत वापर प्रमाणातील वाढ | २.५ | ०.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी / तिमाही |
| ४ | ई-नाम शी जोडलेल्या जिल्हा मंडीमध्ये झालेल्या व्यवहारांची संख्या | १० | २ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ मासिक |
| ५ | किंमत सूचीचे प्रमाण (कृषी पीक किंमत आणि किमान आधारभूत किंमत यावर आधारीत) | ५ | १ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ मासिक |
| ६ | एकूण पेरलेल्या क्षेत्रामध्ये उच्च किंमत मूल्याच्या पिकांचे प्रमाण | २.५ | ०.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ अर्ध वार्षिक |
| ७ | तांदूळ आणि गव्हाची कृषी उत्पादकता | ५ | १ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ अर्ध वार्षिक |

| कृषी आणि जल स्रोत | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र | निर्देशांक | कृषी निर्देशांकाचे मूल्य | एकूण संयुक्त निर्देशांकाचे मूल्य | स्रोत /कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणातून वैध) |
| ८ | पशू लसीकरणाचे प्रमाण | ७.५ | १.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ मासिक |
| ९ | कृत्रिम रेतनाचे प्रमाण | ५ | १ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ मासिक |
| १० | दुसऱ्या सत्रात वितरीत केलेल्या मृदा परीक्षण कार्डांच्या संख्येचे पहिल्या सत्रात वितरीत केलेल्याशी प्रमाण | २.५ | ०.५ | संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, सर्वेक्षण/ मासिक |
| | एकूण | १००% | २०% | |

| आर्थिक समावेश आणि कौशल्य निर्मिती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | निर्देशांक | आर्थिक समावेशन निर्देशांक मूल्य | एकत्रित ई-निर्देशांकाशी संबंधित प्रमाण | स्रोत / कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| **आर्थिक समावेशन** | | | | |
| १ | मुद्रा योजनेअंतर्गत एकूण वितरीत कर्जाचे प्रमाण (रुपयांमध्ये) प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे | २० | १ | आर्थिक सेवा विभाग (डीएफएस) / मासिक |
| २ | प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना : प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे नोंदणी | २० | १ | डीएफएस /मासिक |
| ३ | प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY): प्रत्येकी एक लोकसंख्येमागे नोंदणी | २० | १ | डीएफएस /मासिक |

| आर्थिक समावेश आणि कौशल्य निर्मिती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | निर्देशांक | आर्थिक समावेशन निर्देशांक मूल्य | एकत्रित ई-निर्देशांकाशी संबंधित प्रमाण | स्रोत / कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| ४ | अटल पेन्शन योजना(APY): | २० | १ | डीएफएस /मासिक |
| | प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे लाभार्थी | | | |
| ५ | एकूण बँक खात्यांपैकी आधारशी जोडलेले बँक खात्यांचे प्रमाण | २० | १ | डीएफएस /मासिक |
| | एकूण | १००% | ५% | |

| आर्थिक समावेश आणि कौशल्य निर्मिती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | निर्देशांक | कौशल्य निर्मितीशी निर्देशांकाचे मूल्य | ई-निर्देशांकाशी संबंधित एकूण मूल्य | स्रोत / कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| १ | १५-२९ वयोगटातील युवकांची लघु आणि दीर्घ कालीन प्रशिक्षण योजनेअंतर्गत नोंदणी | २५ | १.२५ | कौशल्य विकास मंत्रालय आणि उद्योजकता मंत्रालय / मासिक |
| २ | प्रमाणीकृत रोजगार मिळालेले युवक /लघु आणि दीर्घकालीन प्रशिक्षणासाठी नोंद झालेले विद्यार्थी | १५ | ०.७५ | कौशल्य विकास मंत्रालय आणि उद्योजकता मंत्रालय / मासिक |
| ३ | शिकाऊ उमेदवार/पोर्टलच्या माध्यमातून नोंदणी झालेल्या युवकांची संख्या | २५ | १.२५ | प्रशिक्षण महासंचालनालय / मासिक |
| ४ | पूर्व शिक्षण पद्धतीमधून प्रमाणित लोक / अनौपचारिक कौशल्य मनुष्यबळ ★★ | २५ | १.२५ | एमएसडीई आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ / मासिक |

| आर्थिक समावेश आणि कौशल्य निर्मिती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | निर्देशांक | कौशल्य निर्मितीशी निर्देशांकाचे मूल्य | ई-निर्देशांकाशी संबंधित एकूण मूल्य | स्रोत / कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| ५ | असुरक्षित भागातील युवकांना लघु आणि दीर्घकालीन प्रशिक्षण<br>a) महिला - प्रमाणित प्रशिक्षण<br>b) अ.जा. - प्रमाणित प्रशिक्षण<br>c) अ.ज.- प्रमाणित प्रशिक्षण<br>d) इ.मा.व. - प्रमाणित प्रशिक्षण<br>e) अल्पसंख्यांक - प्रमाणित प्रशिक्षण<br>f) विकलांग – प्रमाणित प्रशिक्षण) / एकूण प्रशिक्षित युवकांची संख्या | १० | ०.५ | एमएसडीई आणि एनएसडीसी / मासिक |
| | एकूण | १००% | ५% | |

# प्रधानमंत्री कौशल्य योजनेची आकडेवारी (२०१६-२०) चा संदर्भ

★नीती आयोगाकडे असलेला १५-२९ वयोगटातील युवकांची माहिती

★★ अनौपचारिक मनुष्यबळाचा एनएसएसओचा २०११-१२ चा अंदाज आणि २०११ ची जनगणना





**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

| पायाभूत सुविधा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | निर्देशांक | पायाभूत निर्देशांकाचे मूल्य | एकंदरीत ई-निर्देशांकाचे मूल्य | स्रोत / कालावधी (सर्व निर्देशांक सर्वेक्षणावर आधारीत) |
| १ | वीज जोडणी असलेल्या घरांचे प्रमाण | २० | २ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| २ | इंटरनेट जोडणी असलेल्या घरांचे प्रमाण | ५ | ०.५ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| ३ | तीन किलोमीटर पर्यंत सर्व हंगामी रस्त्यांच्या जोडणीचे प्रमाण | १५ | १.५ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| ४ | वैयक्तिक शौचालय असलेल्या घरांचे प्रमाण | १५ | १.५ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| ५ | पिण्याच्या पाण्याची सुविधा असलेल्या घरांचे प्रमाण - 40 lpcd पिण्याचे पाणी ग्रामीण भागात आणि 135 lpcd नागरी भागात, घरापासून 100 मीटरच्या आत ) | २० | २ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| ६ | ग्रामपंचायत पातळीवर सार्वजनिक सुविधा केंद्राची उभारणी। | ५ | ०.५ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| 7 | कोणताही निवारा नसलेल्यांसाठी पक्क्या घरांची बांधणी संख्या किंवा कच्ची भिंत आणि एक खोली किंवा कच्चे छत आणि दोन खोल्या, भिंत आणि छत | २० | २ | संबंधित अधिकारी-डीसी आणि सर्वेक्षण / मासिक |
| | एकूण | १००% | १०% | |

■■■

लेखक निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

*email : amitabh.kant@nic.in*

# New Arrivals

Visit our
Book Gallery
at
Soochna Bhawan,
CGO Complex
Lodhi Road,
New Delhi-110003




**To buy online visit: www.bharatkosh.gov.in**

For placing orders, please contact: Ph : 011-24367260, 24365609, e-mail: businesswng@gmail.com

**Publications Division**

**Ministry of Information & Broadcasting, Government of India**

Soochna Bhawan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003

**website: www.publicationsdivision.nic.in**

@ DPD_India

www.facebook.com/publicationsdivision
www.facebook.com/yojanaJournal

# एमएसएमईज: भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकीकरणाचे इंजिन

**अनिल भारद्वाज**




**दरवर्षी रोजगाराच्या बाजारपेठेत दाखल होणाऱ्या १० ते १२ लाख लोकांना सामावून घेण्यासाठी पुरेसे रोजगार निर्माण करण्यात भारतीय अर्थव्यवस्था अपयशी ठरत असल्याने हळहळू आपत्कालीन स्थितीसारखी स्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. अगदी खरे सांगायचे तर उत्पादन क्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांवरून वाढवण्यासाठी रेटा देत असल्याचे सरकारे सांगत असतात मात्र, आपल्या जीडीपी अर्थात देशांतर्गत उत्पादनाच्या १५ ते १६ टक्क्यांच्या पुढे देखील हा वाटा जात नाही.**

संसदेत १ फेब्रुवारी २०१८ रोजी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या २०१८-१९च्या अर्थसंकल्पामध्ये कृषी आणि ग्रामीण क्षेत्र, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि एमएसएमईज अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती या चार क्षेत्रांना गती देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या लेखामध्ये एमएसएमई चौथ्या क्षेत्रावर भर देण्यात आला आहे. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी क्रिसिडेक्सची सुरुवात करताना, एमएसएमई हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकीकरणाचे इंजिन असेल असे अर्थमंत्रालयाने जाहीर केले. अखेर या क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेण्यात आले!

दरवर्षी रोजगाराच्या बाजारपेठेत दाखल होणाऱ्या १० ते १२ लाख लोकांना सामावून घेण्यासाठी पुरेसे रोजगार निर्माण करण्यात भारतीय अर्थव्यवस्था अपयशी ठरत असल्याने हळहळू आपत्कालीन स्थितीसारखी स्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. अगदी खरे सांगायचे तर उत्पादन क्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांवरून वाढवण्यासाठी रेटा देत असल्याचे सरकारे सांगत असतात मात्र, आपल्या जीडीपी अर्थात देशांतर्गत उत्पादनाच्या १५ ते १६ टक्क्यांच्या पुढे देखील हा वाटा जात नाही. पण सुधारणांअभावी एमएसएमईचे रिस्क – रिवॉर्ड रेश्यो म्हणजे जोखीम आणि लाभाचे गुणोत्तर सातत्याने घसरत आहे.

या स्थितीत बदल करण्याचे संकेत २०१८-१९च्या केंद्रीय अर्थसंकल्पाने दिले आहेत.

सर्वप्रथम सर्व क्षेत्रांना ठराविक मुदतीच्या रोजगाराची दिलेली अनुमती, आतापर्यंत ही अनुमती केवळ वस्त्रोद्योग क्षेत्रापुरती मर्यादित होती, ती आता सर्व क्षेत्रांना मिळाल्यामुळे कामगार सुधारणांमध्ये एक मोठा बदल घडवून आणणारे हे पाऊल ठरणार आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीदेखील होणार आहे. अशी अनेक क्षेत्रे आहेत ज्यामध्ये व्यापार हंगामी आणि चक्राकार स्वरुपात असतो. यापूर्वी अल्पकाळासाठी कामावर ठेवणे बेकायदेशीर असल्याने, रोजगारदाते

एक तर लोकांना कामावर ठेवत नसत आणि ठेवले तरी त्याची माहिती देत नसत.( मात्र, कामगार संघटनांच्या विरोधामुळे हा प्रस्ताव खरोखरच प्रत्यक्षात येईल का याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे)

उद्योगांनी जास्तीत जास्त प्रमाणात रोजगार द्यावेत यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या अर्थसंकल्पात अतिरक्त मनुष्यबळावर येणाऱ्या खर्चावर १३० टक्के सवलतीला परवानगी देण्याचे प्रस्तावित केले आहे. नव्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खर्चाचा भार उचलण्यासाठी देखील त्यात तरतूद केली आहे. या अर्थसंकल्पाने उत्पादन क्षेत्राला पाठबळ पुरवणारा आणखी एक भक्कम संकेत दिला आहे आणि तो आहे कामगारांची जास्त गरज असलेल्या ४० हून अधिक उत्पादनांमध्ये स्थानिक मूल्य वर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी सीमाशुल्का ५ टक्क्यांवरून १५ टक्के करण्याचा. आयातीपासून वाढीव संरक्षण दिलेल्या श्रेणीमध्ये खालील उत्पादनांचा समावेश आहे-

- प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ
- सुगंधी द्रव्ये आणि प्रसाधने Perfumes And Toiletry
- स्वयंचलित वाहने व त्यांचे सुटे भाग
- पादत्राणे
- हिरे, मौल्यवान रत्ने व दागिने
- इलेक्ट्रॉनिक्स व हार्डवेअर
- एलसीडी/एलईडी/ओएलईडी पॅनेल्स आणि इतर भाग
- फर्निचर
- मनगटी व भिंतीवरील घड्याळे
- खेळणी, तीन चाकी सायकली, स्कूटर्स, पेडल कार्स, क्रीडा साहित्य
- कवचासकट काजू (कच्चे काजू)
- वनस्पती खाद्य तेल
- Refractory Items
- संमिश्र (मेणबत्त्या, सनग्लासेस इ.)

याचबरोबर सोलार सेल्स/ पॅनेल्स/ मॉड्युल्सच्या उत्पादनासाठी सोलर टेम्पर्ड ग्लास आणि कच्चा माल, सी- इम्प्लान्ट्स तयार करण्याचे भाग किंवा सामग्री सीमाशुल्कातून वगळण्यात आली आहे.

**स्थानिक उद्योगांना वाढीव संरक्षण पुरवण्यासाठी दिलेला टेकू फार काळ उपलब्ध राहणार नाही. भारत आधीपासूनच प्रादेशिक सर्वसमावेशक आर्थिक भागीदारीसाठी- असियान समूहातील १० सदस्य आणि ऑस्ट्रेलिया, चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया आणि न्यूझीलंड या सहा देशांदरम्यान मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटी करत आहे. याचा परिणाम म्हणून भविष्यात कधी तरी सीमाशुल्क शून्यावर येणार आहे.**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी १९९१ पासून सीमाशुल्कामध्ये होत गेलेल्या कपातीच्या पुनर्मापनाची कदाचित गरज असल्याची झालेली जाणीव. यातून एका अधिक सूक्ष्म दृष्टिकोनाचा संकेत मिळतो. सीमा शुल्कांमध्ये वाढ केल्यानंतरही ते बऱ्यापैकी जागतिक व्यापार संघटनेला हमी दिलेल्या २५ ते ४० टक्क्यांच्या दरम्यान राहिले. काही तज्ञांनी हे निर्णय खूपच प्रतिगामी असल्याची संभावना केल्यामुळे ते टीकेचे लक्ष्य देखील बनले.

यामुळे भारतीय उद्योग जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनण्याऐवजी संरक्षणाचा शोध घेऊ लागेल का? खरेतर शुल्कात होणारी वाढ ही एखाद्या लॉबीच्या दबावाचे फलित असते उदा. पोलाद, ॲल्युमिनिअम या मूलभूत सामग्रीवर असलेले शुल्क.

त्यापुढे पाहायचे झाले तर स्थानिक उद्योगांना वाढीव संरक्षण पुरवण्यासाठी दिलेला टेकू फार काळ उपलब्ध राहणार नाही. भारत आधीपासूनच प्रादेशिक सर्वसमावेशक आर्थिक भागीदारीसाठी- असियान समूहातील १० सदस्य आणि ऑस्ट्रेलिया, चीन, भारत, जपान, दक्षिण कोरिया आणि



न्यूझीलंड या सहा देशांदरम्यान मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटी करत आहे. याचा परिणाम म्हणून भविष्यात कधी तरी सीमाशुल्क शून्यावर येणार आहे.

तिसरी बाब म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि कॉर्पोरेट यांना टीआरईडीएस म्हणजे ट्रेड इलेक्ट्रॉनिक रिसिवेबल डिस्काउंटींग सिस्टम या ऑनलाईन बिल डिस्काउंटींग प्लॅटफॉर्म आणण्याची घोषणा. ज्यामुळे त्या जीएसटीएन नेटवर्कशी जोडल्या जाऊन मोठे खरेदीदार आणि एमएसएमई विक्रेते यांच्यातील व्यवहारांची आपोआप पडताळणी होऊन एमएसएमईच्या खेळत्या भांडवलाच्या चिंता कमी होणार आहेत. मानीव स्वीकृतीची संकल्पना राबवण्यासाठी काही कायदेशीर उपायांची मात्र गरज लागणार आहे.

चौथी बाब म्हणजे एमएसएमईंना कर्जाचे पाठबळ, भांडवल, आणि व्याजाचे अनुदान उपलब्ध करण्यासाठी आणि नवनिर्मितीसाठी अर्थसंकल्पात 3794 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जरी एमएसएमई क्षेत्राने ब-याच अंशी याचे स्वागत केले असले तरी याचा पूर्ण तपशील उपलब्ध नसल्याने त्यावर आणखी भाष्य करणे अवघड आहे. कमी केलेल्या २५ टक्के कॉर्पोरेट टॅक्सच्या कक्षेचा विस्तार करून त्यात २५० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल असलेल्या कंपन्यांना समाविष्ट करण्यात आले आहे. यापूर्वी ही सवलत ५० कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपन्यांसाठी मर्यादित होती. या सवलतीचा फायदा झाला तरी तो एमएसएमईच्या एका लहान विभागाला होणार आहे. हा फायदा केवळ कंपन्यांपुरता मर्यादित आहे आणि ९३ टक्के एमएसएमई या कंपन्या नसून भागीदारी आणि प्रोपायटरशीप फर्म्स आहेत.

**या अर्थसंकल्पात आणखी एक चांगला प्रस्ताव आहे तो म्हणजे कमी मानांकन असलेल्या कंपन्या देखील बॉण्ड मार्केटमध्ये प्रवेश करू शकणार आहेत. जर केवळ मोठ्या कंपन्यांनाच बॉण्ड मार्केटमध्ये प्रवेश मर्यादित ठेवला तर एमएसएमईंना बँकांकडून अधिक निधी उपलब्ध होईल. एकंदरच या अर्थसंकल्पाची दिशा सकारात्मक असल्याचे दिसते.**

या अर्थसंकल्पात आणखी एक चांगला प्रस्ताव आहे तो म्हणजे कमी मानांकन असलेल्या कंपन्या देखील बॉण्ड मार्केटमध्ये प्रवेश करू शकणार आहेत. जर केवळ मोठ्या कंपन्यांनाच बॉण्ड मार्केटमध्ये प्रवेश मर्यादित ठेवला तर एमएसएमईंना बँकांकडून अधिक निधी उपलब्ध होईल. एकंदरच या अर्थसंकल्पाची दिशा सकारात्मक असल्याचे दिसते. कृषी आणि पायाभूत सुविधांसाठी खूप मोठ्या प्रमाणावर केलेल्या तरतुदीमुळे मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे सकल देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीला चालना देण्यासाठी आवश्यक असलेला रेटा मिळणार आहे. रोजगार निर्मितीसाठी एमएसएमई हा सातत्याने एक सर्वात चांगला पर्याय मानला जात आहे. त्याच प्रमाणात गुंतवणुकीचा ओघ देखील सुरू राहिल आणि आवश्यक परिणाम दिसून येतील अशी आशा आहे.

■■■

*लेखक सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग महासंघाचे महासचिव आहेत. त्यांनी अनेक सरकारी समित्यांवर काम केले आहे.*

*email : sg@fisme.org.in*

फोकस

# अर्थसंकल्पाने आरोग्याचे रणशिंग फुंकले

के. श्रीनाथ रेड्डी



**वर्षानुवर्षे आरोग्य क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्यानंतर गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) जाहीर केल्यानंतर आरोग्य क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले. या योजनेनंतर लगेचच श्रम मंत्रालयाने राष्ट्रीय आरोग्य विमा योजनेची घोषणा केली. या दोन योजनेमुळे दुर्लक्षित राहिलेले आरोग्य क्षेत्र प्रकाश झोतात आले. २०१८ मध्ये सादर केलेला अर्थसंकल्प आरोग्य क्षेत्रासाठी खूप महत्वपूर्ण आहे. या अर्थसंकल्पात सामान्य नागरिकांना आरोग्य कवच मिळणार आहे.**

गेल्या काही दशकात माध्यमांमध्ये अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी आणि अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सार्वजनिक आरोग्या संदर्भात वर्षानुवर्षे त्याच त्या प्रतिक्रिया येत होत्या. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी प्रत्येकालाच अर्थसंकल्पात आरोग्यासाठी भरीव तरतूद होईल, असे वाटत होते. प्रत्यक्षात अर्थसंकल्प सादर केल्यानंतर प्रत्येकाचाच हिरमोड होत होता. वर्षानुवर्षे आरोग्य क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्यानंतर गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) जाहीर केल्यानंतर आरोग्य क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले. या योजनेनंतर लगेचच श्रम मंत्रालयाने राष्ट्रीय आरोग्य विमा योजनेची घोषणा केली. या दोन योजनेमुळे दुर्लक्षित राहिलेले आरोग्य क्षेत्र प्रकाश झोतात आले. २०१८ मध्ये सादर केलेला अर्थसंकल्प आरोग्य क्षेत्रासाठी खूप महत्वपूर्ण आहे. या अर्थसंकल्पात सामान्य नागरिकांना आरोग्य कवच मिळणार आहे. आरोग्यासाठी केलेल्या भरीव तरतूदीमुळे आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक,मीडिया आणि देशातील नागरिकांमध्ये उत्साह निर्माण झालाय. आरोग्याच्या सुविधा सर्वसामान्य नागरिकांना कशा मिळतील, यावरच सध्या जोरदार चर्चा होऊ लागलीय.

आयुष्मान भारत योजनेत ग्रामीण आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय आरोग्य विमा योजनेचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील दीड लाख प्राथमिक आरोग्य केंद्राचं (PHC) रुपांतर आरोग्यदायी (वेलनेस ) केंद्रामध्ये करण्यात येणार आहे. राष्ट्रीय सुरक्षा विमा योजने अंतर्गत सध्या गरिबांना ३० हजार रुपये विमा संरक्षण दिले जाते. आता त्यात भरघोस वाढ करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आता देशातील १० कोटी कुटुंबांना दरवर्षी प्रत्येकी पाच लाखाचे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. याचाच अर्थ या विमा योजनेचा साधारणपणे ५० कोटी लोकांना लाभ मिळणार आहे.

राष्ट्रीय ग्रामीण विमा योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सुधारणा करण्यात येणार

आहेत. या योजनेत मुलांच्या आणि स्त्रियांच्या आरोग्याच्या काळजीवर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे. २०१७ सालची राष्ट्रीय आरोग्य योजना आता राष्ट्रीय आरोग्य अभियान नावाने ओळखली जाणार आहे. या योजनेमध्ये असंसर्गजन्य रोग आणि मानसिक विकारांचा समावेशही गरजेचा आहे. राष्ट्रीय आरोग्य योजना ही सर्वकश आरोग्य योजना म्हणून राबवली गेली पाहिजे. जुन्या आणि असाध्य रोगांसाठी दीर्घकालीन काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी गरजेनुसार पाठपुरावा करावा लागतो. त्यासोबतच प्राथमिक स्तरावर विशेष काळजी देखील घेतली गेली पाहिजे. कुष्ठरोग आणि एचआयव्ही बाधित रुग्णांसाठी उपचारांचा या योजनेत समावेश असला पाहिजे. मानसिक रुग्णासाठी दीर्घकालिन उपचार मिळावेत यासाठी प्राथमिक स्तरावरच सोय झाली पाहिजे. वैयक्तिक समुपदेशन आणि आरोग्य शिक्षणाकडे नेहमीच दुर्लक्ष करण्यात आलंय. मात्र, चांगल्या आरोग्यासाठी या दोन्ही गोष्टींवर भर देणे गरजेचे आहे. त्यासोबतच सकस आहाराच्या जोडीला व्यायामाची गरज आहे याचा समाजात प्रचार आणि प्रसार होणे गरजेचे आहे.त्यासोबतच तंबाखुचे सेवनही बंद झाले पाहिजे.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर आरोग्यदायी केंद्रामध्ये झाल्यानंतर ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. या केंद्रामुळे आरोग्य सेवा थेट दारापर्यंत पोहचणार असल्याने प्रतिबंधात्मक उपचार आणि आरोग्य सेवेचा विस्तार होणार आहे. सध्याच्या अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये नर्सचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यासोबतच आरोग्य केंद्रावर

**प्राथमिक आरोग्य केंद्रांना कुशल मनुष्यबळ नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रावर डॉक्टरच उपलब्ध नाहीत.त्यामुळे या आरोग्य केंद्रावर नर्स, आरोग्य दूत यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. तसेच डॉक्टर नसलेल्या केंद्रावर कुशल कर्मचारी तयार व्हावा यासाठी तीन वर्षाचा गरजेनुसार अभ्यासक्रम तयार करायला हवा. आयुषपदवीधारक जो आयुर्वेदात प्राविण्य मिळवलेला असतो त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रावर नियुक्त करणे वादाचे ठरणार आहे.**

गरजेची औषधे मोफत दिली जावीत. या केंद्रातूनच रोगांच्या नियंत्रणासाठी विविध कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञान, टेलिमेडिसीन आणि मोबाईल फोनचा वापर या आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारण्यास देखील मदत होणार आहे. त्यामुळेच आरोग्यदायी केंद्राचे स्वागत करणे गरजेचे आहे. प्राथमिक आरोग्य सेवेचा विस्तार सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्येसुद्धा होणं गरजेचं आहे. अर्थसंकल्पात मात्र त्यासाठी पुरेशी तरतूद केलेली दिसत नाही. त्यासोबतच राष्ट्रीय आरोग्य अभियानात शहरातील नागरिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. मोठ्या प्रमाणात गावातील नागरिक शहराकडे स्थलांतर करत आहेत. शहरांमध्ये झोपडीमध्ये राहणाऱ्या तसेच अल्प आणि अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी आरोग्य केंद्र गरजेची आहे.

अर्थसंकल्पामध्ये आरोग्यकेंद्रासाठी फक्त १२००कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद कमी असल्यानं वाढवण्याची गरज आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांना कुशल मनुष्यबळ नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रावर डॉक्टरच उपलब्ध नाहीत.त्यामुळे या आरोग्य केंद्रावर नर्स, आरोग्य दूत यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. तसेच डॉक्टर नसलेल्या केंद्रावर कुशल कर्मचारी तयार व्हावा यासाठी तीन वर्षाचा गरजेनुसार अभ्यासक्रम तयार करायला हवा. आयुषपदवीधारक जो आयुर्वेदात प्राविण्य मिळवलेला असतो त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रावर नियुक्त करणे वादाचे ठरणार आहे. याऐवजी आयुष पदवीधारकाला त्याच्या कौशल्यानुसार आरोग्य केंद्रावर नियुक्त करणे गरजेचे आहे. आरोग्यदायी केंद्रामुळे रोजगारनिर्मितीही होणार आहे.

आरोग्यदायी केंद्रांना प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधे वितरक,नर्स आणि सर्व कामे करु शकणाऱ्या अष्टपैलू कर्मचाऱ्यांची आवश्यक असल्याने तरुणांना रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतील.

राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुभवातून राष्ट्रीय आरोग्य अभियानात सुधारणा करण्यात आलीय. राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेअंतर्गत ३० हजार रुपयांपर्यंत संरक्षण दिलं जातं. काही राज्यांमध्ये या योजनेत एक ते तीन लाखांचे कवच मिळते. याउलट राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत आता पाच लाख रुपयांचे कवच मिळणार आहे. या योजनेचा फायदा दहा कोटी गरिब नागरिकांना होणार आहे. प्राथमिक आरोग्य सेवेची वाणवा असल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडे लोकांचा कल वाढणार आहे. त्याचा फटका सार्वजनिक रुग्णालयांना बसू शकतो. या रुग्णालयांच्या निधीत कपात होऊ शकते.

आयुषमान भारत योजनेचा शुभारंभ २०१८ च्या ऑक्टोबर महिन्यात होणार आहे. सुधारित अंदाज पत्रकानुसार आरोग्य विभागाचा अर्थसंकल्प ५१,५५० कोटी रुपये होता. तो केवळ २.५ टक्क्याने वाढवून यावर्षी ५२,८०० कोटी रुपये केला आहे. महागाईचा निर्देशांक लक्षात घेता या वर्षी प्रत्यक्षात आरोग्याच्या अर्थसंकल्पामध्ये वाढ झालेली नाही. यासाठी यंदा दोन हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही योजना पूर्ण कार्यान्वित झाल्यानंत तुरतुदीमध्ये पाच ते सहा पट वाढ करावी लागणार आहे. या योजनेमध्ये राज्यांचा वाटा ४० टक्के असणार आहे सध्या विविध राज्यांमध्ये असलेल्या योजना बंद करुन या योजनेत सहभागी करुन घेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. राज्याची आणि केंद्राची एकच आरोग्यदायी योजना असल्यास त्याचा मोठा फायदा होणार आहे. त्यासाठी राज्यातील राजकीय नेत्यांमध्ये एकमत होण्याची गरज आहे.

**राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेअंतर्गत ३० हजार रुपयांपर्यंत संरक्षण दिलं जातं. काही राज्यांमध्ये या योजनेत एक ते तीन लाखांचे कवच मिळते. याउलट राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत आता पाच लाख रुपयांचे कवच मिळणार आहे. या योजनेचा फायदा दहा कोटी गरिब नागरिकांना होणार आहे. प्राथमिक आरोग्य सेवेची वाणवा असल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडे लोकांचा कल वाढणार आहे. त्याचा फटका सार्वजनिक रुग्णालयांना बसू शकतो. या रुग्णालयांच्या निधीत कपात होऊ शकते.**

या योजनेची अंमलबजावणी करताना सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांना सहभागी करुन घ्यावे लागणार आहे. अनेकदा या योजनेत वाद-तक्रार निवारणासाठी कक्षही उभारावे लागणार आहेत. यासाठी लोकांमध्ये जनजागृती करावी लागणार आहे. याची खबरदारी न घेतली गेल्यास गरज नसलेली चाचणी आणि उपचार करावे लागणार असल्याने खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

ट्रस्ट किंवा विमा कंपनी या योजनेची अंमलबजावणी करु शकते. योजनेची अमलबजावणी ट्रस्टव्दारे केल्यास खर्चात मोठी बचत होऊ शकते. विमा कंपन्यांद्वारे अमलबजावणी केल्यास खर्चात वाढ होते. त्यामुळे प्रिमियम वाढू शकतो. ही योजना गरिबांसाठी असल्याने प्रिमियम कमीत कमी असणे गरजेचे आहे. त्यासोबतच गरीब नसलेल्या लोकांना प्रिमियम भरुन या योजनेत समावेश होण्याची संधी देखील द्यावी

जिल्हास्तरावरील रुग्णालयांमध्ये सुधारणा करण्यासाठी डॉक्टरांची गरज आहे. अर्थसकंल्पात २४ वे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचं प्रस्तावित आहे. हे महाविद्यालय जिल्हास्तरीय रुग्णालयांना जोडलेले असतील. त्यासोबत लोकसभेच्या तीन मतदारसंघात एक वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे नियोजन आहे. यासाठी मोठी आर्थिक तरतूद करावी लागणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कुष्ठरोग्यांसाठी ६०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. कुष्ठरोग्यांना सकस आहार मिळावा यासाठी प्रतिमहिना


५०० रुपये देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे कुष्ठरोग्यांना मोठा फायदा होणार आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छतागृह उभारणीसही प्रोत्साहन देण्यात येते. हागणदारीमुळे निर्माण होणाऱ्या रोगांनाही प्रतिबंध होऊ शकतो. वायू प्रदूषणामुळेही नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. दिल्लीच्या शेजारी असलेल्या राज्यांमध्ये भात काढणीनंतर जाळण्यात येतो. त्यामुळे वायू प्रदूषणात वाढ होते. हे प्रदूषण रोखण्यासाठी तसंच पिकांचं अवशेष नष्ट करण्यासाठी दिल्ली सरकारकडून आर्थिक मदतही देण्यात येते आहे. उजाला योजनेमुळे अनेक घरांमध्ये स्वयंपाकासाठी गॅस आला आहे. या योजनेचा ग्रामीण भागातील महिलांना मोठा फायदा झाला आहे. गॅस आल्यामुळे श्वसनाचे विकार, हृदयविकार, कर्करोग, लहान मुलांमध्ये होणारा अस्थमा सारखे आजार होणार नाहीत. वायू प्रदण रोखल्यास मधुमेह रुग्णांची संख्याही कमी होऊ शकते.

२०१८ च्या अर्थसंकल्पात आरोग्याला प्राधान्य देण्यात आले आहे. मात्र या योजनेची यशस्वीता केंद्र आणि राज्यातील अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद करण्यात येते, यावर अवलंबून असणार आहे. २०२० पर्यंत राष्ट्रीय आरोग्य योजनेसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात ८ टक्के निधीची तरतूद करण्याचं नियोजन आहे. ही योजना यशस्वी करण्यासाठी निधीमध्ये वाढ करण्याचे ठरवले आहे. निधीसोबतच योजना यशस्वी करण्यासाठी कुशल मनुष्यबळ, अतिउत्तम सेवा याची आवश्यकता असणार आहे. त्यासोबतच योजनेच्या अंमलबजावणीसाठी चांगल्या नियामक संस्थेची गरज आहे. या सर्व गोष्टीची अंमलबजावणी निश्चित काळात केली गेल्यास भारत स्वस्थ आणि आरोग्यदायी होईल. स्वस्थ भारतासाठी रणशिंग फुंकण्यात आलंय.

■■■

*लेखक पब्लिक हेल्थ फाउंडेशनचे अध्यक्ष आहेत.*

*email : ksrinath.reddy@phfi.org*



# आयुष्मान भारत

रेश्मा घाणेकर




**या वर्षीच्या अर्थसंकल्पात मुख्य भर हा आरोग्यसुविधांवर दिला गेला आहे. आयुष्मान भारत कार्यक्रमांतर्गत दोन महत्त्वाच्या योजनांची घोषणा केली गेली आहे. माननीय अर्थमंत्री यांनी या मागचे धोरण विशद केले. जर भारतीय नागरिक हे आरोग्यपूर्ण असतील तरच सरासरी तरुण लोकसंख्येचा इतर देशांच्या तुलनेत भारताला लाभ होईल. यामुळे आजार होऊ नाही याची खबरदारी आणि रोगराईवर उपाय अशा द्विविध स्तरावर आरोग्याच्या प्रश्नावर यातून लक्ष दिले जात आहे.**

सध्या देशातील एकूण लोकसंख्येपैकी ३३ टक्के जनता ही विम्याच्या छत्राखाली आहे. यामध्ये राष्ट्रीय आरोग्य विमा योजनेसारख्या उपक्रमाचा समावेश आहे मात्र ते अपुरे आहे. पाच सदस्यांच्या एका कुटुंबाकरता सध्या ३०००० रुपयापर्यंतचा लाभ मिळतो. त्याचबरोबर खासगी रुग्णालयातील उपचारापासून हा वर्ग वंचित राहतो. सध्या भारतात आरोग्य क्षेत्रावर सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या प्रमाणात ४ टक्क्यांपेक्षाही कमी खर्च केला जातो अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्ये हेच प्रमाण १० टक्के आहे तर ब्राझील रशियासारख्या देशांमध्ये ते ६ ते ७ टक्के आहे.

ही परिस्थिती लक्षात घेवून या वर्षीच्या अर्थसंकल्पात मुख्य भर हा आरोग्यसुविधांवर दिला गेला आहे. आयुष्मान भारत कार्यक्रमांतर्गत दोन महत्त्वाच्या योजनांची घोषणा केली गेली आहे. माननीय अर्थमंत्री यांनी या मागचे धोरण विशद केले. जर भारतीय नागरिक हे आरोग्यपूर्ण असतील तरच सरासरी तरुण लोकसंख्येचा इतर देशांच्या तुलनेत भारताला लाभ होईल. यामुळे आजार होऊ नाही याची खबरदारी आणि रोगराईवर उपाय अशा द्विविध स्तरावर आरोग्याच्या प्रश्नावर यातून लक्ष दिले जात आहे.

**यातील पहिली घोषणा आहे.**

१) आरोग्य आणि स्वास्थ्य केंद्र - २०१७ सालच्या राष्ट्रीय आरोग्य धोरणात आरोग्य आणि स्वास्थ केंद्र याला महत्त्व दिले आहे. भारतातील आरोग्यसमस्येला उत्तर म्हणजे ही पायाभूत सुविधा असे मानले आहे या योजनेअंतर्गत दीड लाख केंद्रे उघडण्यात येतील आरोग्य उपचार सुविधा लोकांच्या घरानजिक आणण्याची सोय या केंद्रांमुळे उपलब्ध होईल. ही केंद्रे आरोग्य सुविधा समग्ररीत्या देतील. माता आणि बालक यांचे आरोग्य आणि इतर रोग या सर्व प्रश्नांवर या केंद्रांमधून लक्ष पुरवले जाईल. या कार्यक्रमासाठी १२०० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. खाजगी क्षेत्राचा सामाजिक जाणीव निधी (CSR) आणि धर्मादाय संस्थांच्या निधीचा सहभाग यात विचारात घेतला आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी

६०० कोटींची तरतूद केलेली आहे. यामुळे क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमास बळ मिळेल.

२) राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना - आयुष्मान  भारत या कार्यक्रमांतर्गत दुसरी योजना ही राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना आहे. साधरणपणे १० कोटी गरीब दुर्बल घटकातील कुटुंबाचा यात विचार केला आहे. म्हणजेच साधारण ५० कोटी लाभार्थी पर्यंत ही योजना पोचावी असा यात उद्देश आहे. प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक वर्षी सरासरी पाच लाखापर्यंतचे संरक्षण यात मिळेल यातून प्राथमिक दुय्यम वा तिय्यम आरोग्य प्रश्नांसाठी दवाखान्यात दाखल होणे वा इतर खर्चांसाठी मदत होईल. गरीब रूग्ण रूग्णालयात  दाखल होताच विमा संरक्षण मिळेल. याशिवाय गरीबांना डायलिसिस मोफत देण्याची योजना आहे.

सरकारी मदतीतून चालणारी ही आरोग्य योजना सर्व जगात मोठी धरली जाईल, धोरणाची अंमलबजावणी सुरळीत व्हावी यासाठी सुलभरित्या निधी पुरवला जाईल. या माध्यमातून औषधांची उपलब्धता तळागाळापर्यंत पोचेल.

याशिवाय सर्वांना दर्जेदार शिक्षण व आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी २४ नवी सरकारी वैद्यकीय महाविद्यालये व दवाखाने उघडले जातील जर जिल्हयाला दवाखाना असेल तर तो अद्ययावत केला जाईल यामुळे तीन लोकसभा मतदार संघामागे एक दवाखाना आणि एक वैद्यकीय महाविद्यालय याची तरतूद होईल. प्रत्येक जिल्हयात किमान एक सरकारी महाविद्यालय असेल. यामुळे ग्रामीण व दुर्गम भागात वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी सोय होईल. शहरी आरोग्य अभियानाच्या तरतुदीत २२५ कोटी रूपयांची वाढ करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्रात २ जुलै २०१२ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य (R G JAY) सर्व प्रथम महाराष्ट्रातील ८ जिल्हयांत राबवली जात होती. पुढे ती उर्वरित २८ जिल्हयांत राबवली जाऊ लागली. गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धूळे, रायगड, मुंबई व मुंबई उपनगर, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, उस्मानाबाद, परभणी, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर वर्धा अहमदनगर जळगाव नंदुरबार नाशिक कोल्हापूर पुणे सांगली सातारा हे ते जिल्हे होते.**

या धोरणासंदर्भात महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर महाराष्ट्रात २ जुलै २०१२ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य (R G JAY) सर्व प्रथम महाराष्ट्रातील ८ जिल्हयांत राबवली जात होती. पुढे ती उर्वरित २८ जिल्हयांत राबवली जाऊ लागली. गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धूळे, रायगड, मुंबई व मुंबई उपनगर, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, उस्मानाबाद, परभणी, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर वर्धा अहमदनगर जळगाव नंदुरबार नाशिक कोल्हापूर पुणे सांगली सातारा हे ते जिल्हे होते. एक एप्रिल २०१७ पासून हीच योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आराग्य योजना या नावाने ओळखली जाऊ लागली. सुरवातीला हिच्यासाठी तीनशे कोटीचा निधी राखून ठेवला होता. या योजनेअंतर्गत काही विशिष्ट शस्त्रक्रिया / औषधोपचार फेरतपासणी उपचार इत्यादींचा लाभ घेता येत होता. पिवळी शिधा पत्रिकाधारक कुटुंब, अन्नपुर्णा कार्ड, अंत्योदय योजना कार्ड, नारंगी शिधा पत्रिकाधारक यांना याचा लाभ घेता येत होता. योजनेअंतर्गत रूग्णालयात भरती झाल्यानंतर रू १५०००० पर्यंतचा खर्च प्रत्येक वर्षामध्ये पूर्ण  कुटुंबासाठी देण्यात येत होता. अधिकृत रूग्णालयामध्ये पैसे न भरता वैद्यकीय सेवा घेता येत होती. त्याचप्रमाणे मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी २५०००० पर्यंत लाभ घेता येत होता.

म्हणजेच महाराष्ट्रातील पूर्वीच्या योजनेतील एकंदर विमा संरक्षण

रक्कम आणि व्याप्ती लक्षात घेता या वर्षीच्या अर्थसंकल्पात जाहीर केलेली योजना ही अधिक श्रेयस्कर ठरते. अर्थसंकल्पामध्ये १० कोटी कुटुंबांसाठी जाहीर करण्यात आलेल्या महत्वाकांक्षी आयुष्मान विमा ( राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना ) योजनेसाठी राज्य सरकारांना दरवर्षी जवळपास ४३३० कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. पाच लाख रुपयांच्या आरोग्यकवचासाठी दरवर्षी प्रती कुटुबांसाठी १०८२ रुपयांचा प्रिमियम भरावा लागणार आहे. त्यापैकी ४३३ रुपये दरवर्षी राज्याचा वाटा असेल तर उर्वरित रक्कम केंद्र सरकारला प्रिमियम म्हणून भरावी लागणार आहे.

अमेरिकेतील ओबामा केअर आरोग्य कार्यक्रम बराच गाजला होता. The Patient Protection and Affordable Care Actor Affordable Care Act (ACA) या कायद्याची घोषणा तत्कालिन अध्यक्ष बराक ओबामा यांनी २३ मार्च २०१० ला केली. अमेरिकेतील आरोग्यविषयक सुविधा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्याचा हा प्रयत्न होता. ACA तील तरतुदी २०१४ साली अमलात आल्या २०१६ पर्यंत निम्मे लोक विमा संरक्षणाखाली आले होते. आरोग्यविषयक सुविधांचा दर्जा वाढावा आणि खर्च कमी व्हावा यासाठी यात तरतुदी होत्या.

भारताच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या योजना त्याहीपेक्षा मोठया ठरतील. त्यामुळेच माननीय अर्थमंत्री यांच्या मते इतिहासात 'ओबामा केअर' या धर्तीवर मोदी केअर कार्यक्रमाची गणना होईल. या योजनेची प्रशंसा जागतिक आरोग्य संघटनेने केली आहे. या संघटनेच्या वैश्विक आरोग्य कवच (यू एच सी) या महत्त्वाकांक्षी योजनेकडे याद्वारे भारताने पुढचे पाऊल टाकले आहे असे मत संघटनेने व्यक्त केले.

■■■

*लेखिका महाराष्ट्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागात सहआयुक्तपदावर कार्यरत आहेत.*
*email : rbgonline@gmail.com*



# FORM IV

Statement about Ownership and other particulars about **Yojana (Marathi) (To be published in the first issue every year after the last day of February)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Mumbai |
| 2. | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3. | Printer's Name | : | Dr. Sadhana Rout |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Publications Division, Soochna Bhavan, New Delhi - 110 003. |
| 4. | Publisher's Name | : | Dr. Sadhana Rout |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Publications Division, Soochna Bhavan, New Delhi - 110 003. |
| 5. | Editor's Name | : | Umesh Ujgare |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Publications Division, 701,B Wing, 7th Floor Kendriya Sadan, Belapur Navi Mumbai- 400614 |
| 6. | Name & Address of Individual who own the newspaper and Partner or shareholder holding more than one Percent of the total capital. | : | Wholly owned by Ministry of Information & Broadcasting, Government of India, New Delhi - 110 001. |

I, **Sadhana Rout** , hereby declare that the particular given above are true to the best of my Knowledge and belief.

(Dr.Sadhana Rout
Signature of Publisher

Dated: 13/02/2018

विशेष लेख

# अर्थसंकल्प आणि अन्न सुरक्षा

**एम एस स्वामिनाथन**




**देशातील गरीब जनतेची उपासमार टाळण्यासाठी प्रत्येक घराला अन्न सुरक्षेची हमी संसदेच्या कायदयाद्वारे देण्यात आले आहे. उपासमार आणि कुपोषण मोठया प्रमाणावर असलेल्या आपल्या देशात अन्न सुरक्षेच्या अनुषंगाने कोण-कोणत्या बाबी करणे आवश्यक आहे, याची चर्चा करणारा हा लेख.**

देशातल्या प्रत्येक घराला अन्न सुरक्षेची, संसदेच्या कायद्याद्वारे हमी देणारा भारत हा कदाचित एकमेव देश असावा जिथे उपासमार टाळण्यासाठी सामाजिक सहकार्य आवश्यक आहे. इथे तरीही उपासमार आणि कुपोषण मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे बालके, स्त्री-पुरुषांना त्यांच्यातल्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेच्या विकासाची संधी नाकारली जाते. अर्थसंकल्प आणि त्या संदर्भातल्या पुढील घडामोडीवर आधारित, आर्थिक आणि वैज्ञानिक अशा दोन्ही दृष्टीकोनातून अतिरिक्त लक्ष पुरवण्याची गरज असलेल्या काही बाबी मी सुचवेन.

## दरातले मोठे चढ-उतार

आपल्या शेतकऱ्यांना दरातल्या मोठ्या चढ-उताराना सामोरे जावे लागते त्यामुळे उत्पन्न आणि स्थैर्य यावर परिणाम होतो. बटाटे, टोमॅटो आणि कांदे यासारख्या भाज्यांच्या किमती घेतल्या तर या भाज्यांच्या किमतीतला चढ-उतार हा बारमाही प्रश्न आहे.यासाठी ग्राहकांना संतुष्ट करण्यासाठी त्या त्या वेळेपुरती पाऊले उचलण्यापेक्षा कायम स्वरूपी तोडगा काढण्याची गरज आहे.पेरी अर्बन म्हणजेच शहरा लगतच्या भागात बागकामाला प्रोत्साहन देणे ही एक पद्धत आहे. शहरे आणि त्यालगतच्या भागात घरांची छपरे, गच्ची आणि मोकळ्या जागा असतात, त्यावर बाग काम म्हणजे टोमॅटो, कांदा मिरची आणि इतर आवश्यक वनस्पती यांची लागवड करता येईल. यामुळे दुहेरी फायदा होईल, किमतीचे स्थैर्य एका बाजूला तर दुसरीकडे शाश्वत पोषण सुरक्षितता.

## किनारी भागाच्या भरभराटीसाठी सागरी जल शेती

भारताला ८००० किलोमीटर लांबीचा किनारा लाभला आहे. केरळ मधल्या कुट्टनाड भागात करण्यात येत असलेल्या सागरीजल शेती प्रमाणे शेती करण्याची मोठी संधी आहे.सागरी जल कृषीवन पद्धतीमध्ये पिके आणि मत्स्य उत्पादन या दोन्हींचा समावेश करता येतो.जगभरात ९७ टक्के पाणी हे सागरी जल आहे ,विविध पिके घेण्यासाठी समुद्राच्या पाण्याचा कसा वापर करावा याचे प्रात्यक्षिकच दाखवण्यात भारत पुढाकार घेऊ शकतो. यामुळे सागरी कृषी उत्पन्न

वाढी बरोबरच सुनामी सारख्या आपत्तीला तोंड देण्यासाठी तयारीही राहील.सागरी जल शेती आणि समुद्राच्या खाली शेती करण्याचे तंत्रज्ञान एम एस स्वामीनाथन रिसर्च फौंडेशन कडे उपलब्ध आहे.या क्षेत्रात प्रशिक्षण आणि क्षमता वृद्धीचे कार्य हे फौंडेशन हाती घेईल.खारफुटी आणि खाऱ्या पाण्यावर वाढणाऱ्या अशा वनस्पतींच्या संवर्धनाचा या कार्यक्रमात समावेश राहील.

### राष्ट्रीय जोंधळा वर्ष

केंद्र सरकारने २०१८ हे वर्ष जोंधळा राष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर केले आहे.सामाई,थीनाई, केझवार्गु,पनिवार्गु, कांबू आणि जोंधळ्याच्या इतर अनेक जातीच्या लागवडीमधे तामिळनाडू आघाडीवर आहे.कोल्ली हिल्स इथे अशा जोंधळ्याच्या लागवडीची समृद्ध जैवता लाभली आहे.म्हणूनच जोंधळ्याच्या जतनासाठी मिलेट बायो व्हॅली आयोजित करणे उपयुक्त ठरेल.अशा कार्यक्रमाना, प्रक्रिया केलेल्या जोंधळ्यावर आधारित नाश्ता करण्यासाठी योग्य स्वरुपात आणणाऱ्या छोट्या खाद्यान्न उद्योगाची जोड हवी.

### पशु पालन आणि मत्स्योद्योग

पिकाची लागवड करणाऱ्यांनाच नव्हे तर कुकुट पालन आणि सागरी आणि इतरत्र मासेमारीला प्रोत्साहन देण्यासाठीही किसान क्रेडीट कार्ड द्यायला हवीत.शेळ्या, मेंढ्या पालन आणि कुकुट पालन यासारखे पशु पालन, शेतकऱ्यासाठी उत्पन्नाला भरीव जोड देतेच,याशिवाय माशाच्या प्रजोत्पादनाच्या काळात मासेमारीला प्रतिबंध असताना, या काळात उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून याचा उपयोग होऊ शकतो.

---

**केंद्र सरकारने २०१८ हे वर्ष जोंधळा राष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर केले आहे.सामाई,थीनाई, केझवार्गु,पनिवार्गु, कांबू आणि जोंधळ्याच्या इतर अनेक जातीच्या लागवडीमधे तामिळनाडू आघाडीवर आहे. कोल्ली हिल्स इथे अशा जोंधळ्याच्या लागवडीची समृद्ध जैवता लाभली आहे.म्हणूनच जोंधळ्याच्या जतनासाठी मिलेट बायो व्हॅली आयोजित करणे उपयुक्त ठरेल.अशा कार्यक्रमाना, प्रक्रिया केलेल्या जोंधळ्यावर आधारित नाश्ता करण्यासाठी योग्य स्वरुपात आणणाऱ्या छोट्या खाद्यान्न उद्योगाची जोड हवी.**

---

### राईस बायो पार्क – धान बायो पार्क

बायो मासचा वापर करून उत्पन्न कसे वाढवता येईल हे याद्वारे शेतकऱ्यांना पाहता येईल.भाताची धाटे,तुसे,धान्यापासून मुल्यवर्धित उत्पादने तयार करता येतील. डाळ वर्गासाठीही अशीच बायो पार्क आयोजित करता येतील. अशा प्रकारे बायो मासच्या प्रत्येक भागापासून उत्पन्न आणि रोजगार निर्माण करण्यासाठी शेतकऱ्याला मदत होईल.

### हवामानाशी अनुकूलन

प्रत्येक गट स्तरावर किमान एक हवामान जोखीम व्यवस्थापन संशोधन आणि विकास केंद्र स्थापन करणे महत्वाचे आहे. या केंद्रात प्रशिक्षित हवामान जोखीम व्यवस्थापक, प्रत्येक पंचायत मधल्या एक महिला आणि पुरुषाचा यात समावेश असावा.हवामान बदल ही मोठी आपत्ती ठरणार असून भरपाई आणि त्याच्याशी मिळतेजुळते घेणे या दोन्ही स्तरावर तातडीने पाऊले उचलण्याची गरज आहे. एमएसएसआरएफकडे, प्रशिक्षकाच्या प्रशिक्षण कार्यक्रमविषयक प्रशिक्षण मार्गदर्शन पुस्तिका उपलब्ध आहे.

### कृषी शाळा उभारणी

कृषी शाळा उभारणी द्वारे शेतकऱ्यांना शिक्षण देण्यात यावे. यामुळे कृषी क्षेत्रात कौशल्य पूर्ण कामाचा प्रसार होईल.

### शहरालगतच्या भागात बगीचा क्रांती

भारतात शहरीकरण वाढत असल्याने, शहरी भागात मागणी आणि पुरवठा यातल्या तफावतीमुळे खाद्यान्न महागाई चढी राहते. आवश्यक ती तांत्रिक मदत आणि बाजारपेठ विषयीचे सहकार्य पुरवून शहरी भागालगतच्या जमिनीच्या तुकड्यावर बागायतीला प्रोत्साहन देऊन शहरी भागात भाज्या आणि

फळे यांच्या किमती स्थिर ठेवण्याचा हा एक मार्ग आहे. ईस्त्रायलप्रमाणे विकेंद्रित उत्पादन करून त्याला सहकारी विपणनाची जोड देता येईल. शहरी आणि शहरालगतच्या भागात बागायती क्रांतीमुळे ग्राहकाला स्थिर किमतीचा मार्ग मोकळा होईल.त्याचबरोबर याचीही खातरजमा करायला हवी की,या फळ-भाज्यांचा दर्जा उत्तम राहिल आणि घातक रसायने आणि कीटक नाशके यापासून या भाज्या मुक्त राहतील.अशा रीतीने,पुरवठ्यातले स्थैर्य राखतानाच उच्च दर्जा आणि सुरक्षित अन्न यांचीही त्याबरोबर सांगड घातली जाईल. शहरी जनतेची विशेषत: भाज्या आणि फळे यांची विशेष दर्जाची मागणी असते. म्हणूनच शहरी भागालगत शेती हा कार्यक्रम यासाठी योग्य ठरेल.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३द्वारे सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेत जोंधळा आणि इतर धान्याचा समावेश केला गेला आहे. माध्यमातल्या नुकत्याच आलेल्या अहवालानुसार कर्नाटक आणि इतर अनेक राज्यात नाचणी आणि जोंधळा यांची एकरी लागवड वाढली आहे. आकर्षक किमती आणि प्रभावी खरेदी यामुळे अशा पिकाकडे शेतकरी पुन्हा वळण्यासाठी उत्सुक राहील. कर्नाटक सरकारने प्रती क्विंटल २००० रुपये अशा दराने १ लाख टन नाचणी खरेदी केली.खरेदी आणि खप वाढला की शेतकरी अधिक उत्पादन घेईल. १९९२ पासून एमएसएसआरएफ तामिळनाडूतल्या कोल्ली हिल्स आणि ओदिशातल्या कोरापुट इथे व्यापारीकरणाच्या संधीतून जोंधळ्याच्या काही जातींच्या जतनाला प्रोत्साहन देत आहे. अन्न सुरक्षा कायदा २०१३ द्वारे नाचणी,बाजरी,ज्वारी आणि जोंधळा वर्गातल्या इतर धान्याचाही, सार्वजनिक वितरण व्यवस्थेत समावेश करण्यात आला आहे. ही धान्ये केवळ पोषण मुल्याच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहेत असे नव्हे तर पाऊसमान वितरणाशी जास्त अनुकूलन साधणारी आहेत हे सर्व ज्ञात आहे. पोषक तत्वे असणारी आणि हवामानाशी अधिक मिळते जुळते घेणाऱ्या या पिकांची कोरडवाहू शेतीत मोठ्या प्रमाणात लागवड केली जाईल याबरोबरच त्यांना बाजारपेठही मिळेल यावर कटाक्ष हवा. सुदैवाने अनेक खाद्यान्न कंपन्या नाचणी,बाजरी, ज्वारी यावर आधारित उत्पादने घेऊन बाजारात येत आहेत.अन्न सुरक्षा कायदा आणि शालेय पोषण आहार या दोन्हीत पोषण मुल्ये भरपूर असणाऱ्या जोंधळा वर्गीय धान्याचा समावेश राहील याची आपण खातर जमा करायला हवी. सरकारनेही या धान्याचा भरड धान्ये असा उल्लेख करण्याची प्रथा बदलावी. त्याऐवजी हवामान सुसंगत पोषक जोंधळा असा त्याचा उल्लेख करावा. या दशकातले एखादे वर्ष अंडर युटीलाईझ बायो फोर्टीफाइड क्रॉप म्हणजे ज्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला गेला नाही अशा जैव,संकरित पोषण मुल्ये जास्त असलेली पिके, म्हणून जाहीर करावे यासाठी आपण संयुक्त राष्ट्र संघाकडे प्रस्ताव पाठवावा.पुढचे वर्ष हे डाळ वर्ष आहे आणि या डाळींही पर्यावरण पूरक आणि प्रथिनांनी समृध्द आहेत.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३द्वारे सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेत जोंधळा आणि इतर धान्याचा समावेश केला गेला आहे. माध्यमातल्या नुकत्याच आलेल्या अहवालानुसार कर्नाटक आणि इतर अनेक राज्यात नाचणी आणि जोंधळा यांची एकरी लागवड वाढली आहे.आकर्षक किमती आणि प्रभावी खरेदी यामुळे अशा पिकाकडे शेतकरी पुन्हा वळण्यासाठी उत्सुक राहील.कर्नाटक सरकारने प्रती क्विंटल २००० रुपये अशा दराने १ लाख टन नाचणी खरेदी केली.खरेदी आणि खप वाढला की शेतकरी अधिक उत्पादन घेईल.**

अशा पिकांसाठी त्यांच्या लागवडीसाठी आणि खपासाठी सुयोग्य धोरणाद्वारे, मोठ्या संख्येने कुपोषित बालके आणि महिला असणारा देश अशी आपल्या देशाची प्रतिमा खोडून काढणे शक्य होईल. आणखी एक महत्वाची आवश्यकता म्हणजे ओर्फन क्रॉप अर्थात मोठ्या स्तरावर दुर्लक्षित राहिलेल्या अशा पिकांच्या संशोधनासाठी अधिक गुंतवणूक. जास्त एकरी उत्पादन आणि खात्रीशीर बाजारपेठ यामुळे

**नॅशनल जिओग्राफिक म्यागेझीन (फेब्रुवारी २०१८) मध्ये चीनला अन्न धान्य कोण पुरवणार असा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. आपल्याला कमी जमिनीतून जास्तीत जास्त लोकांना अन्न धान्य पुरवायचे आहे अशा परिस्थितीत कापणी नंतरचे नुकसान जास्त असेल तर, भारताला अन्न धान्य कोण पुरवणार असा प्रश्न आपल्यालाही पडला पाहिजे. आत्ताच्या अर्थ संकल्पात ही तफावत दूर करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.**


छोट्या शेतकऱ्याचा या पिकांकडे ओढा वाढेल.

कापणीनंतरचे व्यवस्थापन हे चिंतेचे क्षेत्र आहे.सद्य स्थितीत उत्पादन आणि सुगी नंतरचे तंत्रज्ञान याच्यात मेळ नसल्याने उत्पादक आणि ग्राहक अशा दोघांचेही नुकसान होत आहे. या संदर्भात अन्न प्रक्रिया उद्योगाची तातडीने गरज आहे.सुदैवाने २०१८-१९ च्या अर्थ संकल्पात अन्न सुरक्षा आणि अन्न प्रक्रिया या दोन्हीनाही पाठबळ पुरवण्यात आले आहे. कापणी नंतरच्या तंत्रज्ञानासाठी मोठ्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी मुल्यवर्धित उत्पादने तयार करायला हवीत.शीत गोदामे आणि त्यांच्या श्रुंखलेची गरज आहे. पश्चिम बंगाल,उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यात बटाट्यामुळे निर्माण झालेला पेच शीत गोदामे असती तर टाळता आला असता. तंत्रज्ञान आणि सार्वजनिक धोरण त्याच बरोबर नशवंत मालाच्या जतनासाठी शेतकऱ्याची रुची यामुळे उत्पादन आणि सुगी नंतरचे तंत्रज्ञान यांच्यात मेळ राहील अशी मला आशा वाटते.

नॅशनल जिओग्राफिक म्यागेझीन (फेब्रुवारी २०१८)मध्ये चीनला अन्न धान्य कोण पुरवणार असा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. आपल्याला कमी जमिनीतून जास्तीत जास्त लोकांना अन्न धान्य पुरवायचे आहे अशा परिस्थितीत कापणी नंतरचे नुकसान जास्त असेल तर, भारताला अन्न धान्य कोण पुरवणार असा प्रश्न आपल्यालाही पडला पाहिजे.आत्ताच्या अर्थ संकल्पात ही तफावत दूर करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

■■■

*लेखक नामांकित कृषीतज्ञ असून एमएस स्वामीनाथन संशोधन फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आहेत.*
*email : swami@mssrf.res.in*



साध्य

# केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ रोजीरोटीची निर्मिती

डॉ. रणजीत मेहता



**अर्थ मंत्र्यांनी त्यांच्या भाषणात असे सूचित केले होते की, सरकार प्रामाणिक, स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाच्या जोडीनेच भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या उपाययोजना त्याची साक्ष देतात. सरकारला २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात ८ टक्के आर्थिक वाढ अपेक्षित आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणे, ग्रामीण पायाभूत सुविधा उभारणे ही उद्दिष्टे आहेत.**

आजच्या जगात सरकारने घेतलेल्या एखाद्या छोट्याशा निर्णयाचे परिणाम फार मोठ्या प्रमाणावर होत असतात. त्यामुळे आपण जे पर्याय निवडतो त्यांचे मूल्यमापन हे दुसऱ्या, तिसऱ्य पातळीवर जाऊन केले पाहिजे तरच त्याचे खालच्या स्तरावरील परिणाम समजू शकतात. अर्थसंकल्पामुळे अनेक पर्याय खुले असतात. त्यांचा वापर केला तर भारताच्या आर्थिक धोरणात मोठे बदल घडू शकतात.

अर्थसंकल्प २०१८-१९ १ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्र्यांनी सादर केला, त्याला विशेष महत्व आहे कारण तो जुलै २०१७ मध्ये जीएसटी लागू केल्यानंतरचा पहिला अर्थसंकल्प आहे. आर्थिक सुधारणांच्या बऱ्याच मोठ्या टप्प्यानंतर आर्थिक वाढ, शेतीपुढील आव्हाने यात अलिकडे काही प्रश्न निर्माण झाले आहेत त्या परिस्थितीत अर्थसंकल्पात दारिद्र्य, ग्रामीण अर्थव्यवस्था, आरोग्य,शिक्षण, पायाभूत सुविधा व डिजिटायझेशन यावर भर देणारा आहे. या वर्षात धोरणात्मक व रचनात्मक सुधारणा बऱ्याच झाल्या आहेत. अनुत्पादित व थकित कर्जांच्या बाबतीत ठाम निर्धार, सार्वजनिक बँकांचे फेरभांडवलीकरण या माध्यमातून भारताच्या बँकिंग व पत व्यवस्थेतील कमकुवतपणा दूर करण्याचा प्रयत्न आहे. सुधारणांच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था असलेल्या मुडीजने भारताचे पत मूल्यांकन बीएए ३ वरून बीएए २ केले आहे. तेरा वर्षांनंतर भारताचे पतमूल्यांकन सुधारले. अर्थ मंत्र्यांनी त्यांच्या भाषणात असे सूचित केले होते की, सरकार प्रामाणिक, स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाच्या जोडीनेच भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या उपाययोजना त्याची साक्ष देतात. सरकारला २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात ८ टक्के आर्थिक वाढ अपेक्षित आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करणे, ग्रामीण पायाभूत सुविधा उभारणे ही उद्दिष्टे आहेत. मुख्य भर हा शेतकऱ्यांना पाठबळ व ग्रामीण विकास यावर असून खासगी गुंतवणूक वाढ.

रोजगार वाढ, आर्थिक विकास दरात वाढ यांचाही समावेश आहे. करपाया वाढवणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, छोट्या व मध्यम उद्योगांना

**अर्थमंत्र्यांनी रोजगार निर्मितीवर भर दिला आहे. त्यात सरकारच्या धोरणात काही बदल केले असून कामगाराभिमुख असलेल्या कापडउद्योग, चर्मोद्योग, लघु व मध्यम उद्योग यात रोजगार निर्मितीवर भर आहे. भारतात १.८ कोटी लोक बेरोजगार आहेत . जागितक बँकेच्या अहवालानुसार भारताची तीस टक्के लोकसंख्या ही १५ ते २९ वयोगटातील आहे. त्यांना शिक्षण, रोजगार व प्रशिक्षण सुविधा नाहीत. त्यामुळे रोजगार हा देशाच्या विकासात महत्वाचा मुद्दा आहे.**

प्रोत्साहन देणे, अर्थव्यवस्था आणखी बळकट करणे यातून सरकारचा दीर्घकालीन अग्रक्रम दिसून येतो. आयुषमान या आरोग्य विमा योजनेमुळे मोठा लाभ होणार आहे. शिक्षणात सुधारणा, मच्छिमारी, अन्न प्रक्रिया, कापड उद्योग यांना पाठबळ यांचा विचारही मोठ्या प्रमाणात केला आहे. अर्थमंत्र्यांनी रोजगारसंधी वाढवण्याचे आश्वासन दिले आहे. त्यानुसार धोरणाची आखणी आहे. ग्रामीण भागातील लोकांची रोजीरोटी व पायाभूत सुविधा यावर १४.२४ लाख कोटी रूपये खर्च होणार आहेत. त्यात ग्रामीण भागावर विशेष करून कृषी क्षेत्राच्या दैन्यावस्थेवर उपाय केले आहेत. एकूण शेतीची पत पुरवठा वाढ ही ११ लाख कोटी आहे.

राष्ट्रीय विमा योजना १०० दशलक्ष कुटुंबासाठी असून त्यात ५०० दशलक्ष लाभार्थी असणार आहेत. त्यांना दरवर्षी पाच लाखांचा विमा देणारी ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आहे, त्यामुळे समाजाच्या दुय्यम , तिय्यम पातळीवर चांगले परिणाम दिसणार आहेत. लघु व मध्यम उद्योगांना अर्थमंत्र्यांनी चालना दिली असून २५० कोटी उलाढाल असलेल्या कंपन्यांना २५ टक्के कंपनी कर ठेवला आहे. यात कर विवरण पत्रे भरणाऱ्या ९९ टक्के कंपन्यांचा समावेश आहे. यातून लघु व मध्यम कंपन्यांना फायदा होणार आहे. त्यांचा विस्तार शक्य होणार आहे. कंपनी कर्ज बाजारपेठ बराच काळ मरगळलेली होती. त्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. सरकारने आता मोठ्या कंपन्यांना त्यांचे २५ टक्के भांडवल या बाजारपेठेतून घेण्यास परवानगी दिली आहे. यातून कमी मानांकनाच्या रोख्यांचा व्यापार वाढणार आहे. त्यामुळे भारतीय कंपनी कर्ज बाजारपेठेत तरलता वाढणार असून आयएफएससी बाबत नवीन तरतुदी केल्या असून त्यात साधनांचे हस्तांतर व अनिवासी भारतीयांकडून रोख्यांचे हस्तांतर यात भांडवली लाभ करात सूट मिळणार आहे. त्यातून परदेशातील भारतीयांना पुन्हा आपल्या बाजारपेठेकडे वळवता येईल, यातून आपली कर्ज बाजारपेठ ही सिंगापूर, हाँगकाँग, दुबईच्या तोडीस तोड होणार आहे. गिफ्ट सिटी युनिफाइड रेग्युलेटरमुळे सर्व बाबींसाठी एक खिडकी सुविधा राहणार आहे. सरकार नवीन उद्दिष्टे निर्गुंतवणुकीत गाठत असताना पायाभूत सुविधात गुंतवणूक ही सकारात्मक बाब आहे. सरकारने १४ केंद्र सरकारी कंपन्यांना शेअर बाजारात परवानगी दिली आहे. त्यात दोन विमा कंपन्या आहेत. धोरणात्मक निर्गुंतवणूक ही २४ सरकारी उद्योगात करणे अपेक्षित आहे त्यात एअर इंडियाचा समावेश आहे.

**रोजगार निर्मिती संबंधित अर्थसंकल्पातील मुद्दे.**

अर्थमंत्र्यांनी रोजगार निर्मितीवर भर दिला आहे. त्यात सरकारच्या धोरणात काही बदल केले असून कामगाराभिमुख असलेल्या कापडउद्योग, चर्मोद्योग, लघु व मध्यम उद्योग यात रोजगार निर्मितीवर भर आहे. भारतात १.८ कोटी लोक बेरोजगार आहेत. जागितक बँकेच्या अहवालानुसार भारताची तीस टक्के लोकसंख्या ही १५ ते २९ वयोगटातील आहे. त्यांना शिक्षण, रोजगार व प्रशिक्षण सुविधा नाहीत. त्यामुळे रोजगार हा देशाच्या विकासात महत्वाचा मुद्दा

आहे. भारतात एकूण बेरोजगारी दर हा ३.५ टक्के आहे. २०१४ मध्ये १५ ते २४ वयोगटातील लोकांचा बेरोजगारी दर १० टक्के होता. तो २०१७ मध्ये १०.५ टक्के झाला ही चिंतेची बाब आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. दर महिन्याला देशाच्या रोजगारक्षम व्यक्तीत १०लाखांची भर पडत आहे त्या तुलनेत मागणी कमी आहे. ३०४७५ आस्थापनांची नोंदणी पंतप्रधान रोजगार प्रोत्साहन योजनेत आहे पण त्या योजनेत किती जणांना रोजगार मिळाले, याची माहिती उपलब्ध नाही.

१. बांधकाम क्षेत्रात सर्वाधिक मोसमी रोजगार निर्माण होतात. त्याचे प्रमाण शेतीच्या खालोखाल आहे. बांधकाम उद्योगात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ४५ दशलक्ष लोकांना रोजगार मिळतो. अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये पायाभूत सुविधा, शेतीची समस्या, रोजगार निर्मिती यावर भर आहे. शेती क्षेत्रातील दुरवस्थेवर रस्ते जोडणी, ग्रामीण बाजारपेठा, कृषी संस्करण केंद्रे, फूड पार्क, मायक्रो एरिगेशन (पाटबंधारे), वायफाय हॉटस्पॉट, टॉयलेट, परवडणारी घरे, आरोग्य व कल्याण केंद्रे, जिल्हा रूग्णालय सुधारणा, जिल्हा कौशल्य केंद्रे, मच्छिमारी व पशुसंवर्धन पायाभूत सुविधा निधी या उपाययोजना केल्या आहेत. ग्रामीण प्रकल्पांबाबत इतका सखोल विचार कुठल्याही अर्थसंकल्पात झाला नाही. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, रोजीरोटी व पायाभूत सुविधा ग्रामीण भागात देण्यासाठी विविध मंत्रालयांचा खर्च १४.३४ लाख कोटी असणार आहे, त्यात अर्थसंकल्प बाह्य तरतूद

**भारतात एकूण बेरोजगारी दर हा ३.५ टक्के आहे. २०१४ मध्ये १५ ते २४ वयोगटातील लोकांचा बेरोजगारी दर १० टक्के होता. तो २०१७ मध्ये १०.५ टक्के झाला ही चिंतेची बाब आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. दर महिन्याला देशाच्या रोजगारक्षम व्यक्तीत १०लाखांची भर पडत आहे त्या तुलनेत मागणी कमी आहे. ३०४७५ आस्थापनांची नोंदणी पंतप्रधान रोजगार प्रोत्साहन योजनेत आहे पण त्या योजनेत किती जणांना रोजगार मिळाले, याची माहिती उपलब्ध नाही.**

व साधने ११.९८ लाख कोटींची आहेत. रोजगाराशिवाय ग्रामीण कृतीशीलता, स्वयंरोजगार, यावर भर देऊन ३२१ कोटी रोजगार दिवस निर्माण करण्यासाठी हा खर्च होणार आहे.

२. लघुमुदतीची कंत्राटे कपडे उद्योगापलीकडे जाऊन विस्तारित करण्यात आल्याने काही रोजगार संधी तातडीने निर्माण होणार आहेत. त्यामुळे कंत्राटी पद्धतीने नियोक्त्यांना कामगार घेणे सोपे जाणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ते त्यांच्या सेवा खंडित करू शकतात. स्थिर मुदतीचा रोजगार सर्व क्षेत्रात निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यात काही रोजगार हे मोसमी असू शकतात. त्याचा संबंध गरजांशी असतो. खाणकाम, कृषी लागवड या उद्योगात तसे शक्य आहे.

३. पायाभूत उद्योगांना यात उत्तेजन देण्यात आले असून यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहेत. सरकारने अर्थसंकल्पी अंदाजात २०१८-१९ मध्ये पायाभूत कामांचा खर्च ५.९७ लाख कोटी दाखवला आहे. २०१७-१८ मध्ये तो ४.९४ लाख होता.

४. रोजगार निर्मिती प्रोत्साहनासाठी कंपनी कर अडीचशे कोटी उलाढाल असलेल्या उद्योगांसाठी २५ टक्के करण्यात आला. गेल्या वर्षी पन्नास कोटी उलाढाल असलेल्या कंपन्यासाठी हा दर होता. अर्थमंत्र्यांच्या मते या दुरूस्तीमुळे प्राप्तीकर विवरण पत्रे भरणाऱ्या ९९ टक्के कंपन्यांना लाभ मिळणार असून त्यांना गुंतवणुकीसाठी जादा रक्कम हाताशी राहणार आहे त्यातून पुन्हा रोजगार निर्मिती होईल.

५. अर्थसंकल्पात कर्मचारी भविष्य निधी कायद्यात सुधारणा करण्याचे सूतोवाच असून त्यात महिला कर्मचाऱ्याची या निधीतील रक्कम ही पहिल्या तीन वर्षांसाठी आठ टक्के राहणार आहे. नियोक्त्याचा वाटा १२ टक्के कायम

राहणार आहे त्यामुळे जास्त महिला रोजगाराकडे वळतील.

६. अर्थमंत्र्यांनी सरकार प्रत्येक जिल्ह्यात रोजगार कौशल्य केंद्रे सुरू करणार असल्याचे म्हटले असून प्रधानमंत्री कौशल केंद्र योजनेत हे शक्य होणार आहे.

७. आयुषमान भारत योजनेत आरोग्याचा सर्वंकष विचार केला असून त्यातून लाखो रोजगार निर्माण होणार आहेत. त्यात महिलांना जास्त रोजगार मिळतील.

८. प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना ही २०१८-१९ मध्ये १६५२ कोटींची तरतूद करण्यात आली असून २०१७-१८ मध्ये ही तरतूद ५०० कोटींची होती. चर्मोद्योग हा रोजगार संधी देण्यात आघाडीवर आहे. त्यामुळे हजारो बेरोजगारांना त्यात प्रशिक्षणानंतर रोजगार मिळाले. पीएमआरपीआय योजनेत रोजगार संधी या उद्योगात आणखी वाढणार आहेत. सरकारने कापडउद्योगासाठी सहा हजार कोटींची योजना २०१६ मंजूर केली होती. २०१८-१९ मध्ये त्याचा योजना खर्च वाढवून ७१४८ कोटी करण्यात आला.

९. लघु व मध्यम उद्योग हे भारतातील रोजगाराचे इंजिन आहे त्यामुळे यात जास्त रोजगार तयार होण्यासाठी ३७९४ कोटींची तरतूद करण्यात आली त्यात पतपुरवठा, भांडवल व व्याज अनुदान यांचा समावेश आहे.

**स्वयंरोजगार व उद्योजकता यामुळे रोजगार वाढू शकतात. मुद्रा योजना एप्रिल २०१५ मध्ये सुरू करण्यात आली. त्यासाठी १०३ दशलक्ष मुद्रा कर्जे देण्यात आली. त्याची रक्कम ४.३ ट्रिलियन होती. यात बहुतांश कर्ज खाती महिलांची असून निम्मे लाभार्थी हे वंचित गटातील आहेत. २०१८-१९ मध्ये यासाठी ३ ट्रिलियन रूपयांची तरतूद करण्यात आली त्यात लाभार्थी वाढणार आहेत. या कर्जातून रोजगार निर्मीती होणार आहे.**

१०. नवीन महिला कामगारांना उत्तेजन देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली असून त्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधीतील त्यांचा वाटा १२ टक्क्यांऐवजी आठ टक्के केला आहे. त्यांचा हातात पडणारा पगार त्यामुळे वाढणार आहे. महिलांचा कामगारांमधील वाटा आपल्याकडे २५ टक्के आहे जागतिक पातळीवर तो ४० टक्के आहे.

११. कृषी क्षेत्रात उत्पादक रोजगारासाठी अर्थमंत्र्यांनी भर दिला असून त्यात उत्पादक व शेतीपूरक तसेच भूमीहीनांच्या रोजगारांवर भर देत आहोत असे त्यांनी म्हटले आहे. स्वयंरोजगार व उद्योजकता यामुळे रोजगार वाढू शकतात. मुद्रा योजना एप्रिल २०१५ मध्ये सुरू करण्यात आली. त्यासाठी १०३ दशलक्ष मुद्रा कर्जे देण्यात आली. त्याची रक्कम ४.३ ट्रिलियन होती. यात बहुतांश कर्ज खाती महिलांची असून निम्मे लाभार्थी हे वंचित गटातील आहेत. २०१८-१९ मध्ये यासाठी ३ ट्रिलियन रूपयांची तरतूद करण्यात आली त्यात लाभार्थी वाढणार आहेत. या कर्जातून रोजगार निर्मीती होणार आहे.

१२. यंदा २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रावर भर दिला आहे. त्यात या क्षेत्राच्या गरजा, त्यात उद्यमशीलतेला वाव याचा विचार केला आहे. कृषी धोरण आतापर्यंत


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

केवळ उत्पादनाशी निगडित होते. आता कृषी मूल्य पद्धत, पुरवठा साखळी, उत्पादन पूर्व , उत्पादन पश्चात व विपणन पातळीवरील गरजांचा विचार केला आहे. यात मालाची वाहतूक, प्रक्रिया, यावर भर असून हंगामोत्तर व्यवस्थापन, शीतगृहे, पायाभूत विकास यांचा विचार आहे. त्यात कृषी उत्पादक संस्थांची जर उलाढाल १०० कोटींपेक्षा कमी असेल तर त्यांना पाच वर्षे करातून सूट दिली आहे. त्यात हंगामोत्तर प्रक्रियांवर भर दिला असून क्लस्टर पद्धतीने लागवड व कृषी मालाची वाहतूक यांचा विचार केला आहे. एफपीओ व व्हीपीओ मार्फत फलोत्पादन पुरवठा साखळी तयार केली जाणार आहे. ऑपरेशन ग्रीनमध्ये कृषी माल वाहतूक, प्रक्रिया यासाठी पाचशे कोटींची तरतूद केली आहे. त्यातून ग्रामीण भागात रोजगार निर्माण होतील. यात दोन हजार कोटी बाजारपेठ पायाभूत सुविधांसाठी दिले आहेत. खरीपाची किमान हमी किंमत आता उत्पादन खर्चाच्या दीडपट देण्याचे आश्वासन दिले आहे. बांबू उत्पादन म्हणजे हिरवे सोने. त्यासाठी १२९० कोटींची तरतूद केली आहे. पीएमएसवाय योजनेत तरतूद २६०० कोटी केली असून ९६ जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली येईल. तेथे सध्या तीस टक्के जमीनही ओलिताखाली नाही. अन्न प्रक्रिया उद्योगासाठी १४०० कोटींची तरतूद असून त्यातूनही रोजगार निर्माण होतील.

अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती, ग्रामीण कृषी, लघु व मध्यम उद्योग यावर भर दिला असून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचा उद्देश त्यात आहे. लघु व मध्यम उद्योगांना पतपुरवठा, मुद्रा योजनेत पत विस्तार, केला जाणार आहे. पायाभूत सुविधांवर खर्च वाढवला जाणार असून त्यामुळे रोजगार निर्मिती होईल. अर्थमंत्री जेटली यांनी स्वामी विवेकानंदांच्या मेमॉयर्स ऑफ युरोपियन ट्रॅव्हल या

**अर्थसंकल्पात रोजगार निर्मिती, ग्रामीण कृषी, लघु व मध्यम उद्योग यावर भर दिला असून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचा उद्देश त्यात आहे. लघु व मध्यम उद्योगांना पतपुरवठा, मुद्रा योजनेत पत विस्तार, केला जाणार आहे. पायाभूत सुविधांवर खर्च वाढवला जाणार असून त्यामुळे रोजगार निर्मिती होईल.**

ग्रंथातील नव भारताची संकल्पना अस्तित्वात येईल असे सांगितले. एका गूढ पोकळीत तुम्ही झोकून द्याल. त्यात तुमचे सामूहिक अस्तित्व असेल तुमच्या घराच्या ठिकाणी, दुकानाच्या ठिकाणी, शेतकऱ्यांच्या झोपडीतून, मच्छिमारांच्या झोपडीतून, बाजारपेठा, कारखाने, किराणा दुकाने, जंगले, पर्वत, डोंगर यातून




नवी पहाट उगवेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. एकूणच अर्थसंकल्प चांगला आहे. त्यात कृषी, आरोग्य, शिक्षण सुविधा, ग्रामीण विकास यावर भर आहे. आर्थिक शिस्त सोडलेली नाही. उत्पादन क्षेत्र, लघु व मध्यम उद्योग, आरोग्य सुविधा,.कौशल्य विकास यावर भर दिला आहे. यातून लाखो रोजगार निर्माण होतील व आठ टक्के आर्थिक विकास दर गाठला जाईल, यात शंका नाही.

■■■

*लेखक व्यवस्थापन विषयात पीएचडी असून ते तीस वर्षे विविध क्षेत्रात मार्गदर्शन करीत आहेत. सध्या ते नवी दिल्ली येथील पीएचडीसीसीआय संस्थेचे मुख्य संचालक आहेत.*

*email : ranjeetmehta@gmail.com*

# महिला सबलीकरण आणि अर्थसंकल्प

**डॉ. शाहीन राझी**



**हा अर्थसंकल्प 'भारताचा' अर्थसंकल्प होता. गरीबांचा, कृषिकांचा, स्त्रियांचा आणि उपेक्षितांचा अर्थसंकल्प होता. गरीबांसाठी, उपेक्षितांसाठी शासन सध्या व्यापारीकरणाच्या सहजतेकडून जगणं सहजतेकडे व्हावं याकडे वळत आहे. हा अर्थसंकल्प सुधारांचा आणि प्रगतीचा मार्ग चोखाळणारा आहे. ज्यामुळे भारताचे पुनरुत्थान होईल हा विश्वास प्रतित होतो.**

या वर्षीच्या अर्थसंकल्पाचा अहवाल बनविताना कृषी, आरोग्य, शिक्षण, रोजगार, महिला, लघू, सुक्ष्म आणि मध्यम उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्राला सबलता यावी या ध्येयाने आम्ही प्रेरित झालो होतो. मला खात्री आहे की आम्ही बनवू इच्छिलेला नवा भारत आता खरोखरीच उदयास येईल.

- अरुण जेटली

२०१८-१९ चा अर्थसंकल्प अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतिकारक होता. अर्थमंत्री जेटलींनी अर्थसंकल्प सादर केला. ज्यामध्ये नव्या रोजगार संधींना उत्तेजन आहे. २५ कोटी उलाढाल असणाऱ्या कंपन्यांचा कॉर्पोरेट कर २५ टक्यांपर्यंत माफ केला आहे, सर्व क्षेत्रात श्रमसंधी विपुल व्हावी म्हणून (Contract Based) कराराधारित रोजगार उपलब्ध करून दिला आहे. १०० दशलक्ष गरीब घरांना सेवा पुरवू शकेल, अशा जगातल्या सर्वांत मोठ्या आरोग्य सेवा योजनेसाठी पाया घातला आहे.

हा अर्थसंकल्प 'भारताचा' अर्थसंकल्प होता. गरीबांचा, कृषिकांचा, स्त्रियांचा आणि उपेक्षितांचा अर्थसंकल्प होता. गरीबांसाठी, उपेक्षितांसाठी शासन सध्या व्यापारीकरणाच्या सहजतेकडून जगणं सहजतेकडे व्हावं याकडे वळत आहे. हा अर्थसंकल्प सुधारांचा आणि प्रगतीचा मार्ग चोखाळणारा आहे. ज्यामुळे भारताचे पुनरुत्थान होईल हा विश्वास प्रतित होतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत, स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी झटत आहे. १९२० नंतर विशेषत: हे प्रयत्न चालू झाले. शासन आणि शासनेतर क्षेत्र (खाजगीक्षेत्र) दोन्ही विविध कार्यक्रमांद्वारे स्त्रीशिक्षणाला बढावा देत आहेत. त्यांना उत्तम आरोग्य मिळावं, उपजीविकेचं साधन मिळावं, घरगुती वा सामाजिक निर्णयप्रक्रियेत सहभागी होता यावे यासाठी संधी देत आहेत. परिपूर्ण जीवन जगता यावे आणि मुख्य म्हणजे मुलगी म्हणून जगण्याच्या शक्यता वधाराव्या याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

१९९३ मध्ये झालेली ७३ वी घटना दुरुस्ती या दृष्टीने मोठे पाऊल म्हणता येईल. या दुरुस्तीमुळे अनुसुचित जाती व जमातीतील जनतेला ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्येनुरुप ग्रामपंचायतीमध्ये जागांसाठी आरक्षण मिळू लागले. जोडीने, महिलांसाठी एक तृतीयांश राखीव जागाही फलदायी ठरल्या. ज्यामुळे महिला राजकीय दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम झाल्या. सध्याच्या घडीला अंदाजे २००,००० ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी भारतवर्षात आहेत. त्यातील सुमारे ७५००० प्रतिनिधी महिला आहेत. हा आकडा जगातील निवडून आलेल्या महिलांमध्ये सर्वाधिक होय.

मोदी सरकार महिला आरक्षण विधेयक आणू पाहत आहे. ज्यायोगे लोकसभा आणि विधी मंडळात महिलांना १/३ राखीव जागा मिळतील.

संसदेत स्त्रियांना मिळणारे आरक्षण कितीही महत्वाचे असले तरी मूळ प्रश्न हा स्त्रियांना घरोघरी आणि परिणामी समाजात निर्णयप्रक्रियेत त्यांना ग्राह्य धरले जाते का, हा आहे. त्यांची निर्णय क्षमता विकसित करणे हे आव्हान आहे. ज्यामुळे त्यांना त्यांची समाजातील भूमिका नेमकेपणाने निभावता येऊ शकेल.

स्वातंत्र्यानंतरच्या अर्धशतकानंतरही असे पाहण्यात आले की, स्त्रियांच्या पायातल्या बेड्या अजून घट्ट आहेत. पंजाब, दिल्ली आणि हरियाणा सारख्या श्रीमंत राज्यात जन्मापासूनच म्हणजेच अगदी स्त्रीभ्रूण हत्या, आणि लिंगभेद या गोष्टींना सामोरे जावे लागते. शहर वा ग्रामीण कोणताही प्रांत यास अपवाद नाही. ही जन्मापासूनच अमंगळाची सुरुवात या शोकांतिकेला जन्मापासूनच लैंगिक अत्याचार, हुंडाबळी आणि हुंडा अत्याचार, आरोग्याविषयी पुरेपुर अनास्था, कामाच्या ठिकाणी आणि घरात भेदभावापासून पुढे वाढतच जाते. ही यादी ना संपणारी आहे, ना यापासून सुटका...

**१९९३ मध्ये झालेली ७३ वी घटना दुरुस्ती या दृष्टीने मोठे पाऊल म्हणता येईल. या दुरुस्तीमुळे अनुसुचित जाती व जमातीतील जनतेला ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्येनुरुप ग्रामपंचायतीमध्ये जागांसाठी आरक्षण मिळू लागले. जोडीने, महिलांसाठी एक तृतीयांश राखीव जागाही फलदायी ठरल्या. ज्यामुळे महिला राजकीय दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम झाल्या. सध्याच्या घडीला अंदाजे २००,००० ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी भारतवर्षात आहेत. त्यातील सुमारे ७५००० प्रतिनिधी महिला आहेत.**

म्हणूनच २०१८-१९ अर्थसंकल्पाने महिलांना सबळ बनविण्यासाठी विविध योजनांची निर्मिती केली आहे.

★ उज्वला योजनेअंतर्गत ५० दशलक्ष घरांना दिली जाणारी LPG जोडणी आता ८० दशलक्ष घरांना दिली जाईल.

अर्थसंकल्प महिलाप्रधान असल्याने महिला लाभधारकांना याचा विशेष फायदा मिळेल अशी जाहीर घोषणा झाली.

शासनाचा पुढाकार यामुळे दोन समस्या सोडवेल असा मानस आहे. पहिला म्हणजे, स्त्रियांचे आरोग्य. ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रियांचे इंधन सरपण आणि स्वयंपाक बनविण्यासाठी लागणाऱ्या पारंपारिक सवयींपासून मुक्ती मिळेल. दुसरे असे की, प्रदूषणाचा टक्का यामुळे घटेल.

या उपाययोजनेने महिला सबलीकरण होईल, तथा त्यांचे आरोग्यही जपले जाईल, यामुळे महिलांची गुलामी आणि स्वयंपाकावर खर्च होणारा वेळही कमी होईल. याव्यतिरिक्त ग्रामीण युवा जनतेला स्वयंपाकासाठी लागणारा गॅस पुरवण्यातून रोजगार मिळेल.

शासनाद्वारे तथा शिफारस मंडळाद्वारे केलेल्या अभ्यासानुसार हे स्पष्ट झाले आहे की घरातून होणारे वायू प्रदूषण हे भारतात प्रतिसाल होणाऱ्या ५ लाख मृत्यूंना कारणीभूत आहे. या योजनेची व्याप्ती फार मोठी असेल, तिथपर्यंत ही सेवा पोहोचली जाईल जिथे परंपरेने चालत आलेल्या चुली सरपणाच्या सवयी आहेत आणि गॅस सिलिंडर वापरणे

हे उच्च मध्यमवर्गीयांचे चोचले समजले जातात. यावर अर्थमंत्री म्हणाले की, ही विलासी (Luxury) गोष्ट हळूहळू मध्यमवर्गीयांत पोहचत असली तरी गरिबांपर्यंत मात्र पोहोचलेली नाही. तरी आता दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापर्यंत ही गॅस जोडणी पोहचवली आहे.

ही सेवा आजवर राज्यातल्या इंधन विक्री करणाऱ्या पुरवठेदारांच्या CSR म्हणजे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी विभागाद्वारे पोहोचवली जात होती. दारिद्र्यरेषेखालील कुटुबांनाही सेवा पोहचवताना गरीब जनतेचे अस्तित्व जास्त असणाऱ्या राज्यांना प्राधान्यक्रम दिला जाईल.

★ प्रधानमंत्र्यांच्या सौभाग्य योजनाअंतर्गत सर्व घरांना वीजपुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने १६० अब्ज रुपये खर्च केले आहेत.

★ स्त्री सुरक्षेसाठी शासनाचा १९.७५ कोटी निधी मंजूर झाला आहे. उदा. निर्भया निधी

★ महिला SHGs ना मार्च २०१९ पर्यंत रु ७५००० कोटी रू कर्जाऊ देण्यात येणार आहेत

सेंद्रिय शेतीसाठी या गटांना कर्जाऊ निधी आणि प्रोत्साहनपर निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

★ नव्या Gold Policy मध्ये स्त्रियांना सोने बँकेत ठेवून २.२५ ते २.५०टक्क्यांपर्यंत व्याज मिळवता येईल.

★ महिला नोकरदारांसाठी EPF कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी १२ ते ८ टक्के इतका पहिल्या ३ वर्षासाठी असेल. Employer (रोजगार दाता) मालकाच्या योगदानात मात्र बदल नसेल.

**शासनाद्वारे तथा शिफारस मंडळाद्वारे केलेल्या अभ्यासानुसार हे स्पष्ट झाले आहे की घरातून होणारे वायू प्रदूषण हे भारतात प्रतिसाल होणाऱ्या ५ लाख मृत्यूंना कारणीभूत आहे. या योजनेची व्याप्ती फार मोठी असेल, तिथपर्यंत ही सेवा पोहोचली जाईल जिथे परंपरेने चालत आलेल्या चुली सरपणाच्या सवयी आहेत आणि गॅस सिलिंडर वापरणे हे उच्च मध्यमवर्गीयांचे चोचले समजले जातात.**

★ महिला नोकरदारांना (मातृत्वविशेष) रजा सहा महिने पगारी रजा द्यावी. Dept of Perdonnel & Training ने सर्व मंत्रालये आणि खात्यांनाही २०१५ चा दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे सरोगसीद्वारे मातृत्व स्विकारणाऱ्या मातांनाही ही रजा घेता येईल. गर्भारपण आणि बाळंतपण या दोन्हीकाळावधीसाठीची रजा याचा या एकूण रजेत अंर्तभाव असेल.

★ राष्ट्रीय महिला आयोगासाठी २४ कोटी रु निधी मंजूर झाला आहे.

★ स्वच्छ भारत मिशन अंतर्गत २० दशलक्ष शौचालये बांधण्यात येतील. याचा चांगला परिणाम स्त्रियांचा आदर, मुलींचे शिक्षण आणि कुटुंबाचे एकूण आरोग्य जपण्यात होईल.

★ बेटी बचाओ, बेटी पढाओ या कार्यक्रमासाठी, रु २८० कोटी मंजूर केले असून हा कार्यक्रम त्याच्या नावाप्रमाणेच जनतेमध्ये जागरुकता निर्माण व्हावी तथा मुलींसाठी मांडलेली कल्याणकारी सेवांची स्थिती सुधारावी या दृष्टीने भारत सरकारने आरंभलेले सामाजिक अभियान आहे. ही योजना सुरुवातीस केवळ रु १०० कोटी इतक्या निधीने आरंभ झाली होती. अशिक्षीतता, असमानता, लैंगिक छळ आणि स्त्रीभ्रूणहत्या विरोधात योग्य पद्धतीने लढा उभारल्यास स्त्रियांचा उद्धार अशक्य नाही.

भारत सरकारने महिला आणि बाल कल्याण मंत्रालय, HR विभाग आणि आरोग्य कुटुंबकल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने हा बेटी बचाओ बेटी पढाओ हा कार्यक्रम उभारला आहे. याची व्याप्ती समग्र राज्ये व केंद्रशासित प्रदेशांपर्यंत आहे. ही योजना २०१५ मध्ये उदयास

आली ह्याची प्राथमिक उद्दीष्टे पुढील प्रमाणे...

- स्त्री भ्रूण - मुलींचे बळी वाचवणे

- नव्या योजना योजणे आणि शिस्तीने काम करणे जेणेकरुन प्रत्येक मुलीस सुरक्षित आणि संरक्षित वाटावे.

- प्रत्येक कन्येला दर्जेदार खात्रीने मिळावे, यासाठी प्रयत्न करणे.

सुकन्या समृध्दी योजना ही एक प्रकारची अशी उपाययोजना आहे, ज्यात अल्परक्कमेचे खाते मुलींना उघडता येते आणि भारत सरकारच्या बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेचा भाग होता येते. मुलींचे शिक्षण आणि लग्न यासाठी येणारा खर्च निभावता यावा, हा या मागील उद्देश वार्षिक ९.२ टक्के दराने या ठेवी उघडल्या जातात. पालक वा कायद्याने नियुक्त पालक हे खाते मुलींच्या नावावर उघडू शकतात. मुलगी २१ वर्षांची झाल्यावर मात्र हे खाते बंद होते. २१ वर्षांअगोदर हे खाते बंद करण्याची मुभा तेव्हाच आहे जेव्हा १८ वर्षाची झाल्यावर मुलीचे लग्न लावल्याचा पुरावा सादर होईल.

जनतेला जागे करण्यासाठी, स्त्रियांना स्वत:च जागृत होण्याची गरज आहे. एकदा का स्त्रीची प्रगती झाली की कुटुंब, गाव आणि देशाची प्रगती होण्यास वेळ लागत नाही. म्हणूनच पंतप्रधानांनी स्त्री सबलतेचे कार्यक्रम सुरू केले आहेत. स्त्रीशिक्षणाद्वारा मुलींना सबळ करण्यामध्ये हे महत्वाचे पाऊल आहे.

२०१८ चा अर्थसंकल्प भारताच्या विकासात क्रांतीकारी आराखडा आहे. असा पहिलाच

**जनतेला जागे करण्यासाठी, स्त्रियांना स्वत:च जागृत होण्याची गरज आहे. एकदा का स्त्रीची प्रगती झाली की कुटुंब, गाव आणि देशाची प्रगती होण्यास वेळ लागत नाही. म्हणूनच पंतप्रधानांनी स्त्री सबलतेचे कार्यक्रम सुरू केले आहेत. स्त्रीशिक्षणाद्वारा मुलींना सबळ करण्यामध्ये हे महत्वाचे पाऊल आहे.**

अर्थसंकल्प हा होता ज्यात सामाजिक क्षेत्राला केंद्रस्थानी आणले गेले भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या काही आव्हानांना निर्देशित करत अर्थमंत्र्यांनी त्यावर प्रकाशझोत टाकला. ज्यामध्ये आरोग्याचा दर्जा आणि शिक्षण स्त्री, सबलता कृषीक्षेत्राची व्याप्ती आणि रोजगाराची निर्मिती यांचा समावेश होतो.

अर्थसंकल्प २०१८-१९ जलद अर्थविकासाची हमी देतो. स्त्रियांना सामर्थ्यवान बनविण्यासाठी आणि लैंगिक समानता आणण्यासाठी यासारखे दुसरे कोणतेही साधन परिणामकारक असणार नाही.

लेखिका अर्थतज्ञ तथा शिक्षणतज्ञ आहे. त्यांनी UGC इमिरीटस केले आहे. या व्यतिरिक्त पदवी आणि पदव्योत्तर इयत्तांना शिकवण्याचा दांडगा अनुभव त्यांच्या गाठीला आहे. त्या संशोधनात व्यग्र असतात. राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात परिषदा आणि सत्रे यामध्ये त्यांचा पुढाकार असतो. एक सिध्द हस्त लेखिका म्हणून डॉ. शाहीन संशोधनपरलेख आणि पुस्तके लिहितात. समाजिक व्यग्र असतात. समाजाच्या तळागाळात काम करण्यात त्यांना फार आवडते.

■■■

*लेखिका अर्थतज्ञ तथा शिक्षण तज्ञ असून अनेक संशोधनपर लेख आणि पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.*

*email :shahin.razi@gmail.com*

# मेट्रो प्रकल्पांसाठी महाराष्ट्राला स्पष्ट तरतूद

रमेश झवर



**कृषीकर्ज माफीमुळे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर सतत ताण पडतो. तरीही राज्यात द्राक्ष, संत्रा, केळी, डाळिंबे, लिची, चेरी इत्यादि फळांचे उत्पादन आणि बाजारपेठ मोठी आहे. राज्यातला साखरउद्योग आणि कापडउद्योग मोठा आहे. साखर उद्योग सहकारी क्षेत्रात तर कापड उद्योग खासगी क्षेत्रात आहे. हे सगळे नमूद करण्याचा उद्देश इतकाच की महामार्ग, वीजनिर्मिती इत्यादि पायाभूत सुविधांची महाराष्ट्राची गरज अन्य राज्यांपेक्षा कितीतरी मोठी आहे.**

यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले? महाराष्ट्र सरकारला काय मिळाले? ह्या दोन्ही प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न ह्या लेखात केला आहे. सर्वप्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की महाराष्ट्र हे देशातल्या अनेक राज्यांपेक्षा कितीतरी प्रगत राज्य आहे. सातशे किलोमीटर लांबीचा किनारा लाभलेल्या ह्या राज्यात मुंबई आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ही दोन बंदरे आहेत. ह्या दोन्ही बंदरातल्या वाहतुकीमुळे देशातला फार मोठा आयातनिर्यात व्यापार ह्या बंदरातून चालतो. देशातील मालवाहतुकीपैकी ४० टक्के मालवाहतूक मुंबईत एकवटलेली असून वाहनांची संख्याही महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त आहे. राज्यातील बहुसंख्य लोकांची उपजीविका कृषीवर अवलंबून असली तरी काही पॉकेट्स वगळता महाराष्ट्रातली शेती कोरडवाहू आहे. सततच्या दुष्काळामुळे महाराष्ट्राला सतत फटका बसत आला आहे. कृषीकर्ज माफीमुळे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर सतत ताण पडतो. तरीही राज्यात द्राक्ष, संत्रा, केळी, डाळिंबे, लिची, चेरी इत्यादि फळांचे उत्पादन आणि बाजारपेठ मोठी आहे. राज्यातला साखरउद्योग आणि कापडउद्योग मोठा आहे. साखर उद्योग सहकारी क्षेत्रात तर कापड उद्योग खासगी क्षेत्रात आहे. हे सगळे नमूद करण्याचा उद्देश इतकाच की महामार्ग, वीजनिर्मिती इत्यादि पायाभूत सुविधांची महाराष्ट्राची गरज अन्य राज्यांपेक्षा कितीतरी मोठी आहे. त्याखेरीज अद्यावत संगणकीय ज्ञानाला प्राधान्य देणाऱ्या फिन्टेक कंपन्यांची तर महाराष्ट्राला विशेष गरज आहे.

मुंबई स्टॉक एक्स्चेंज आणि राष्ट्रीय स्टॉक एक्स्चेंज ही भांडवल बाजाराची मोठी केंद्रे महाराष्ट्रातच आहे. साहजिकच भांडवल बाजाराच्या अनुषंगाने बँकिंग व्यवसायाचे मुंबई शहर हे नैसर्गिक केंद्र आहे. त्यामुळे साहजिकच महाराष्ट्रात वीज आणि महामार्गसारख्या पायाभूत सुविधांची गरज वाढती आहे. राज्यातली मार्गांची लांबी २.४३ लाख किलोमीटर्स आहे तर राज्यातून ५९८३ किलोमीटर रेल्वे मार्ग जातो. मुंबईखेरीज वसई-विरार, पुणे, औरंगाबाद, भिवंडी नाशिक, नागपूर, सोलापूर, सोलापूर, मालेगाव, जळगाव, भुसावळ,

अमरावती, अकोला, लातूर आणि नांदेड ह्या शहरांचा सतत विस्तार होत असून सर्व शहरातल्या पायाभूत सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे चित्र अलीकडे उभे राहिले आहे. नागरी वाहतुकीची समस्याही राज्यात मोठी आहे. ही समस्या राज्याच्या प्रगतीत मोठा अडसर होऊन बसली आहे.

केंद्राकडून महाराष्ट्राच्या दोन अपेक्षा होत्या. नागरी वाहतुकीसह सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधांसाठी भरपूर वित्तसाह्य मिळाले पाहिजे. दुसरी म्हणजे महाराष्ट्राच्या सिंचन व्यवस्थेत भर घालण्यासाठी भरपूर निधी मिळाला पाहिजे. अर्थमंत्री अरूण जेटली ह्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर नजर टाकली तरी महाराष्ट्राच्या ह्या दोन्ही गरजांचा अर्थमंत्र्यांनी यथायोग्य दखल घेतली आहे. वाढत्या मालमाहतुकीची राज्याची गरज लक्षात घेता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महामार्गाची निर्मिती ही पहिली गरज आहे. ते काम वेगाने सुरू असून त्यासाठी बऱ्यापैकी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुसरे म्हणजे अर्थसंकल्पात राज्यातले ७ रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्याखेरीज शहरी वाहतुकीसाठी मेट्रो प्रकल्प राबवण्यासाठीही मोठी तरतूद करण्यात आली आहे.

**राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी यंदा मुंबई मेट्रो-३ (भुयारी रेल्वे), पुणे आणि नागपूर ह्या तीन शहरातील मेट्रो प्रकल्पांसाठी ५,२०० कोटींची मागणी करण्यात आली होती. ही मागणी शंभर टक्के पूर्ण होणार नाही ह्याची राज्याला कल्पना आहे. यंदा मेट्रो प्रकल्पांसाठी गेल्या वर्षीच्या १७८१० कोटींच्या तरतुदीत कपात करण्यात आली असून ती १४,९२३ कोटींवर आणण्यात आली आहे.**

राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी यंदा मुंबई मेट्रो-३ (भुयारी रेल्वे) , पुणे आणि नागपूर ह्या तीन शहरातील मेट्रो प्रकल्पांसाठी ५,२०० कोटींची मागणी करण्यात आली होती. ही मागणी शंभर टक्के पूर्ण होणार नाही ह्याची राज्याला कल्पना आहे. यंदा

## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________ date ____________

Name (in block letters) : ____________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________

Phone No. / email : ____________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**
**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

मेट्रो प्रकल्पांसाठी गेल्या वर्षीच्या १७८१० कोटींच्या तरतुदीत कपात करण्यात आली असून ती १४, ९२३ कोटींवर आणण्यात आली आहे. ह्या पार्श्वभूमीवर मुंबई भुयारी मेट्रो, पुणे आणि नागपूर येथील मेट्रो प्रकल्पांचा उल्लेख करण्यात आला हे महत्त्वाचे आहे. ज्या अर्थी ह्या तीन प्रकल्पांचाच उल्लेख करण्यात आला त्या अर्थी ह्या तिन्ही प्रकल्पांचे काम पैशावाचून अडणार नाही हे उघड आहे. ह्याचा अर्थ मेट्रो प्रकल्पावरील तरतुदीचा भरघोस वाटा महाराष्ट्राला मिळणार आहे. विनियोग विधेयकावरील चर्चेत महाराष्ट्रासाठी जादा तरतूद घोषित केली जाण्याची शक्यता आहे. किंवा जसजशी गरज निर्माण हाईल तसतशी रक्कम पुरवली जाण्याचे आश्वासन चर्चेच्या दिले जाईल. देशात अन्य शहरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांसाठीही निधीची आवश्यकता आहेच. ती त्यांना प्रत्यक्ष कामाची प्रगती पाहून देण्यात येईल. तसे पाहिले तर देशातील पायाभूत सुविधांच्या एकूण कामांपैकी ५० टक्के प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहेत. राज्याचा एकूण प्रकल्प खर्च लक्षात घेता १ लाख कोटींपेक्षा अधिक रकमेची गरज आहे. एवढा मोठा निधी बाह्य मार्गाने उभारण्यात येईल हे उघड आहे. त्यात अर्थात परदेशी गुंतवणूक अपेक्षित आहे.

स्मार्ट सिटी हा केंद्र सरकारचा भव्य प्रकल्प आहे. ह्या प्रकल्पासाठी गेल्या वर्षी करण्यात आलेली ८९९८ कोटींची रक्कम १२१६९ कोटींपर्यंत वाढवण्यात आली आहे. हा वाढीव निधी ४४ शहरांसाठी आहे. त्यापैकी राज्यातल्या १० शहरांना ह्या निधीचा वाटा मिळणार आहे. मात्र, मुंबईत होऊ घातलेला आंतरराष्ट्रीय वित्तीय हब निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य राबवत आहे. फिन्टेकविषयक धोरण जाहीर झाले तरी महाराष्ट्राच्या प्रकल्पाचा उल्लेख अर्थमंत्री जेटली ह्यांनी टाळला आहे. ह्याचा अर्थ महाराष्ट्राने हा प्रकल्प स्वबळाव राबवावा अशी केंद्राची अपेक्षा असू शकते. अर्थात प्रकल्पाच्या उभारणीसाठी छोटेमोठे खर्च देण्याचे केंद्राने मान्य केलेले असू शकते. त्याखेरीज परकी साह्यापैकी विवक्षित वाटा ह्या प्रकल्पासाठी वळवण्यात येऊ शकतो. अन्यथा एवढ्या मोठ्या


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**
**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

प्रकल्पाकडे केंद्राने दुर्लक्ष केले नसते.

रेल्वे मार्ग हा महाराष्ट्र राज्याचा 'विक पॉईंट' आहे. ह्या अर्थसंकल्पात रेल्वेच्या ३६ प्रकल्पांसाठी ५९६२४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ५९७६ किलोमीटर लांबीचा रेल्वे मार्ग परिपूर्ण करण्यासाटी ह्या तरतुदीचा उपयोग ङोणार आहे. रेल्वे अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आल्यामुळे महाराष्ट्राला अधिक फायदा झाला आहे. पूर्वी रेल्वे मंत्र्यांच्या मर्जीनुसार ह्या वाट्यात थोडा फेरफार करण्यात येत असे. २००९पासून ते २०१४ पर्यंतच्या काळात रेल्वेच्या खर्चात ४६८ टक्के वाढ झाली. रेल्वेच्या खर्चात सरासरी ११७१ कोटींची वाढ होत आहे. ह्या अर्थसंकल्पात ६६५८ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित करण्यात आला हे लक्षात घेता महाराष्ट्राला रेल्वे खर्चाचा घसघशीत वाटा मिळाला आहे असे म्हणायला हरकत नाही. ह्या वर्षी इगतपुरी-मनमाड रेल्वेमार्ग तिहेरी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. उपनगरी रेल्वेसाठी ५१ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून ९० किलोमीटरच्या चौपदरीकरणाखेरीज १५० कोटीचा नवा मार्ग निर्माण करण्याचे अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आले आहे. ह्या प्रकल्पाच्या काही भागाचा इलेव्हेटेड कॉरिडॉरही अंतर्भूत आहे.

अर्थसंकल्प सादर केला जाण्यापूर्वी राज्याने केंद्राकडे ९० पाटबंधारे प्रकल्प पुरे करण्यासाठी ३५ हजार कोटींची मागणी केली होती. सिंचनव्यवस्थेत भर घालण्यासाठी हे प्रकल्प पुरे होणे आवश्यक आहे. शेततळे, शेतीत बांध घालणे इत्यादि फुटकळ योजना राज्यात पूर्वीच राबवण्यात आल्या असल्या तरी विदर्भ आणि मराठवाड्याच्या आत्महत्त्याप्रवण भागातले ९० पाटबंधारे प्रकल्प पुरे केल्याखेरीज राज्यापुढे अन्य पर्याय उरलेला नाही. म्हणून ह्या निधीसाठी राज्याने जोर लावला होता. त्याखेरीज अन्य प्रकल्प मिळून मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडे १०७ प्रकल्पांसाठी १० हजार कोटींची मागणी मागणी केली होती. ही मागणी मात्र केंद्राने तत्त्वत: मान्य केली आहे. हा निधी राज्याला अर्थसंकल्पाच्या माध्यमातूनच परंतु क्रमश: मिळणार आहे. शेती विकासासाठी योजण्यात आलेल्या निधीचा उपयोग संशोधन प्रकल्प, शेतीमालाचे दर स्थिर राखण्यासाठी अमलात येणाऱ्या योजनांवरही केला जाणार आहे.

**यंदाच्या अर्थसंकल्पाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा निधी वाढवण्यात आला आहे. सुमारे साठाहून अधिक योजना केंद्र सरकार राबवत असते. त्यापैकी अनेक योजना राज्यांच्या सहकार्याने राबवल्या जातात. ह्या योजनांचा फायदा अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्यालाही होत असतो. मात्र, ह्या योजना किती चांगल्या प्रकारे राबवल्या जातात ह्यावर केंद्राची मदत अवलंबून असते.**

यंदाच्या अर्थसंकल्पाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा निधी वाढवण्यात आला आहे. सुमारे साठाहून अधिक योजना केंद्र सरकार राबवत असते. त्यापैकी अनेक योजना राज्यांच्या सहकार्याने राबवल्या जातात. ह्या योजनांचा फायदा अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्यालाही होत असतो. मात्र, ह्या योजना किती चांगल्या प्रकारे राबवल्या जातात ह्यावर केंद्राची मदत अवलंबून असते. अनेकदा योजनांखालील प्रस्ताव केंद्राला राज्यांकडून पाठवायला उशीर होतो. त्यातूनही सादर केल्या जाणाऱ्या प्रस्तावात मूळ नियमांशी विसंगत ठरतात. काही वेळा राज्यांकडून त्या योजनात बदलही सुचवलेले जातात. अनेकदा योजना 'बूमरँग' होतात आणि राज्यांना निधी मिळत नाहीत. त्यामुळे केंद्र राज्य संबंधात अकारण कटुता येते. ह्या संदर्भात महाराष्ट्र राज्य आणि केंद्र ह्यांच्या संबंधात कटुता येण्याचे प्रमाण कमी आहे.

योजनांखालील प्रस्ताव निर्दोषपणे सादर केले जातात. त्याचा फायदा महाराष्ट्र सरकारला निश्चित होतो. यंदाच्या अर्थसंकल्पात शौचालयांचे लक्ष्य २ कोटी ठरवण्यात आले तर मोफत गॅसजोडणीचे लक्ष्य ८ कोटी करण्यात आले आहे. पशुपालन आणि मत्योत्पादनास किसान क्रेडिट कार्डचा लाभ देण्याचे सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केले असून मच्छीमारी करणाऱ्या समाजास त्याचा फायदा मिळू लागेल. यंदा आयआयटीत अर्थसंकल्पात प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर स्कूल स्थापन करण्याचा मनोदय अर्थसंकल्पात व्यक्त करण्यात आला आहे. मुंबईतील पवई आयआयटीला ह्या निर्णयाचा फायदा मिळू शकेल. त्याचप्रमाणे बीएडचा इंडिग्रेटेड कोर्स सुरू करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील शैक्षणिक संस्थांना हा कोर्स सुरू करता येईल. ह्या बाबतीत शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने पुढाकार घेतल्यास शैक्षणिक क्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने पुढे पाऊल पडेल.

यंदा शेतकऱ्यांना दीडपट कींमत अदा करण्याचा निर्धार अर्थमंत्र्यांनी जाहीर केला आहे. आतापर्यंत गहू, तांदूळ, कडधान्य इत्यादि शेतमाल खरेदी करण्यासाठी किमान हमीभाव हंगामापूर्वी जाहीर करण्यात येत असे. यंदा प्रथमच अर्थसंकल्पात शेतीमालाच्या खर्चाच्या दीडपट एवढा हमीभाव देण्याची महत्तम योजना जाहीर केली आहे. हमीभाव योजनेतून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची 'बेस्ट प्राईस' तर मिळेलच; त्याखेरीज शेती व्यवसाय नफ्यात येण्याची पुरेपूर शक्यता आहे. शेतीमालाच्या संदर्भात प्रत्यक्ष किती रक्कम लागेल ह्याचा अंदाज बांधता येणार नाही. खरीप पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना अर्थसंकल्पाने दिलेल्या मालाच्या किंमतीच्या दीडपट भावाची हमी दिल्यामुळे महाराष्ट्राला निश्चित फायदा होईल. शेती व्यवसाय किफायतशीर करण्याच्या दृष्टीने हे दमदार पाऊल टाकण्यात आले आहे. सरकार केवळ घोषणा करूनच थांबलेले नाही. 'ई नाम' ह्या राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेसाठी अर्थसंकल्पात २००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे ह्या राष्ट्रीय बाजार समितीमुळे देशभरातले भाव कुठल्याही शेतकऱ्यास समजू शकतील. ह्या राष्ट्रीय कृषी उत्पादन बाजारास देशभरातल्या कृषी उत्पन्न बाजार समितीविषयक नियमनातून सूट देण्यात आली आहे. शेअर, सोने, कमॉडिटीप्रमाणे देशभरातील शेतीमालाची अचूक माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे. महाराष्ट्राला त्याचा अधिक फायदा होईल. ह्याचे कारण महाराष्ट्रात अन्य राज्यांच्या तुलनेने कृषी उत्पादन बाजार समित्यांचे जाळे मजबूत आहे. अर्थसंकल्पातल्या ह्या तरतुदीचा महाराष्ट्राला अप्रत्यक्ष फायदा होणार आहे. अर्थसंकल्पात अन्नउत्पादन प्रक्रियेवरील तरतूद ७१५ कोटींवरून १४०० कोटी करण्यात आली आहे. त्याचाही महाराष्ट्राला अधिक लाभ मिळेल. 'राष्ट्रीय बांबू मिशन'साठीची तरतूद १२९० कोटींपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**खरीप पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना अर्थसंकल्पाने दिलेल्या मालाच्या किंमतीच्या दीडपट भावाची हमी दिल्यामुळे महाराष्ट्राला निश्चित फायदा होईल. शेती व्यवसाय किफायतशीर करण्याच्या दृष्टीने हे दमदार पाऊल टाकण्यात आले आहे. सरकार केवळ घोषणा करूनच थांबलेले नाही. 'ई नाम' ह्या राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेसाठी अर्थसंकल्पात २००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे ह्या राष्ट्रीय बाजार समितीमुळे देशभरातले भाव कुठल्याही शेतकऱ्यास समजू शकतील.**

देशातील १० कोटी गरीब लोकांना ५ लाखांचा मेडिक्लेम देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करणयत आली आहे. ह्या योजनेसाठी निश्चित अशी तरतूद करण्यात आली नाही हे खरे आहे. योजनेचा संपूर्ण तपशील मुळात नव्याने तयार करण्यात येणार असल्याने विवक्षित तरतूद करता येणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. आयुष्मान भारत कार्यक्रमाची ही

विशाल आवृत्तीच आहे. सध्या इस्पतिळातील उपचाराचा खर्च आटोक्याबाहेर जात चालला आहे. शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थितीही दयनीय आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी अत्याधुनिक उपचारपध्दती सुरू करण्याचाही अनेक राज्य सरकारांचा प्रयत्न सुरू आहे. देशाच्या पातळीवर समग्र आरोग्य योजना विमा योजना लागू केल्याखेरीज वैद्यकीय उपचाराला येणाऱ्या खर्चाच्या समस्येची तड लागणार नाही असे वैद्यकीय व्यवसायाचे मत आहे. १३७ कोटी लोकसंख्येच्या देशात विदेशातल्याप्रमाणे वैद्यकीय उपचार विम्याखाली आणण्याची सार्वत्रिक योजना हवी अशी मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून केली जात आहे. परंतु सार्वत्रिक आरोग्य विमा योजनेचे शिवधनुष्य देशाला पेलता येईल का? ह्या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही. एक मात्र खरे की महाराष्ट्रातल्या सरकारी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील इस्पितळांना आरोग्य विम्याची योजना लागू केल्यास सामान्य माणसास त्याचा फायदा होईल. सरकारने तूर्तास १० कोटी लोकांसाठी का होईना, आरोग्य विमा लागू करण्याची घोषणा केली आहे. ही आरोग्य विमा योजना, खरे तर, भावी काळात सार्वत्रिक आरोग्य विमा लागू करण्याच्या दृष्टीने पथदर्शी प्रकल्पच ठरायला हवा.

महाराष्ट्रासाठी किती तरतूद आहे ह्यापेक्षा जाहीर झालेल्या योजनांचा महाराष्ट्राला प्रत्यक्ष लाभ किती मिळणार असा प्रश्न विचारणे जास्त युक्त ठरेल. केंद्रीय योजनांचा लाभ महाराष्ट्रातील जनतेला मिळवून देण्याचे आव्हान यंदाच्या महाराष्ट्र अर्थसंकल्पापुढे राहील. ते आव्हान पेलण्याची राज्याची क्षमता आहे.

■■■

*लेखक आर्थिक विषयाचे तज्ज्ञ असून नामांकित स्तंभ लेखक आहेत.*
*email* : rzawar@gmail.com



# प्रगतीपथावरील भारतीय अर्थव्यवस्था


**डी. एस्. मलीक**



**नोटबंदी आणि वस्तू आणि सेवा कर यासारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणांना सुरवातीला काही अडचणींना तोंड द्यावे लागले, ज्यामुळे एकूण देशांतर्गत उत्पादन वाढीवर तात्पुरता परिणाम झाला. तरिही तो परिणाम आता संपला आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आय् आय् पी), कोअर सेक्टर, इंडेक्स, वाहन, ग्राहक क्रयशक्ती इत्यादी सर्व निर्देशांकांनी मजबूत वाढ नोंदवली आहे. चालू आर्थिक वर्षात (२०१७-१८) दुसऱ्या तिमाहीत खूप चांगल्या वाढीची अपेक्षा आहे.**

भारत ही २,५०० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था आहे. जगातल्या वेगाने विकसित होणाऱ्या मुख्य अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारतीय अर्थव्यवस्था उदयाला येत आहे. येत्या १०-१५ वर्षांत जगातल्या सर्वोच्च तीन अर्थसत्तांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा समावेश होण्याची अपेक्षा आहे. सध्याच्या सरकारच्या कार्यकाळातल्या तीन वर्षात, म्हणजे २०१४-१५, २०१५-१६ आणि २०१६१७ मध्ये भारताचा विकासदर प्रतिवर्ष ७.५% इतका दमदार होता. २०१५-१६ मध्ये तर विकासदर ८%च्या वर राहीला.

नोटबंदी आणि वस्तू आणि सेवा कर यासारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणांना सुरवातीला काही अडचणींना तोंड द्यावे लागले, ज्यामुळे एकूण देशांतर्गत उत्पादन वाढीवर तात्पुरता परिणाम झाला. तरिही तो परिणाम आता संपला आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आय् आय् पी), कोअर सेक्टर, इंडेक्स, वाहन, ग्राहक क्रयशक्ती इत्यादी सर्व निर्देशांकांनी मजबूत वाढ नोंदवली आहे. चालू आर्थिक वर्षात (२०१७-१८) दुसऱ्या तिमाहीत खूप चांगल्या वाढीची अपेक्षा आहे. भारतीय अर्थव्यवस्था सुधारत असून सकारात्मक दिशेने



वाटचाल करत आहे, तिच्या एकूण देशांतर्गत उत्पादन विकास दरात सातत्य आढळून येत आहे. आता या अर्थव्यवस्थेने ७ ते ८ टक्यांच्या४ दरम्यान स्वत:ला प्रमाणित केले आहे.

२०१७-२०१८ मधला पहिला तिमाहीचा काळ हा गेल्या तीन वर्षातला असा फक्त एकच कालखंड आहे ज्यामध्ये विकासदर कमी होऊन ६% च्या खाली राहिला. इतर घटकांबरोबरच नोटबंदी व वस्तू आणि सेवा कर लागू झाल्याचा परिणाम म्हणून एकूण देशांतर्गत उत्पादन विकास दर कमी झाला असल्याचे अनेक जणांचे मत होते. परंतू, विकास दर कमी होण्याला केवळ या आर्थिक सुधारणा जबाबदार नसल्याचे अनेक अर्थतज्ञांनी आणि सांख्यिकीतज्ञांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. अर्थव्यवस्थेतल्या महत्त्वाच्या आठ क्षेत्रांपैकी चार क्षेत्रांचा विकास दर कमी झाला असून एकूण विकास दर कमी होण्यात या चार क्षेत्रांचा मोठा वाटा आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीशी तुलना करता उत्पादन क्षेत्राच्या विकास दरात शेवटच्या तिमाहीत तीव्र घट दिसून आली. चालू आर्थिक वर्षात, पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून २०१७) विकास दर १.२ टक्क्यांवर आला. गेल्या आर्थिक वर्षात याच तिमाहित हा दर १०.७% इतका होता.

एकूण देशांतर्गत उत्पादन विकास दराची उतरती कळा पाहून अनेक बहुपक्षीय संस्थांनी भारताच्या विकास दराचे अनुमान कमी केले आहे.

जागतिक बँकेने वर्ष २०१७-१८ साठीचा अनुमानित विकास दर ७.२६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर आणला आहे तर एशियन डेव्हलपमेंट बँक आणि ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट (OECD) यांनी देखील २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या विकास दराबाबतचे त्यांचे अनुमान अनुक्रमे ७ आणि ६.७ टक्के इतके केले आहे.

**२०१७-२०१८ मधला पहिला तिमाहीचा काळ हा गेल्या तीन वर्षातला असा फक्त एकच कालखंड आहे ज्यामध्ये विकासदर कमी होऊन ६% च्या खाली राहिला. इतर घटकांबरोबरच नोटबंदी व वस्तू आणि सेवा कर लागू झाल्याचा परिणाम म्हणून एकूण देशांतर्गत उत्पादन विकास दर कमी झाला असल्याचे अनेक जणांचे मत होते. परंतू, विकास दर कमी होण्याला केवळ या आर्थिक सुधारणा जबाबदार नसल्याचे अनेक अर्थतज्ञांनी आणि सांख्यिकीतज्ञांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.**

तरीही, तेव्हापासून अर्थव्यवस्थेने पुन्हा वेग घेत चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या दुसऱ्या तिमाहीत ६.३% विकास दर नोंदवला आहे. दुसऱ्या तिमाहीची सुरवातही चांगल्या प्रकारे झाली. महत्त्वाच्या क्षेत्रातला विकास दर जून २०१७ मध्ये ०.८% इतका होता तो जुलै २०१७ मध्ये २.४% इतका झाला. उत्पादन, खाण, परिवहन आणि संचार, आणि सेवा क्षेत्रातल्या वाढीमुळे विकासदरावर सकारात्मक परिणाम झाला. चालू आर्थिक वर्षात निव्वळ स्थिर भांडवल निर्माणाचा (ग्रॉस फिक्स्ड कॅपिटल फॉर्मेशन) विकास दर देखील पहिल्या तिमाहीत १.६% होता तो वाढून दुसऱ्या तिमाहीत ४.७% इतका झाला. वास्तविक व्यक्तीगत उपभोग विकास दर (रिअल प्रायव्हेट कंझम्प्शन ग्रोथ) सामान्यपणे ६.५% वर स्थिर राहिला आहे.

भारताचा विकास दर क्रमाक्रमाने वाढत जाऊन २०१९-२०२०पर्यंत ७.४% इतका होईल असे जागतिक बँकेचे अनुमान आहे. आंतरराष्ट्रीय पत निर्धारण संस्था – मूडीजने सुध्दा सरकारची दीर्घकालीन स्थैर्य आणण्याबाबतची कटिबध्दता ओळखली आहे. या कटिबध्दतेचा परिणाम म्हणजे चलन फुगवट्यात घट, वित्तीय तुटीत घट होत आहे तसेच बाह्य घटकांचा समतोल साधला जात आहे.

गेल्या आर्थिक वर्षातल्या पहिल्या तिमाहीपासून दिसणारा एकूण विकासाचा उतरता कल आता

पालटत आहे, उत्पादन क्षेत्रातल्या शीघ्र विकासामुळे या तिमाहीला लाभ झाला. पहिल्या तिमाहीत उत्पादन क्षेत्राचा विकास दर १.२ टक्के होता तर दुसऱ्या तिमाहीत तो ७ टक्के झाला.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक एकीकरणासाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत सरकारने कठोर भूमिका घेतल्यामुळे वित्तीय तूट कमी झाली आहे. २०१३-१४ मध्ये वित्तीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ४.५% होती ती २०१६-१७ मध्ये ३.५% झाली. परिणामी भारत सरकारच्या स्थानिक आणि परदेशी चलन पत मानांकनात सुधारणा झाली आहे. पूर्वीच्या Baa3 या श्रेणीवरून भारताला आता Baa2 श्रेणी देण्यात आली आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था स्थिर श्रेणीतून सकारात्मक श्रेणीत आली आहे. मूडीज संस्थेने १३ वर्षांच्या कालावधीनंतर भारताच्या श्रेणीत ही सुधारणा केली आहे.

सध्याचे सरकार सत्तेत आल्यानंतरच्या गेल्या १३ तिमाहीपैकी ८ तिमाहीत एकूण देशांतर्गत उत्पादनातली वाढ सातत्याने ७% राहिली आहे तर ४ तिमाहीत ती ६% ते ७ टक्क्यांच्या दरम्यान राहिली आहे. २०१४-१५ या वर्षातल्या दुसऱ्या तिमाहीत तर ही वाढ ८.४ टक्क्यांवर पोहोचली होती. २०१७-१८ वर्षातल्या पहिल्या तिमाहीत फक्त एकूण देशांतर्गत उत्पादन विकास दर ६ टक्क्यांपर्यंत खाली गेला होता. इतर अनेक घटकांबरोबरच नव्या आर्थिक सुधारणा आणि महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रातल्या मंदगतीमुळे विकास दरात ही घट झाली. तरीही आता अर्थव्यवस्था यातून वर आली असून नोटबंदी व वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी करताना आलेल्या आव्हानातून बाहेर पडली आहे. अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या क्षेत्रांनाही आता गती मिळाली आहे. गुंतवणूकीत तेजी आली असून उपभोग विकासही (कंझम्प्शन ग्रोथ) स्थिर दिसत आहे. सर्व आर्थिक निर्देशांक लक्षात घेता भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर सरासरी ७ ते ८ टक्क्यांदरम्यान राहील असे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे आणि अर्थव्यवस्था लवकरच या श्रेणीत येईल असे दिसते. चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.७% राहील असे रिझर्व्ह बँकेनेही आपल्या ताज्या पतधोरण अहवालात म्हटले आहे.

**सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक एकीकरणासाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत सरकारने कठोर भूमिका घेतल्यामुळे वित्तीय तूट कमी झाली आहे. २०१३-१४ मध्ये वित्तीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ४.५% होती ती २०१६-१७ मध्ये ३.५% झाली. परिणामी भारत सरकारच्या स्थानिक आणि परदेशी चलन पत मानांकनात सुधारणा झाली आहे. पूर्वीच्या Baa3 या श्रेणीवरून भारताला आता Baa2 श्रेणी देण्यात आली आहे.**

एकंदरीत, भारतीय अर्थव्यवस्था मोठी झेप घेण्याच्या तयारीत असून येणाऱ्या वर्षात उच्च विकास दर गाठता येण्याची अपेक्षा आहे,असा निष्कर्ष काढता येईल.

■■■

*लेखक भारत सरकारच्या पत्रसूचना कार्यालयाचे महासंचालक असून अर्थ मंत्रालय, कंपनी व्यवहार मंत्रालय आणि स्पर्धा आयोगाचे प्रसारमाध्यमविषयक काम पाहत आहेत.*

*email :dprfinance@gmail.com*

# भारत व बांग्लादेश सीमा जोडणारी नवी रेल्वेगाडी



भारत व बांग्लादेशला रेल्वे मार्गाने जोडणारी कोलकत्ता-खुलना बंधन एक्सप्रेस ही नवीन गाडी नुकतीच सुरू करण्यात आली. भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी व बांग्लादेशच्या पंतप्रधान श्रीमती शेख हसीना यांनी ९ नोव्हेंबर २०१७ रोजी कलकत्ता येथून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे या गाडीला हिरवा झेंडा दाखवला. याप्रसंगी दोनही नेत्यांच्या हस्ते एका ई-पट्टिकेचेही संयुक्तपणे उद्घाटन करण्यात आले. यावर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे बांग्लादेश येथील भैरब व तितास या रेल्वे पूलांचे व कलकत्ता रेल्वे स्थानकावर मैत्री एक्सप्रेस आणि बंधन एक्स्प्रेसच्या प्रवाशांसाठी स्थानांतरण व सीमाशुल्क सुविधा (Immigration and Customs Clearance Facilities) असणाऱ्या आंतरराष्ट्रीय रेल्वे प्रवासी स्थानकाचेही उद्घाटन झाल्याचे घोषित करण्यात आले.

याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी दोन्ही देशांच्या सीमेपलीकडील लोकांना परस्परांशी संपर्क जोडणे आवश्यक आहे आणि मैत्री एक्स्प्रेस आणि बंधन एक्स्प्रेस गाड्यांमुळे भारत आणि बांग्लादेश यांच्यातील संपर्क व परस्पर संबंध वृध्दींगत होण्यास मोलाचा हातभार लागेल. मोदी यांनी यावेळी असेही नमूद केले की, गेल्या काही वर्षांत भारताने बांगलादेशातील अनेक विकास प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करून बांगलादेशचा सर्वात विश्वासार्ह साथीदार असल्याचे सिध्द केले आहे.

बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारताने घेतलेल्या पुढाकारांचे कौतुक केले आणि दोन्ही देशांच्या दरम्यान रेल्वे व दळणवळण जोडणी वाढविण्यासाठी आणखी पुढाकारांची आशा व्यक्त केली. स्थानांतरण व सीमाशुल्क भरणा सोयींसह आंतरराष्ट्रीय प्रवासी रेल टर्मिनसमुळे मैत्री व बंधन एक्स्प्रेसच्या प्रवाशांचा मोलाचा वेळ वाचेल, असेही त्या म्हणाल्या.

कोलकत्ता आणि ढाका यांना जोडणारी मैत्री एक्सप्रेस एप्रिल २००८ मध्ये सुरू करण्यात आली. त्यानंतर भारत व बांग्लादेशला जोडणारी बंधन एक्सप्रेस ही दुसरी रेल्वे गाडी आहे. दोन्ही देशांतील

लोकांच्या आग्रहानुसार कोलकत्ता व खुलना दरम्यान पेट्रापोल व बेनापोल स्थानकांच्या मार्गावरून आठवड्यातून एकदा दर गुरूवारी बंधन एक्सप्रेस चालवण्यात येईल.



कोलकत्ता व ढाका तसेच कोलकत्ता ते खुलना दरम्यानचा प्रवासी वेळ बचतीसाठी रेल्वे मंत्रालयाने स्थानांतरण व सीमाशुल्क विभागाच्या समन्वयातून कलकत्ता रेल्वे स्थानकावर मैत्री एक्सप्रेस आणि बंधन एक्स्प्रेसच्या प्रवाशांसाठी स्थानांतरण व सीमाशुल्क भरणा सुविधा असणारे आंतरराष्ट्रीय रेल्वे प्रवासी स्थानक सुरू केले आहे. दोनही देशांच्या प्रवाशांसाठी ही सुविधा फारच लाभदायक ठरली आहे.

बांगलादेशातील पायाभूत सुविधांपैकी सर्वात महत्वाच्या प्रकल्पांत मोडणाऱ्या दुसरा भैरब ब्रिज व तितास रेल्वे पूल हे दोन महत्वाकांक्षी प्रकल्प भारत सरकारच्या मदतीने नुकतेच पूर्ण करण्यात आले. भारतीय कंत्राटदार व सल्लागारांच्या पथकाच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली एक किलोमीटर लांबीचा दुसरा भैरब या रेल्वे पुलाची उभारणी मेघना नदीवर जवळपास ७५ दशलक्ष डॉलर्स निधी खर्चून करण्यात आली. तसेच पूर्व बंगालमधील तितास नदीवरील तितास पूल सुमारे २५ दशलक्ष डॉलर्सच्या खर्चासह बांधण्यात आला. हे दोन्ही पूल चितगांव ते ढाका ट्रंक रेल्वे लाईनवर असल्यामुळे बांगलादेशातील दोन्ही प्रवासी आणि मालगाड्यांची जलद वाहतूकीला मदत होईल.



■■■

आव्हान

# वर्तन बदल संज्ञापन आणि स्वच्छ भारत योजना

परमेश्वरन अय्यर



**स्वच्छ भारत अभियान हा जगातील सर्वात मोठा स्वच्छता कार्यक्रम आहे. यापूर्वीच्या कार्यक्रमांपेक्षा आताच्या या कार्यक्रमाचे वेगळेपण असे की ही सामुदायिक चळवळ बनली आहे. या लेखाचा स्वच्छ भारत अभियानाचे वेगळे पैलू आपण पाहणार आहोत. त्याचा प्रवास कसा झाला याचा आढावा घेणार आहोत. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ही योजना ता उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने जात आहे. त्यात सामुदायिक सहभाग हा पाया आहे.**

गेली चार दशके अनेक स्वच्छता कार्यक्रम विविध सरकारांकडून ग्रामीण भागात राबवण्यात आले. १९८१ मध्ये प्रथम ग्रामीण भागात केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात आला. तेव्हापासून ते एकूण स्वच्छता कार्यक्रम १९९९ पर्यंत हे वेगवेगळे कार्यक्रम यात होते. त्यानंतरही निर्मल भारत अभियान राबवण्यात आले. असे असले तरी स्वच्छ भारत अभियानात जो सामूहिक सहभाग पाहायला मिळाला तसा आधीच्या योजनात नव्हता. स्वच्छ भारत अभियान हा जगातील सर्वात मोठा स्वच्छता कार्यक्रम आहे. यापूर्वीच्या कार्यक्रमांपेक्षा आताच्या या कार्यक्रमाचे वेगळेपण असे की ही सामुदायिक चळवळ बनली आहे. या लेखाचा स्वच्छ भारत अभियानाचे वेगळे पैलू आपण पाहणार आहोत. त्याचा प्रवास कसा झाला याचा आढावा घेणार आहोत. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ही योजना ता उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने जात आहे. त्यात सामुदायिक सहभाग हा पाया आहे. त्यामुळेच त्याची परिणामकारकता वाढली आहे. या योजनेला जन आंदोलनाचे स्वरूप देऊन ती पुढे नेण्यासाठी ज्या पद्धतीने प्रचार व प्रसार मोहीमा राबवण्यातआल्या त्याचाही यात विचार करण्यात आला आहे.सवयी बदलांचे संज्ञापन यात महत्वाचे आहे. शिवाय या योजनेतील लक्ष्य गट ओळखून केलेली संदेश रचना यात महत्वाची आहे. यात स्वच्छ भारत २०१९ पर्यंतचा विचार केला असून त्याची प्रगती कायम कशी राखता येईल यावरही चिंतन केले आहे. २ ऑक्टोबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून स्वच्छ भारत अभियानाची घोषणा केली व देशाला त्या दिशेने प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. २०१४ पासून ज्या घरांमध्ये शौचालये आहेत त्यांची संख्या दुप्पट झाली आहे हा परिणाम केवळ तीन वर्षातील आहे. २०१४ मध्ये शौचालये असलेल्या घरांचे प्रमाण ३९ टक्के होते ते आता ७६ टक्के झाले आहे. स्वच्छतेच्या पातळीवर भारताने तीन वर्षात भारताच्या

स्वातंत्र्यानंतर ६७ वर्षात जेवढे काम झाले नाही तेवढे या तीन वर्षात केले आहे. सात राज्यांच्या ग्रामीण भागात याचा जास्त परिणाम झाला आहे. त्यात सिक्कीम, केरळ, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरयाणा, गुजरात व अरूणाचल प्रदेश यांचा (हागणदारी मुक्ती) समावेश आहे. केंद्रशासित प्रदेशातील चंडीगड व दमण-दीव हागणदारीमुक्त झाले आहेत. स्वच्छ भारत अभियानात अनेक प्रकारची फलश्रुती उघड्यावर शौचास बसण्याच्या लोकांच्या सवयी मोडताना दिसून आली. यात सवयी बदलण्यासाठी संज्ञापनाचा वापर करण्यात आला. गरजेनुसार क्षमता वाढ, योजनेच्या परिणामांचे मूल्यमापन यात करण्यात आले. कुठल्या गावात किती शौचालये लोकांनी बांधली याच्या आकडेवारी बरोबरच त्यात उघड्यावर शौचास बसण्याची सवय बदलण्यात किती यश आले याला मूल्यमापनात स्थान देण्यात आले. स्वच्छ भारत अभियानात पंतप्रधान स्वत:च प्रमुख संदेशकर्ता होते याचाही फरक पडला. आधीच्या योजना व आताची ही योजना यात हा फरक होता. देशाच्या प्रमुखाने स्वच्छता मोहिमेत आघाडीवर राहून लक्ष घालणे याला वेगळे महत्व होते. पूर्वीच्या योजनांचा प्रभाव न पडण्याचे कारण म्हणजे त्याला कुणाची मोठी प्रेरणा नव्हती. ते केवळ कागदोपत्री सरकारी कार्यक्रम होते. स्वच्छ भारत अभियानात लोकांनीच स्वच्छतेची हमी घेतली आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवून आरोग्याला महत्व दिले. त्याचे कारण म्हणजे त्यांच्या सवयी व दृष्टिकोनात झालेला बदल हे होते. जुन्या चालत आलेल्या सवयी बदलणे खूप अवघड असते पण ते या योजनेत बहुतांशी साध्य झाल्याचे चित्र आहे. आंतरव्यक्ती संज्ञापन हा स्वच्छ भारत अभियानातील महत्वाचा घटक आहे

**स्वच्छ भारत अभियानात लोकांनीच स्वच्छतेची हमी घेतली आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवून आरोग्याला महत्व दिले. त्याचे कारण म्हणजे त्यांच्या सवयी व दृष्टिकोनात झालेला बदल हे होते. जुन्या चालत आलेल्या सवयी बदलणे खूप अवघड असते पण ते या योजनेत बहुतांशी साध्य झाल्याचे चित्र आहे.**

व आंतरव्यक्ती संज्ञापनात घरोघरी जागरूकता, नव्या व जुन्या पिढ्यांच्या सवयीत बदल, गुड मॉर्निंग पथकांच्या स्वरूपात रोज सकाळी त्याचा पाठपुरावा, हागणदारीच्या नेहमीच्या ठिकाणी जाऊन तपासणी यावर भर दिल्याने लोकांचा या सुधारणा कार्यक्रमात सहभाग वाढला. स्वच्छाग्रहींची एक फौज यात उभी राहिली. खेड्यातील स्वच्छताग्रहींना यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले. ते स्वच्छतेचे खरे सैनिक आहेत. त्यांनीच आंतर व्यक्ती संज्ञापनातून बदल घडवले. सध्या व्यवस्थापन माहिती सेवेत साडेतीन लाख स्वच्छताग्रहींची नोंद आहे व त्यांची संख्या रोज वाढत आहे. ग्रामसभांमध्ये लोकांच्या भावना स्वच्छतेबाबत जागृत करण्यासाठी हे स्वच्छताग्रही काम करतात. यासाठी पाहणी व ग्रामसभा ही साधने आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख प्रशिक्षण कर्ते या स्वच्छताग्रहींना शिकवत असतात. सामुदायिक स्वच्छता दृष्टिकोन कार्यक्रमात त्यांना प्रशिक्षण दिले जाते. मानवी वर्तनावर प्रभाव टाकणारे घटक शोधून काही वेळा भावनेला हात घालून कुटुंबाविषयी तुम्हाला प्रेम नाही का असा सवाल करून, मुलांच्या आरोग्याबाबत तुम्हाला काळजी नाही का, सामाजिक दर्जा उंचावा असे वाटत नाही का या प्रश्नांच्या माध्यमातून चांगली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजाला सकारात्मक आव्हान दिले जाते. त्याचा सातत्याने मारा करून सवयी बदलण्यात बरेच यश आले आहे. बऱ्याच वेळा ग्रामस्थांना तुम्ही स्वच्छता गृह बांधा असे थेट न सांगता त्यांना आत्मपरीक्षणाच्या मार्गाने वास्तवाची जाणीव करून दिली जाते. त्यातून अप्रत्यक्षपणे स्वच्छतागृहाचे महत्व पटवले जाते. त्याचा वापर घरातील प्रत्येकाने करणे आवश्यक आहे हे सांगितले जाते. यात स्वच्छताग्रही साधा प्रश्न लोकांना विचारतात. तो म्हणजे एक व्यक्ती एकावेळी किती विष्ठा बाहेर टाकते. त्यात २०० ग्रॅम, ४००

ग्रॅम, ६०० ग्रॅम , सहाशे ग्रॅमपेक्षा जास्त असे पर्याय असतात. बरेच लोक माणशी ५०० ग्रॅम विष्ठा बाहेर टाकली जाते असे उत्तर देतात मग पाच माणसांच्या कुटुंबाची एकावेळची विष्ठा किती तर अडीच किलो.चार कुटुंबांची विष्ठा दहा किलो. जर त्यांनी उघड्यावर शौच केले तर दहा किलो विष्ठा उघड्यावर असणार, त्यावर माशा बसणार मग त्या माशा अन्नावर बसणार, मग तीच जंतूयुक्त विष्ठा अन्नावर येणार व सगळ्यांना रोग होणार हे तुम्हाला योग्य वाटते का या प्रश्नाचे उत्तर नाही असेच येते. मग ग्रामस्थांवर चांगला परिणाम होतो व ते स्वच्छतागृह बांधण्याचा विचार मनावर घेतात. स्वच्छताग्रही हे सर्व वय, लिंग व वंशातील आहेत यात मुलांचाही समावेश आहे. मुलांच्या गटांना वानसरसेना म्हटले आहे. ही मुले लोकांना उघड्यावर शौचास बसू नका असे सांगतात. शिटी वाजवणे, गाणे म्हणणे, जागरूकता फेरी काढणे या माध्यमातून ते प्रचार करतात. ते हागणदारीच्या ठिकाणी सकाळी जातात व शेतात शौचास बसलेल्यांना स्वच्छतागृहाचा आग्रह धरतात. तात्पुरता उपाय म्हणून शौचावर माती टाकण्यास सांगतात. रोग पसरवू नका असे सांगतात. मुले घरोघरी जाऊन स्वच्छ भारताचा संदेश देतात. ही मुले वेगवेगळ्या समुदायातील असतात. त्यामुळे त्यांचा संदेश मनावर ठसतो. ही वानरसेना सामाजिक बदलात मोठे काम करीत आहे. सामाजिक नेतृत्व ही लहान मुले करू शकतात हे यातून दिसून आले. वानरसेना व इतर उदाहरणातून समाजातील स्वच्छतेचे खरे पाईक, संदेशकार, साखळीत काम करून समाजावर प्रभाव टाकणारे घटक शोधता आले. यात समाज एक झाला, हागणदारी मुक्त खेड्यांची उद्दिष्टे साध्य होत गेली. राष्ट्रीय आघाडीवर प्रत्यक्ष प्रचार व प्रसार, स्वच्छता कार्यक्रम यावर भर देण्यात आला. हे जनआंदोलन सुरूच ठेवण्यासाठी प्रयत्न होत राहिले. मे २०१७ मध्ये स्वच्छतागृहांच्या वापरास उत्तेजन देण्याकरिता पेयजल, सांडपाणी व मलनिस्सारण मंत्रालयाने दरवाजा बंद ही मोहीम राबवली. यात हागणदारीला दारे बंद असा संदेश होता. स्वच्छतागृहे असूनही ती न वापरणाऱ्या पुरूषांच्या वर्तनात बदल करण्यासाठी अमिताभ बच्चन यांच्यासारखा अभिनेता संदेश देऊ लागला. अभिनेत्री अनुष्का शर्माने महिलांना याच प्रश्नावर संदेश देऊन त्यांना याविरोधात उभे ठाकण्यास सांगितले. यातून या योजनेला समाज मान्यता मिळण्यात मदत झाली. सामाजिक पातळीवर ही योजना फैलावली. स्वच्छता या एका शब्दाने चित्रपट क्षेत्राचे लक्ष वेधले. अक्षय कुमार व भूमी पेडणेकर यांच्या अभिनयाने नटलेला 'टॉयलेट एक प्रेमकथा' हा चित्रपट आला. स्वच्छतेचा संदेश समाजाच्या मुख्य प्रवाहापर्यंत पोहोचण्यास मदत झाली. सासरकडच्या लोकांनी स्वच्छतागृह बांधण्यास नकार दिल्याने पत्नी पतीला सोडून जाते अशी ही कथा आहे. स्वच्छ भारत अभियानानंतर ग्रामीण भागात महिलाच स्वच्छतागृहासाठी भांडत आहेत असे सकारात्मक चित्र पुढे येत गेले. स्वच्छता ही सेवा या सप्टेंबर २०१७ मधील पंधरवडा कार्यक्रमात ९ कोटी लोक पुढे आले ते वेगवेगळ्या समुदायातील होते त्यांनी स्वच्छतेसाठी श्रमदान केले. स्वच्छतेसाठी शपथा घेतल्या. निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, चित्रपट प्रदर्शन असे उपक्रम झाले. त्यातून लोक सहभाग व जनजागृती वाढत गेली. या पंधरवड्यात बंगळुरूत हॉकी संघाने

**स्वच्छताग्रही हे सर्व वय, लिंग व वंशातील आहेत यात मुलांचाही समावेश आहे. मुलांच्या गटांना वानसरसेना म्हटले आहे. ही मुले लोकांना उघड्यावर शौचास बसू नका असे सांगतात. शिटी वाजवणे, गाणे म्हणणे, जागरूकता फेरी काढणे या माध्यमातून ते प्रचार करतात. ते हागणदारीच्या ठिकाणी सकाळी जातात व शेतात शौचास बसलेल्यांना स्वच्छतागृहाचा आग्रह धरतात. तात्पुरता उपाय म्हणून शौचावर माती टाकण्यास सांगतात. रोग पसरवू नका असे सांगतात.**

व इतर वलयांकित व्यक्तींनी स्वच्छतेचा संदेश दिला. भारतीय क्रिकेट संघाने परिसर स्वच्छतेचा आदर्श घालून दिला. सामन्यांच्यावेळी त्यांच्या स्वच्छता उपक्रमांच्या दृश्यचित्रफिती दाखवण्यात आल्या. यातून स्वच्छता मोहिमेचा आवेग वाढतच गेला. योजनेत लोकांचा सहभाग वाढला. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एखादी योजना यशस्वी करण्यासाठी वेगवेगळे घटक कारणीभूत ठरतात. त्यामुळे या योजनेत यश मिळवणे कठीण होते. यात राज्यांना योजनेचे स्वरूप ठरवण्याचे अधिकार देऊन लवचिकता आणली होती. केवळ प्रादेशिक व लोकभाषेतील प्रचार मोहिमा, कलाकारांचे कार्यक्रम एवढेच नाही तर विशिष्ट ठिकाण व तेथील परिस्थिती पाहून तंत्रज्ञानाधिष्ठित उपाययोजनांवर भर देण्यात आला. त्यात ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी वेगळी स्वच्छतागृहे करता येतील का , की आहे त्यातच त्यांना अधिक सुविधा देता येतील याचा विचार करण्यात आला. देशातील हागणदारी मुक्त गावांची संख्या आता तीन लाखांच्या पुढे गेली आहे. अनेक जिल्ह्यात आव्हाने होती पण त्यावर मात करून ही योजना यशस्वी करण्यात आली. बिकानेर मधील स्वच्छता कार्यक्रमात सांस्कृतिक व भूशास्त्रीय आव्हाने होती. हा भाग थरच्या वाळवंटात आहे. तेथे बनकोबिकानो कार्यक्रम राबवण्यात आला. त्यात अनेकांना फायदा झाला. लोकांना तो कार्यक्रम पटला. हा सामाजिक नेतृत्वाने पुढे नेलेला कार्यक्रम ठरला. त्यात महिलांचा आत्मसन्मान जागृत करण्यात आला. खेड्याचा अभिमान,

---

**देशातील हागणदारी मुक्त गावांची संख्या आता तीन लाखांच्या पुढे गेली आहे. अनेक जिल्ह्यात आव्हाने होती पण त्यावर मात करून ही योजना यशस्वी करण्यात आली. बिकानेर मधील स्वच्छता कार्यक्रमात सांस्कृतिक व भूशास्त्रीय आव्हाने होती. हा भाग थरच्या वाळवंटात आहे. तेथे बनकोबिकानो कार्यक्रम राबवण्यात आला. त्यात अनेकांना फायदा झाला.**

---

कुटुंबाचा अभिमान याला साद घालण्यात आली. त्यातून बिकानेरला स्वच्छतेची स्वयंस्फूर्ती लाभली. ग्रामीण भागात आता स्वच्छतेचा विषय जनमनावर ठसत आहे. वर्तन बदल संज्ञापन यशस्वी होत आहे त्यात नुसती हागणदारी मुक्ती तात्पुरती झाली नाही तर त्यात शाश्वत यश मिळाले. निगराणी समित्या उघड्यावर शौचास बसणाऱ्यांवर लक्ष ठेवू लागल्या. यात वर्तनात्मक बदल शाश्वत होता. त्यामुळे परिणाम तात्पुरता नव्हे तर कायमचा होता. हागणदारीमुक्ती ही सर्व समाजाची सामुदायिक जबाबदारी आहे, हे पंतप्रधानांनी सांगितले. त्यामुळे सगळा देश त्यासाठी उभा राहिला, लोकांच्या कल्पनाशक्तीला, कर्तृत्वाला ते आव्हान होते. सगळ्या लोकांनी पंतप्रधानांच्या हाकेला साद दिली. लोकांनी लोकांसाठी करायची गोष्ट म्हणजे स्वच्छता असा नवीन मंत्र लोकांना मिळाला. तीन वर्षांच्या आत तीस कोटी लोकांनी स्वच्छतागृहे वापरण्यास सुरूवात केली. आता हे अभियान पुढे चालले आहे. २ ऑक्टोबर २०१९ रोजी संपूर्ण भारत हागणदारी मुक्त होणार आहे. महात्मा गांधी यांच्या दीडशेव्या जयंतीला यापेक्षा वेगळी व समर्पक आदरांजली असू शकत नाही. हे उद्दिष्ट आपण वेगाने साध्य करू अशी आशा करू या.

■■■

*लेखिका केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाचा सचिव असून स्वच्छता क्षेत्रातील कार्याच्या त्यांना मोठा अनुभव आहे. त्यांनी जागतिक बँकेसोबतही काम केले आहे.*

*email: param.iyer.gov.in*

## आपणास माहित आहे का?

# जललेखा परिक्षण



जल हे जीवन आहे परंतु, मुबलक आणि स्वस्त आहे म्हणून या अनमोल नैसर्गिक साधनसंपत्तीला आपण आजवर योग्य तितके महत्व दिलेले नाही तसेच जलसंवर्धन करण्याबाबतही आपण केवळ उदासीनता दाखवित आलो आहोत. आतापर्यंतची ही परिस्थिती कूर्मगतीने का होईना पण बदलत आहे. कारण वैश्विक स्तरावर पाणी ही एक दुर्मिळ साधनसंपत्ती असल्याचे मान्य झाले असून पाण्याचा तुटवडा ही एक जागतिक समस्या असल्याचेही सर्व देशांनी स्वीकारले आहे. एका आंतरराष्ट्रीय अहवालानुसार वर्ष २०३० पर्यंत पाण्याची मागणी पुरवठ्याच्या तुलनेत ४० टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज आहे. तसेच तोपर्यंत जगातील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या अत्यंत पाण्याच्या टंचाई क्षेत्रात राहत असेल असेही अहवालात मांडण्यात आले आहेत. आपला देशही या परिस्थितीला अपवाद नसेल. त्यासाठी आपण सर्वांनी जलसुरक्षेबाबत ठोस उपाय करणे आवश्यक आहे. यासाठी जे काही प्रयत्न केले जात आहेत त्यामध्ये पाण्याचा कमीतकमी वापर व उपलब्ध पाणीसाठ्याचे कार्यक्षम व योग्य प्रकारे व्यवस्थापन या दोन बाबींवर भर दिला जातो. पाण्याच्या वापराचे लेखापरिक्षण करण्यातून पाण्याचा अनावश्यक वापर तसेच अपव्यय आटोक्यात राहतो व यातूनच जलसंवर्धनात्मक उपायांना प्रोत्साहन मिळते. या उपायांमध्ये घरगुती, ऊर्जा व इतर उद्योगधंद्यांतील तसेच जलसिंचन क्षेत्रांत पाण्याचा कार्यक्षम वापर व पुनर्वापर यांचा समावेश होतो.

पाण्याच्या लेखापरिक्षणातून पाणीपुरवठा यंत्रणेची व पाण्याचा वापर करणाऱ्यांची सविस्तर माहिती उपलब्ध होते. ज्याद्वारे उपलब्ध पाणीसाठ्यांतील जलाचे सुयोग्य वाटप व कार्यक्षम वापर करणे शक्य होते.

**पाणी पुरवठा व पाण्याच्या वापराचा अभ्यास**

जल लेखापरिक्षणामध्ये पाणी स्त्रोतांचे मांडणी, वितरण साखळी तसेच पाणी वापरकर्त्याची राहती जागा व तेथून सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था इ. घटकांचा अंतर्भाव होतो. या मांडणीमध्ये पाणीपुरवठा यंत्रणेतील जलप्रवाहाच्या प्रारंभ बिंदूपासून पाणी वाहून नेतांना जलप्रवाहक्षमतेची मोजणी करणारी साधने, जलवाहक नलिकेचा आयाम आणि फिटिंग्ज् इ.चा समावेश आहे. तसेच जलस्त्रोतांची उपलब्धता, विविध क्षेत्रांतील पाण्याचा आधीपासूनचा वापर इ. माहितीवरून सद्कालीन पाण्याची आवश्यकता व भविष्यात उद्भवणारी पाण्याची गरज निश्चित करण्यास मदत मिळते. पावसाच्या पाण्याची साठवण आणि पाण्यातील पुनरुपयोगाद्वारे पाण्याचा दिर्घकालीन स्त्रोत विकसित करण्यासंबंधीची माहितीदेखील जललेखापरिक्षणात विचारात घेतली जाते.

**प्रक्रिया अभ्यास**

जलप्रवाह मापन साधने सर्व महत्वाच्या ठिकाणी बसवण्यात आलेली असतात जेणेकरुन विविध टप्प्यांवर होणाऱ्या पाण्याच्या अपव्ययाचे नियमित अंतराने मूल्यांकन करता येईल. यामध्ये पाण्याचा मुख्य स्त्रोत, या

स्त्रोतांपासून जलशुध्दीकरण यंत्रणेपर्यंत व त्या ठिकाणहून प्रक्रिया केलेले शुध्द पाणी साठवण्याच्या स्थळापर्यंतची जलवाहक यंत्रणा, पाणीसाठयांचे वितरण केंद्र, वितरणाचे जाळे, आणि वापरकर्त्यांचे निवास इ. स्थळी होणाऱ्या पाण्याच्या अपव्ययाचे मूल्यांकन होते. भविष्यातील जलपुरवठा यंत्रणेचा विस्तार, नूतनीकरण आणि आधुनिकीकरणासाठी या पध्दतींचा सविस्तर अभ्यासही संपूर्ण प्रक्रिया समजण्यास उपयुक्त ठरतो.

**पाण्याची गुणवत्ता**

जललेखापरिक्षणामध्ये घरगुती वापरासाठी तसेच विविध क्षेत्रांना पुरवल्या जाणा-या पाण्याच्या गुणवत्तेचा, शुध्दतेचा दर्जा देखील नियमितपणे तपासला जातो. यातून पुरवल्या गेलेल्या पाण्यातील दूषित घटकांचे प्रमाण व स्वरूप समजण्यास मदत होते.

**यंत्रणा लेखापरिक्षण**

सिंचन, उद्योग आणि वाणिज्य, जलविद्युत, घरगुती पाणीपुरवठा, औष्णिक विद्युत आणि इतर क्षेत्रांत सध्या होणारा पाण्याचा वापर, या जलयंत्रणेचे एकूण स्वरूप यांचाही अभ्यास जललेखापरिक्षणात आवश्यक आहे. कारण यातून विविध क्षेत्रांत वापरल्या जाणाऱ्या जलयंत्रणेची परिचालन कार्यक्षमता आणि देखभालीची पातळी तपासण्यास मदत होते. जलपुरवठा यंत्रणेत कोणतेही फेरबदल करण्यासाठी किंवा यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी विद्यमान यंत्रणेची स्थिती तपासणे आवश्यक असते. तसेच जलस्त्रोतांच्या प्रारंभ बिंदूपासून अंतिम वापरकर्त्यांपर्यंतच्या जलपुरवठा यंत्रणा व उपयंत्रणांतील पाणी साठवण्याच्या व पुरवण्याच्या मापन पध्दतींही कार्यक्षम, योग्य व अचूक असल्याची खात्री करण्यासाठी वेळोवेळी तपासल्या जातात. पाणी वापराचे मापनयंत्राचे स्वरूप जिल्हा स्तरावर व सर्वसामान्यांसाठी त्यांच्या पाण्याच्या वापरानुसार असतात. यामुळे अतिरिक्त सांडपाणी तयार होण्याची प्रकिया नियंत्रित ठेवता येते.

**सांडपाण्याचे विश्लेषण**

घरगुती सांडपाणी, जलसिंचनातून मागे उरणारे पाणी, उद्योगांतील प्रक्रियेनंतर राहणारे पाणी यांचा अभ्यास आवश्यक आहे. कारण यातून पर्यावरणाला पूरक होईल अशाप्रकारे या उरलेल्या पाण्याचा पुनर्वापर व या दुषित पाण्यात असलेले उपयुक्त घटक वेगळे काढणे शक्य होते.

**जललेखापरिक्षण अहवाल**

सुयोग्य नियोजन व रूढ वैज्ञानिक पध्दतींचा अवलंब जललेखापरिक्षणासाठी आवश्यक आहेत. एखाद्या क्षेत्राला पुरवण्यात आलेले पाणी व तेथे त्या पाण्याचा करण्यात आलेला नेमका वापर या दोन मुख्य बाबींच्या आधारावर जललेखापरिक्षण केले जाते. पाण्याचा अपव्यय व जलपुरवठा यंत्रणेची कार्यक्षमता निश्चित समजल्यावर या प्रक्रियेत पाण्याची बचत करता येण्यासाठी आवश्यक उपाययोजना मांडता येतात.

देशातील एकूण पाणी वापराच्या सध्याच्या स्तरापैकी ८३ टक्के पाणी सिंचनक्षेत्राखाली आहे. म्हणूनच, पाणी वापरामध्ये जास्तीतजास्त संवर्धन साध्य करण्यासाठी सिंचनक्षेत्रात जलसंवर्धनाचे बरेच प्रयोग होत आहेत. केंद्रसरकारनेही यादृष्टीने सिंचनक्षेत्रात नवनव्या योजना राबवण्यावर भर दिला याहे.

सिंचन क्षेत्रातील पाणी वापराच्या कार्यक्षमतेत अगदी थोड्या प्रमाणातील सुधारणाही देशातील सिंचित क्षेत्र वाढविण्यासाठी व पाण्याची बचत करण्यास मोठा हातभार लावेल. कारण आजच्या घडीला केवळ सिंचनच नव्हे तर इतर क्षेत्रांतही, निसर्गाची मौल्यवान देणगी असेलेली जलसंपत्ती जतन करण्याची नितांत गरज आहे.

■■■

# UPSC Foundation
## Batch 2018-19

**Prelim + Mains + Interview**

Batch Starts **3 July 2018**

Time : 8 to 10 am

Introductory Lecture

4th June 2018 | @ 5:00pm

# MPSC Foundation
## Batch 2018-19

**Prelim + Mains + Interview**

Batch Starts
**2 July 2018**
Time : 4-8pm

Batch Duration **11 Months**

Admission Starts
**First Week of June**

Bhagirath IAS Academy
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **March, 2018**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **March,** 2018
Date of Posting : 16th **March,** 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.